3-35 with cover_lok-1-29.qxd 1/6/2015 4:48 PM Page 59

जानेवारी-२०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य

## २०१५
## नवे वर्ष नवे संकल्प

॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥





कर्णबधिर विद्यालय सोनेगाव येथे विदर्भस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्‌घाटन केल्यानंतर बुद्धिबळाच्या पटावर पहिली चाल खेळताना कर्णबधिर विद्यार्थ्यांसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



राजापूर तालुक्यातील अडिवरे येथील अतिथी भवनाच्या भूमिपूजन प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षणमंत्री विनोद तावडे

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 3

# अंतरंग


वर्ष ६६ वे | अंक ७ | जानेवारी २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

**लोकराज्य**

## संपादन

- अतिथी संपादक — **मनीषा पाटणकर-म्हैसकर**
- मुख्य संपादक — **चंद्रशेखर ओक**
- संपादक — **सुरेश वांदिले**
- कार्यकारी संपादक — **प्रवीण टाके**
- विशेष सहकार्य — **कीर्ती पांडे**, **क्रिती लाला**
- उपसंपादक — **प्रवीण कुलकर्णी**, **राजाराम देवकर**

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — **दिगंबर पालवे**
- वितरण अधिकारी — **विलास बोडके**
- साहाय्य — **विद्या कदम**, **नितीन कुटे**

## मांडणी

- मुखपृष्ठ — **सीमा रनाळकर**
- मांडणी, सजावट — **शैलेश कदम**
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in



### घोषणा नव्हे...




राज्याचा समतोल विकास घडवण्याच्या उद्देशाने नव्या सरकारने आपल्या पहिल्याच अधिवेशनात मागास आणि अविकसित भागांसाठी खास योजना तयार केल्या आहेत. १६

### सुशासन हाच आमचा भक्कम पाया

२०१५ नवे वर्ष नवे संकल्प ॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥

राज्यात नवे सरकार आल्यापासून कामाचा धडाका सुरू झाला आहे. उद्योग, शेती, शिक्षण, अर्थव्यवस्था, महिला व बालकल्याण, अल्पसंख्याक विकास अशा सर्वच क्षेत्रात वेगाने काम सुरू आहे. मंत्रिमहोदयांनी आपापल्या विभागाचे नववर्षाचे संकल्प केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे सरकार जनतेला आपले वाटले पाहिजे. जनतेच्या जीवनात सुकरपणा आला पाहिजे. हाच संकल्प असल्याचे ठामपणे सांगितले. ६

### आपले मंत्री...

महाराष्ट्राच्या देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळात नव्याने समाविष्ट झालेल्या १० कॅबिनेट व १० राज्यमंत्र्यांचा परिचय. २३

### पर्यावरणासोबत विकास



छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक असावे हा प्रस्ताव गेली काही वर्षे रखडला होता. त्याला नुकतीच केंद्रीय मंजुरी देण्यात आली. याचबरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकादरम्यानचे अडथळेही दूर करण्यात मला यश आले. २८

### गुणवत्तावाढीला सुधारणेची जोड



शिक्षण हे फक्त शहरांमध्ये मर्यादित न राहता शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार गावागावांत तसेच खेड्यापाड्यांत करण्यासाठी आमचे सरकार प्राधान्य देईल. राज्य आणि केंद्राच्या शिक्षणाच्या चांगल्या योजना खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ३०

### नवे प्रकल्प...

मेक इन महाराष्ट्र

गुंतवणूक वाढीच्या मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांना उद्योग जगताकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ३४

### सांभाळा आपल्या हृदयाला



हृदयरोगाची लक्षणे उपाय आणि रोग होऊच नये यासाठी घ्यावयाची काळजी याबद्दल निरामय या सदरात सांगताहेत सर जे.जे. रुग्णालयातील हृदयविकार व ऊरशल्यचिकित्सा विभागाचे प्रमुख डॉ. के.एन. भोसले. ४८

### सौरऊर्जेची किमया

राज्यात आगामी काही वर्षात सौरऊर्जेवरील पाच लाख कृषी पंप बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ३६

### याशिवाय

- गौरव दोन दिग्गजांचा
- ध्येयासक्तीला प्रयत्नांची जोड (प्रेरणा)
- मोगलीचे अद्भुत विश्व (भ्रमंती)
- हवे थिंक टँक (दिल्लीतील महाराष्ट्र)




विविध घटना, घडामोडींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ केलेले मनोवेधक भाष्य.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 4

# स.न.वि.वि.

### विकासाची नांदी

लोकराज्यचा डिसेंबर महिन्याचा अंक विविधतेने नटलेला आणि तेवढाच वाचनीय व संग्रही ठेवण्यासारखा होता. मुख्यमंत्र्यांचा मेळघाट दौरा, मधुमेहींसाठी डॉ. शशांक जोशी यांनी केलेले मार्गदर्शन, नवेगाव बांध या पर्यटन स्थळाची ओळख आदींविषयीचे लेख बोलके होते. शिवाय राज्यशासनाने उद्योग, शेती, ऊर्जा आदींविषयक घेतलेले विविध निर्णय आशादायी वाटले. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी घेतलेले विविध निर्णय आश्वासक असल्याने नवी आशा पल्लवीत झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी केंद्र व राज्य सरकार सकारात्मक पावले उचलत असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. ही विकासाची नांदीच म्हणता येईल. शासनाची वाटचाल महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने गतिमानतेने सुरू असल्याचे हा अंक अधारेखित करतो.

**– नीरज भांडवले**, पुणे




### वैविध्यपूर्ण

महाराष्ट्राचे नवे सरकार शेती आणि उद्योगांना नव्याने उभारी देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत असल्याने महाराष्ट्राला पुन्हा गतवैभव प्राप्त होणार असल्याचा विश्वास वाटत आहे. लोकराज्यचा 'मेक इन महाराष्ट्र'ची थीम असलेला डिसेंबरचा अंक शासनाच्या सकारात्मक वाटचालीची पावतीच म्हणावी लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसातच मेळघाटसारख्या आदिवासी भागाला भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. आदिवासींच्या विकासासाठी ठोस पावले उचलणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शासनाची ध्येयधोरणे लोकराज्य नेहमीच आमच्यापर्यंत पोहोचवित आला आहे. त्यातही स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे प्रेरणा सदर, पर्यटन, सांस्कृतिक, आरोग्य आदी सदरे लोकराज्यचे वैविध्य सांगणारी आहेत.

**– अविराज पतंगे**, औरंगाबाद




### आत्मविश्वास वाढला

लोकराज्य नोव्हेंबर २०१४ चा अंक सुंदर आणि वाचनीय होता. चतुरस्त्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समग्र राजकीय जीवन दर्शन लोकराज्यने घडविले. एखादा युवक किती उंच भरारी घेऊ शकतो, हे 'लोकराज्य'च्या या अंकाच्या वाचनातून प्रत्येक युवकाला कळू शकेल. 'लोकराज्य'च्या या अंकाच्या माध्यमातून वाचकांचा आत्मविश्वास वाढला आहे. मंत्र्यांचे परिचयदेखील करून दिले. लोकराज्य निर्मितीपासून आजपर्यंत कोठेच कमी पडले नाही आणि भविष्यातही कमी पडणार नाही याची मला खात्री आहे.

**– दीपक सातोरे**, नांदेड

### मार्गदर्शन मिळाले

लोकराज्य सप्टेंबरचा अंक आवडला. विविध स्पर्धा परीक्षांविषयी इत्थंभूत माहिती मिळाली. शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा, आरोग्य आदींविषयी अचूक आणि महत्त्वपूर्ण माहिती लोकराज्यमधून मिळते.

**– प्रज्ञानंद दामोदर**, अकोला
**– अश्विन गंणीवार**, पांढरकवडा

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा.
**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई–४०० ००१**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 5



अतिथी संपादकीय

# संकल्प आणि निर्धार

नवीन वर्षाचे आगमन झाले आहे. येणारे प्रत्येक नवीन वर्ष, नवी आशा आणि विश्वास घेऊन येत असते. प्रत्येकाला आपली स्वप्ने साकार करण्याची संधी देत असते. व्यक्तिगत आणि व्यावसायिक आयुष्यातील उद्दिष्टांची नेमकी दिशा स्वयंस्पष्ट असेल आणि त्यानुसार वेळेचे व उपलब्ध संसाधनाचे सुयोग्य नियोजन केले तर आपली स्वप्नपूर्ती सहज साध्य होऊ शकते. नवीन वर्षात आपले आयुष्य आणखी सुंदर, सुखकारक आणि समाधानकारक करण्याचा संकल्प करू या ! लोकराज्य परिवारातर्फे आमच्या वाचकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

नव्या वर्षात महाराष्ट्राला अधिक समृद्ध आणि गौरवशाली करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.'लोकराज्य'च्या या अंकात विविध विभागांच्या मंत्रिमहोदयांनी केलेल्या नवीन वर्षाच्या संकल्पावरील लेखांना समाविष्ट करण्यात आले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेऊन जनतेच्या जीवनमानात गुणात्मक बदल करण्याचा संकल्प आणि निर्धार यामधून अधोरेखित झाला आहे.

अवकाळी पाऊस, गारपीट, टंचाईसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी ७ हजार कोटी रुपयांचे पॅकेज मुख्यमंत्र्यांनी घोषित केले आहे. यामुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना निश्चितच दिलासा मिळेल.

लोकराज्यचे भावंड असलेले इंग्रजी नियतकालिक **'महाराष्ट्र अहेड'** हे नव्या आकर्षक स्वरूपात या वर्षापासून पुन: प्रकाशित होत आहे. स्मार्ट महाराष्ट्राचा 'स्मार्ट आरसा' असे या नियतकालिकाचे स्वरूप राहणार असून राज्याच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेसोबतच पर्यटन, संस्कृती, सुशासन, उद्योग, माहिती तंत्रज्ञान आदी विषयांवरील साहित्य या अंकात दिले जाईल.

महासंचालनालयाच्या **'दिलखुलास संवाद'** या आकाशवाणीवरील कार्यक्रमाने नुकताच सलग आठ वर्षांचा टप्पा पार केला. सह्याद्री वाहिनीवरून प्रक्षेपित होणाऱ्या **'जय महाराष्ट्र'** या कार्यक्रमाने ७०० भाग नुकतेच पूर्ण केले. **'महान्यूज'** या वेबपोर्टलची लोकप्रियता नेटिझन्समध्ये दिवसेंदिवस वाढत आहे. **लोकराज्य**, हे मराठीतील सर्वाधिक खपाचे नियतकालिक ठरले आहे. **उर्दू लोकराज्यलाही** चांगली वाचकप्रियता मिळत आहे. ही संवाद माध्यमे, नागरिक आणि शासनामध्ये एक सेतू म्हणून प्रभावीरीत्या कार्यरत आहेत. आपले जीवनमान अधिक आशयसंपन्न करण्यासाठी ही माध्यमे उपयुक्त ठरत आहेत, याचा आम्हाला विशेष आनंद आहे.

नव्या वर्षात ही सर्व माध्यमे आणखी आकर्षक स्वरूपात, गुणवत्तापूर्ण व दर्जेदाररीत्या आपणासमोर आणण्याचा आमचा संकल्प आहे. हा संकल्प तुम्ही आणि आम्ही मिळून पूर्णत्वास नेऊन हा सेतू अधिक भक्कम आणि सक्षम करू या.

पुन्हा एकदा आमचे सर्व वाचक, विक्रेते, लेखक यांना नव्या वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा.

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 6

# सुशासन हाच आमचा भक्कम पाया



**आक्टोबर महिन्यात राज्यातील जनतेने एक संकल्प केला. येथील राजकीय व्यवस्था बदलण्याचा. लोकशाहीमध्ये हा बदल मतदानातून उमटतो. हा देखील एक लोकशाहीतील बहुमताचा संकल्प असतो. नव्या व्यवस्थेत जनमताचा संकल्प ठळकपणे बदलला आहे. ३१ आक्टोबर २०१४ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी खचाखच भरलेल्या वानखेडे स्टेडियमवर मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि जनतेचा परिवर्तनाचा एक संकल्प मूर्तरूपात प्रगट झाला. आता वेळ आहे बदल अनुभवण्याची. आमचे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी यांच्या मनात या महाराष्ट्राचे भाग्य बदलविण्याचे कोणते संकल्प आहेत हे जनतेला जाणून घ्यायचे आहे. राज्यात नवे सरकार आल्यापासून कामाचा धडाका सुरू झाला आहे. उद्योग, शेती, शिक्षण, अर्थव्यवस्था, महिला व बालकल्याण, अल्पसंख्याक विकास अशा सर्वच क्षेत्रात वेगाने काम सुरू आहे. मंत्रिमहोदयांनी आपापल्या विभागाचे नववर्षाचे संकल्प केले आहेत. 'सरकार जनतेला आपले वाटले पाहिजे, जनतेच्या जीवनात सुकरपणा आला पाहिजे,' हाच संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे सांगितले. सरकारची वाटचाल त्याच दिशेने सुरू असून आगामी वर्षात 'आपले सरकार' ही ओळख ठळक होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळाच्या संकल्पांचा घेतलेला धांडोळा.**

**– टीम लोकराज्य**

सर्वप्रथम मी आगामी वर्षानिमित्त लोकराज्यच्या वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. राज्यातील नागरिकांना प्रशासनातले चांगले बदल, विविध क्षेत्रात नवीन निर्णय यांची भेट शासनातर्फे निश्चितपणे मिळणार आहे, याची खात्री मी देतो. नव्या शासनासमोर अनेक आव्हाने असली तरी सर्वसामान्यांना आपले वाटेल असे सरकार देण्यात कुठलीही अडचण येणार नाही, हे मला प्रथम स्पष्ट करायचे आहे.

शेतकऱ्यांना आधार देणे, सिंचन वाढविणे, उद्योगांना प्रोत्साहन देणे, शिक्षणाची आणि आरोग्याची अवस्था सुधारणे, महिलांना सक्षम करणे, शहरांचे नियोजन, इत्यादी बाबतीत शासन आपले कर्तव्य पार पाडणारच आहे. परंतु हे सगळे करतांना 'सुशासन' हाच आमचा पाया असणार आहे हे मी आपणास सांगू इच्छितो.

या दृष्टीने शासन-प्रशासन आणि जनता यांच्यामध्ये इतके दिवस निर्माण झालेली प्रचंड दरी कमी करणे हे आमचे पहिले पाऊल असणार

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 7

आहे. प्रशासकीय अधिकार विकेंद्रित करणे आणि विभागीय स्तरावर अधिकार देऊन निर्णय प्रक्रियेतील टप्पे कमी करण्याचे आम्ही ठरविले.

दुसरे तितकेच महत्त्वाचे पाऊल आहे ते भ्रष्टाचाराला आळा घालणे. आज राज्यात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांच्या मागे मग ते अपुरे सिंचन असो किंवा शिक्षण क्षेत्रातली मुजोरी असो, रस्त्यांची दुर्दशा असो किंवा एखाद्या मजुराची होणारी पिळवणूक असो, या सगळ्या मागे आहे भ्रष्टाचार. तो दूर करणे आणि एक सशक्त यंत्रणा निर्माण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

जनतेप्रती प्रशासनाचे उत्तरदायित्व वाढविणे हे आमचे तिसरे पाऊल आहे. निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान करून राज्यातील जनतेत हे आपले सरकार आहे, ही भावना निर्माण करण्याची गरज आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा वाढदिवस आम्ही 'सुशासन दिन' म्हणून पाळला असून हे काही फक्त त्या दिवसापुरते मर्यादित असणार नाही. नागरिकांना सेवेची हमी देणारा कायदा अमलात आणणे सुरू करून प्रत्यक्ष सुशासनास खऱ्या अर्थाने प्रारंभ केलेला आपणास दिसेल.

२०१५ हे वर्ष 'डिजिटल' पद्धतीने राज्यातील नागरिकांना कालबद्ध सेवा देणारे वर्ष म्हणून घोषित करून आम्ही तंत्रज्ञानाशी संबंधित महत्त्वाचे चौथे पाऊल उचलले आहे. मंत्रालय आणि क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ई- गव्हर्नन्सची अंमलबजावणी सुरू केली असून येणाऱ्या वर्षांमध्ये कार्यालये कागदविरहित करण्यावर भर असेल. राज्य शासनाच्या ऑनलाईन पोर्टलचा उपयुक्त वापर करून घेण्यात येईल.

समतोल विकासाबाबत आम्ही कटिबद्ध आहोत. याबाबतची वचनपूर्ती केली जाईलच. वर्षानुवर्षे राज्यातील तुलनेने मागास भागांच्या विकासाविषयी बोलले जाते. पण प्रत्यक्षात यासाठी काहीतरी ठोस करून दाखविण्याची पूर्वीच्या शासनाची आंतरिक इच्छाच नव्हती. आता तसे होणार नाही. याबाबत आवश्यक ते सर्व निर्णय तातडीने घेऊन कालबद्ध प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. विशेषत: विदर्भ, मराठवाडा तसेच ज्यांच्यापर्यंत विकास पोहचला नाही त्या सर्व भागांच्या प्रगतीवर लक्ष देणे हा आमचा संकल्प असणार आहे.

**२०१५ नवे वर्ष नवे संकल्प**

**॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥**

### संकल्पाची दिशा

- सिंचनात वाढ करून शेतकऱ्यांना आधार देणे
- राज्यात गुंतवणूक वाढवणे
- शिक्षणाची आणि आरोग्याची स्थिती सुधारणे
- भ्रष्टाचाराला आळा घालणे
- 'डिजिटल महाराष्ट्र'च्या माध्यमातून शासन प्रक्रिया लोकाभिमुख आणि पारदर्शी करणे
- विकासाचा विभागीय समतोल पाळणे
- महिलांना सक्षम करणे

# दीर्घकालीन लोकहिताची कामे



**एकनाथराव खडसे**

सततची नापिकी, कर्जाचा बोजा, नैसर्गिक संकटाने वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम शासन प्राधान्याने करेल असा संकल्प महसूल, मदतकार्य व पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास, कृषी व फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय मंत्री एकनाथ खडसे यांनी केला आहे.

महसूल विभागात संगणकीकरणावर भर देऊन एकाच छत्राखाली सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

राज्यातील दुष्काळी स्थिती, काही भागात गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी, सर्वसामान्य जनतेचे होणारे नुकसान लक्षात घेता नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून नुकसान भरून निघेल एवढी मदत दिली जाईल. प्रकल्प वा नैसर्गिक आपत्तीने पुनर्वसनाची गरज असलेले प्रत्येक गाव, वाडी, वस्ती सुविधांसह पुनर्वसित करण्यावर शासन प्राधान्याने काम करेल.

कोरडवाहू शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी सुधारित उपक्रम राबवण्यात येईल. जमिनीमध्ये पाणी साठवून ठेवण्याच्या क्षमतेत वाढ करणाऱ्या तंत्राचा स्वीकार केला जाईल. माती परीक्षण कार्ड योजना राबवण्यात येईल. स्वयंचलित हवामान केंद्राचे बळकटीकरण करण्यात येईल.

**शब्दांकन - गणेश फुंदे**

### संकल्पाची दिशा

- दुष्काळमुक्त महाराष्ट्र करणार
- महसूल प्रशासनात गतिमानता
- फलोत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणार
- उत्पादन खर्चावर आधारित फळांची बाजारपेठ उपलब्ध करून देणार
- नव्या स्वरूपाची फळपीक विमा योजना आणून शेतकऱ्यांना नुकसानीच्या प्रमाणात तातडीने विमा रक्कम मिळेल अशी व्यवस्था करणार
- दुग्धव्यवसाय वाढीसाठी व दुष्काळी स्थितीतही दुग्ध उत्पादन टिकून राहण्यासाठी सर्वकष प्रयत्न करणार
- तरुणांना शेतीक्षेत्रात उभारी देण्यासाठी विशेष योजना
- अल्पसंख्याक समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:36 PM Page 8

# आर्थिक शिस्तीला प्राधान्य



सुधीर मुनगंटीवार

राज्याची आर्थिक घडी म्हणावी तशी नीट नसून आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचा प्रयत्न नवीन वर्षात प्राधान्याने करावा लागणार आहे. त्यासाठीचे नियोजन प्रामुख्याने अर्थखात्याचे असल्यामुळे राज्याच्या तिजोरीचा प्रवास खडखडाटाकडून खणखणाटाकडे नेण्याचा संकल्प राज्याचे वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नववर्षाच्या निमित्त केला आहे. रोजगार निर्मिती व सकल उत्पादन वाढविणे ही आमची प्राथमिकता आहे. शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांना अनुकूल वातावरण तयार करून राज्याचा विकास करण्याचा सरकारचा मानस आहे.

सध्या महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असून सोबतच काही भागात अवकाळी पावसाने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे हा विश्वास शेतकऱ्यांत निर्माण केला जाईल त्यासाठी कर्ज काढून शेतकऱ्यांना मदत करू.

राज्याच्या सर्वांगीण विकासासोबतच प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी सरकार कटिबद्ध असून अर्थखात्याची भूमिका महत्त्वाची असणार आहे. राज्याची तिजोरी भरणाऱ्या विभागात उत्साहाचे वातावरण तयार केले जाईल.

राज्याची लोकसंख्या आणि पायाभूत सुविधांवर पडणारा ताण लक्षात घेता कर्ज काढावे लागणार आहे.

**शब्दांकन – रवी गिते**

## संकल्पाची दिशा

- रोजगार निर्मिती व सकल उत्पादन वाढवण्याला प्राथमिकता
- शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांना अनुकूल वातावरण तयार करणार.
- राज्याच्या तिजोरीवर अधिक भार पडू नये म्हणून केन्द्र सरकारच्या योजना जास्तीत जास्त राबवण्यावर भर
- योग्य पद्धतीने कर्जाच्या वापराकडे कटाक्षाने लक्ष
- आवश्यक तेथे संगणकीकरण करुन केंद्राच्या योजनांचा पाठपुरावा करण्यावर भर
- सर्वसामान्यांच्या हिताला डोळ्यासमोर ठेवून योजना आखून त्यानुसार नियोजन
- सर्व विभागांशी समन्वय साधून विकासाच्या योजना व कामे प्राधान्याने पूर्ण करणार
- वन्यप्राणी शहरात येऊ नये यासाठी जंगलक्षेत्र वाढविण्याला प्राधान्य

# लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण



विनोद तावडे

आपल्याकडे असलेल्या विभागात आवश्यकता असेल तिथे योग्य बदल करून हे विभाग अधिकाधिक लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा संकल्प शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी केला आहे.

आपल्याकडे शिक्षणावर जो एकूण खर्च होतो, त्यातला ६० टक्के खर्च हा शिक्षकांच्या आस्थापनेवर होतो. तो खर्च आपण फुकाचा समजतो पण माझ्या मते हा खर्च भविष्याची गुंतवणूक म्हणून करतो त्याचा परतावा म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच उत्तम कौशल्यपूर्ण मानवी बळ निर्माण करणे हा आहे. शिक्षकांच्या पगाराच्या बदल्यात समाजाला जे देणे लागते त्याची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करुन तसे काम त्यांच्याकडून करून घेणे.

मराठीमध्ये जवळपास ६० बोलीभाषा आहेत, त्या बोलीभाषांचे जतन करून त्या भाषांचे संदर्भकोश निर्माण करून ती भाषा लिहती करण्याचा प्रयत्न केला जाईल. आजपर्यंतचे चित्रपट आणि नाट्य पुरस्कार या क्षेत्राच्या बाहेरच्या किंवा मंत्र्यांच्या हस्ते दिले जायचे, तो पायंडा बंद करून याच क्षेत्रातील दिग्गजांच्या हातून हे पुरस्कार आता देण्यात येतील.

**शब्दांकन – युवराज पाटील**


## संकल्पाची दिशा

- विद्यार्थी केंद्रित नियोजनावर अधिक भर
- अभ्यासक्रम अधिक प्रात्यक्षिकांवर भर असलेला आणि व्यवसायाभिमुख करणार
- महाविद्यालयीन आणि व्यावसायाभिमुख शिक्षण संस्थांतील प्रवेश पारदर्शक करणार
- मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करून मराठी भाषेच्या उत्थानासाठी अधिकाधिक साहित्यिकांचा सक्रिय सहभाग वाढवणार
- केंद्राकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी पाठपुरावा करणार
- महाविद्यालयात निवडणुकांमध्ये महत्त्वाचे बदल करून पुन्हा महाविद्यालयीन निवडणुका घेणार

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 9

२०१५
नवे वर्ष
नवे संकल्प
॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥

# परवडणारी घरे बांधणार



प्रकाश महेता

सर्वसामान्यांना तसेच मध्यमवर्गीयांना म्हाडाची घरे परवडतील असे धोरण आखण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. येत्या पाच वर्षात ११ लाख घरे बांधण्यात येतील. त्या दृष्टीने योजनांचा कालावधी निश्चित केला जाईल. निर्धारित कालावधीत योजना पूर्ण झाल्या तर घरांच्या किंमतीही आटोक्यात राहतील. यासाठी आराखडा तयार करण्याचा संकल्प गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता यांनी केला आहे.

काही जिल्ह्यांमध्ये जागा असूनही त्यांचा वापर का झाला नाही याचा अभ्यास करून एक आराखडा तयार केला जाईल. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी जलदगतीने कशी होईल याकडे लक्ष देणार आहे.

अनेक ट्रस्टच्या मोठ्या खाजगी जागा आहेत. त्यावर झोपडपट्टी झाली आहे, त्या जागा पूर्ववत करण्यासाठी विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. या जागांवर पुनर्वसन झाले नाही तर त्या ताब्यात घेण्यात येतील. कोणताही प्रकल्प मुदतीत पूर्ण झाला नाही तर अनेक प्रश्न निर्माण होतात म्हणून हे प्रकल्प मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

एसआरए योजनेचे महत्त्व पटवून देण्यासाठी चांगल्या सवलतींबरोबर जाणीव जागृतीची मोहीम हाती घेण्यात येईल.

**शब्दांकन – आकाश जगधने**

## संकल्पाची दिशा

- प्रत्येक जिल्ह्यात म्हाडाची वसाहत निर्माण करण्याचे धोरण
- एसआरए योजना अधिक पारदर्शी केल्या जातील
- झोपडीमुक्त शहर निर्माण करण्याला प्राधान्य
- कामगार हिताबरोबरच उद्योगांचे हित याची योग्य सांगड घालणार
- असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता, विमा, भविष्य निर्वाह निधी मिळण्याकडे प्राधान्याने लक्ष

# टोलमुक्त महाराष्ट्र आणि पारदर्शक सहकार



चंद्रकांत (दादा) पाटील

संपूर्ण महाराष्ट्र राज्य टोलमुक्त करणे, सहकार क्षेत्राचा कारभार पारदर्शक करणे याबरोबरच राज्यातील बाजार समित्यांच्या कारभारात व्यापक सुधारणा करून शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव उपलब्ध करून देण्यासाठी आपण नव्या वर्षात व्यापक कार्य करणार आहोत, असे सहकार, पणन, वस्त्रोद्योग तसेच सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाचे मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी लोकराज्यला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले. वस्त्रोद्योगाला चालना देऊन कापूस उत्पादित करणाऱ्या विदर्भ, मराठवाडा, खानदेश आदी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्याचेही आपले ध्येय असल्याचे ते म्हणाले.

**टोलमुक्त आणि खड्डेमुक्त महाराष्ट्र**

येत्या काळात टोलसंदर्भातील व्यापक आढावा घेऊन संपूर्ण राज्य टप्प्याटप्प्याने टोलमुक्त करण्याचा माझा मानस आहे.

रस्ते बांधणीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो पण अवघ्या काही काळातच रस्त्यांवर खड्डे पडून त्यांची दुर्दशा होते, असे लक्षात आले आहे. यापुढील काळात हे थांबविण्यासाठी किमान ५ ते १० वर्षांसाठी त्या रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर निश्चित करण्याचे नियोजित आहे.

**शब्दांकन – इर्शाद बागवान**

## संकल्पाची दिशा

- संपूर्ण महाराष्ट्र टोलमुक्त
- सहकार क्षेत्रात अधिक पारदर्शकता
- बाजार समित्यांच्या कारभारात व्यापक सुधारणा
- वस्त्रोद्योगाला चालना
- कापूस उत्पादित करणाऱ्या विदर्भ, मराठवाडा, खानदेश आदी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती
- ५ ते १० वर्षांसाठी रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर निश्चित करणार
- शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ आणि मालाला चांगला भाव मिळवून देण्यासाठी नागपूर येथे उच्च दर्जाचे टर्मिनल मार्केट

# गावांचा विकास आणि कुपोषणमुक्ती

महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये संगणक आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देऊन त्या हायटेक करणे, गावोगावी जलसंधारणाचे छोटे-मोठे प्रकल्प राबवून महाराष्ट्र दुष्काळमुक्त करणे, रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक हाताला काम उपलब्ध करून देणे याबरोबरच महिलांची सुरक्षितता आणि कुपोषणमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचे माझे स्वप्न आहे, असे ग्रामविकास व जलसंधारण आणि महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी सांगितले.



**पंकजा मुंडे-पालवे**

सिंचनाची समस्या मिटावी म्हणून बीड जिल्ह्यातील परळी आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये मी राबवलेल्या वैद्यनाथ पॅटर्नची राज्यस्तरावर अंमलबजावणी केली जाईल. तलाव-विहिरींचे खोलीकरण, छोट्या-मोठ्या बंधाऱ्यांचे लोकसहभागातून बांधकाम, नाले खोदाई, आदी विविध उपक्रम राबवून साधारण १० गावे जलस्वयंपूर्ण केली आहेत. राज्यस्तरावर हा पॅटर्न राबवून राज्य दुष्काळमुक्त केले जाईल.

महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात कडक उपाययोजना केल्या जातील. मुख्यमंत्री सडक योजना मूर्त स्वरूपात आणून महाराष्ट्राचा ग्रामीण, दुर्गम आणि डोंगराळ भाग बारमाही रस्त्यांनी जोडला जाईल. डोंगराळ भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शासकीय योजना एकात्मिक स्वरूपात राबवल्या जातील. बालकांना पुरेसा आहार, योग्य वेळी लसीकरण, गरोदर मातांचे पोषण आदींसाठी भरीव उपाययोजना केल्या जातील.

**शब्दांकन - इर्शाद बागवान**

## संकल्पाची दिशा

- पंतप्रधानांच्या संसद ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार ग्राम योजना राबवणार
- सर्व गावे रस्त्यांनी जोडण्याच्या दृष्टीने राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबवणार
- राज्याच्या दुष्काळी भागात जलसंधारणाचे छोटे-मोठे प्रयोग राबवून गावोगावी जलक्रांती घडवून गावे जलस्वयंपूर्ण करणार
- महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य
- संपूर्ण महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्यावर भर
- महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत आवश्यक फेरबदल करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी
- स्थानिकांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबविणे तसेच गावांचा कायापालट करण्याला प्राधान्य

# आदिवासींना मुख्य प्रवाहात आणणार

आदिवासी समाजाची सर्वांगीण उन्नती साधतानाच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी केला आहे. आदिवासी समाजाच्या तसेच आदिवासीबहुल गावांच्या विकासाची ब्लू प्रिंट माझ्या मनात तयार आहे.



**विष्णू सवरा**

आदिवासींच्या रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. त्यासाठी स्थानिक तरुणांना उदरनिर्वाहासाठी उपयुक्त रोजगाराभिमुख व्यावसायिक शिक्षण देण्यात येईल. मुलांना दर्जेदार शिक्षण मिळेल याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात येईल. कारखाने, उद्योग यांना कौशल्यपूर्ण मनुष्यबळ पुरवून बेरोजगारीची समस्या दूर केली जाईल. कुपोषणाचे निर्मूलन करण्यासाठी युतीच्या काळातील जीवनदायी योजना पूर्ववत सुरू करण्यात येईल.

आदिवासी गावांचा समूह निर्माण करून पाणी साठविण्यासाठी आवश्यक गाव तलावांची दुरुस्ती तसेच शेततळे आदी कामे हाती घेतली जातील. आदिवासी विकासाची कामे अधिक गतीने करण्यासाठी आदर्श यंत्रणा उभी केली जाईल.

प्रत्येक प्रकल्प कार्यालयांतर्गत एका गावात सर्व प्रकारच्या शासकीय विकास योजना समन्वित पद्धतीने राबवणार आहे.

**शब्दांकन - संतोष तोडकर**

## संकल्पाची दिशा

- आदिवासींना घटनात्मक संरक्षण देण्याबरोबरच त्यांच्या क्षेत्रात त्यांना स्वयंशासन राबवता येण्यासाठी प्रयत्न करणार
- आदिवासींसाठी विविध विभागांच्या असलेल्या अनेकविध योजनांचे सुसूत्रीकरण करणार
- आदिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या नव्या योजना सुरू करणार
- योजनेच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामस्थांचा सहभाग घेणार
- वाड्या, पाड्यांच्या विद्युतीकरणाचा धडक कार्यक्रम राबवणार
- वन जमिनींचे पट्टे तत्काळ देणार
- आदिवासींना जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी जिल्ह्यात एक समिती स्थापन करणार

# गरिबांना मिळेल सुलभतेने अन्नधान्य



गिरीश बापट

गरिबातील गरिबांच्या अन्नधान्याच्या गरजा सहज आणि सुलभतेने पूर्ण करण्याचा कसोशीने प्रयत्न करू, असा संकल्प अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री गिरीश बापट यांनी केला आहे. दारिद्र्यरेषेखालील नागरिकांसोबत दारिद्र्यरेषेवर असलेल्या नागरिकांनाही आपण धान्याचा स्वस्त दरात पुरवठा करतो. वेगवेगळ्या प्रकारच्या शिधापत्रिका आपण लाभार्थ्यांना वितरित केल्या आहेत. त्या प्रत्येक लाभार्थ्याला पुरेसे आणि गरजेप्रमाणे धान्य मिळणे आवश्यक आहे. अन्नधान्याच्या बाबतीत नेहमीच काळाबाजारीची चर्चा होते. काही ठिकाणी वाटपात गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारीही होत असतात. अशा प्रकारचा काळाबाजार किंवा गैरप्रकार होणार नाही. अन्नधान्याचे वितरण हे अतिशय सामान्य आणि गरीब माणसांशी निगडित असल्याने ते व्यवस्थितच झाले पाहिजे. त्यामुळे ही व्यवस्था अधिक पारदर्शी व्हावी तसेच वितरणाची माहिती संबंधितांना तातडीने मिळावी यावर भर राहणार आहे. अन्न व औषध प्रशासन हे सुद्धा महत्त्वाचे खाते आहे. राज्यातील सामान्यातील सामान्य माणसास स्वस्त दरात औषधे मिळावी, असा माझा प्रयत्न राहणार आहे. अन्न व औषधांमधील काळाबाजार हीसुद्धा एक समस्या आहे. थेट मानवाच्या आरोग्याशी संबंधित असलेले खाद्यपदार्थ, विविध प्रकारची खाद्यउत्पादने, औषधे यांची गुणवत्ता प्राधान्याने तपासली जाणार आहे.

**शब्दांकन – मंगेश वरकड**

२०१५
नवे वर्ष
नवे संकल्प

॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥

## संकल्पाची दिशा

- राज्यातील अन्नधान्याची वितरण व्यवस्था मजबूत आणि पारदर्शक करणार
- वितरण व्यवस्थेतील दलालशाही संपुष्टात आणणार
- अन्नधान्याच्या वितरणाची माहिती संबंधितांना तातडीने मिळावी यावर भर देणार
- वितरण व्यवस्थेत शासन, ग्राहक आणि लाभार्थी असे मध्यस्थीशिवाय थेट संबंध निर्माण करणार

# सिंचन क्षेत्र वाढवणार



गिरीश महाजन

सिंचन प्रकल्पांचा शेतीला प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी प्रलंबित कामे पूर्ण करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणार असून, पाण्याच्या बचतीसाठी सूक्ष्म सिंचनाचे क्षेत्र वाढवणे व कार्यक्षम अधिकाऱ्यांना प्रोत्साहित करत प्रशासनाला दिशा व गती देत ते लोकाभिमुख करणे, असा संकल्प जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे.

ज्या धरणांचे ७५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे, ती सर्वप्रथम पूर्ण केली जातील. त्यानंतर अपूर्णावस्थेतले इतर प्रकल्प पूर्ण केले जातील. गोसीखुर्दसारख्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, त्याच्या कालवे व वितरिकांचे काम अपूर्ण आहे. प्रकल्पाच्या नियोजनानुसार जमीन सिंचनाखाली आलेली नाही. ही कामे येत्या पाच वर्षांत पूर्ण करण्यात येतील. प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वर्षानुवर्षे मिळत नसल्याने शेतकऱ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. मात्र, यापुढे असे होणार नाही. यापुढे पुनर्वसन अधिकाऱ्यांकडून प्रत्येक आठवड्याला ठरावीक ठिकाणी शेतकऱ्यांना भेट देऊन त्यांच्या अडचणी सोडविल्या जातील.

जलसंपदा खाते हे शेतकऱ्यांशी निगडित असलेले खाते आहे. या खात्याची जनमानसातील प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न केला जाईल.

**शब्दांकन – हर्षवर्धन पवार**

## संकल्पाची दिशा

- प्रथम पुनर्वसन, नंतर धरण अशा नियोजनाला प्राधान्य
- ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न
- सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी मोठ्या धरणांप्रमाणेच लहान बंधारे बांधण्यावर भर
- निधीअभावी अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यास प्राधान्य
- केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा पाठपुरावा करून अधिकाधिक निधी मिळवण्याचा प्रयत्न
- मेरी (महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट) सारख्या संस्थांची गुणवत्ता व दर्जा आणखी वाढावा यासाठी विशेष प्रयत्न

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 12

# परिवहन विभागाचे कामकाज गतिमान करणार

परिवहन कार्यालयातील कामकाज पारदर्शक व गतीमान होण्यासाठी सर्व परिवहन कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येतील. त्यामुळे परिवहन विभागाचे कामकाज पारदर्शक व गतिमान होण्यासाठी मदत होईल, असे परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी सांगितले. राज्यातील परिवहन कार्यालये संगणकीकृत करण्यात आली असून वाहन चालविण्याचा परवाना संबंधित व्यक्तींना त्यांच्या निवासी पत्त्यावर पाठविण्यात येत आहे. परिवहन कार्यालयात बेकायदेशीर कामे करण्यासाठी अनधिकृत व्यक्तींना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली जाईल. राज्यात वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे परिवहन विभागाची जबाबदारी वाढलेली आहे. सध्या आकारण्यात येणारे ड्रायव्हिंग लायसन्ससाठीचे शुल्क १५ वर्षापूर्वी निश्चित करण्यात आले असून हे शुल्क अतिशय कमी आहे, त्यामुळे या शुल्कात योग्य वाढ करण्याचा मनोदय आहे. यामुळे शासनाच्या महसुलात वाढ होईल. सध्या काही काळ्यापिवळ्या टॅक्सीला एअर कंडीशनर असूनही एअर कंडीशनर लावले जात नाही. त्यामुळे प्रवाशांनी मागणी केल्यास अशा टॅक्सींना एअर कंडीशनर लावून अधिक शुल्क आकारून परवानगी देण्याचे विचाराधीन आहे. परिवहन विभागाचे सध्या भरारी पथक कार्यरत आहे. त्याबरोबर दक्षता पथक स्थापन करून विभागाचे कामकाज अधिक प्रभावी करण्यात येणार आहे.


**दिवाकर रावते**

**शब्दांकन – विलास बोडके**

## संकल्पाची दिशा

- वाहन मालकांसाठी त्यांच्या कामासंबंधीची माहिती एसएमएसद्वारे
- मोटार वाहन अधिनियम १९८८ मध्ये सुधारणा करून परिवहन विभागात आमूलाग्र बदल
- शहरी भागामध्ये शेअर टॅक्सी व शेअर रिक्षा यासाठी थोडे अधिक शुल्क आकारून स्वतंत्र परवाने दिल्यास शासनाच्या महसुलात वाढ होण्याची शक्यता
- परिवहन विभागाच्या कामकाजाचा निपटारा जलदगतीने होण्यासाठी विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यासाठीही प्रयत्न
- नवीन रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून असे प्रकल्प केंद्र शासनाच्या खर्चाने उभारण्याचा मानस. यामुळे राज्य शासनाच्या खर्चात साधारणपणे ५००० कोटी रुपयांची बचत

# २० लक्ष लोकांसाठी रोजगार निर्मिती

राज्यास औद्योगिक समृद्धीकडे नेण्यासाठी किमान १३ % औद्योगिक वाढ करण्याचे उद्दिष्ट ठरविले असून, राज्य सकल उत्पन्नातील उत्पादन क्षेत्राचा हिस्सा २८ टक्के होण्यासाठी आणि त्याद्वारे २० लक्ष लोकांसाठी रोजगार निर्मिती व्हावी म्हणून ५ लक्ष कोटी गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. याद्वारे आपण महाराष्ट्राला देशात अग्रेसर करू असा संकल्प उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी केला आहे. 'मेक इन महाराष्ट्र' यशस्वी झाल्यास 'मेक इन इंडिया'ही यशस्वी होईल. विदर्भातील ३८ मोठ्या तसेच ३६ लघुउद्योग औद्योगिक क्षेत्रांच्या संपूर्ण विकासाचे लक्ष ठरविण्यात आले आहे. बुटीबोरी आणि अमरावती – नांदगावपेठ केंद्रामध्ये पूर्णक्षमतेने उद्योग यावेत म्हणून अधिक प्रमाणात प्रयत्न सुरू झाले आहेत. नागपुरात दोन माहिती व तंत्रज्ञान उद्याने तसेच ॲपेरेल पार्क व फूड पार्क विकसित झाले आहे. विदर्भातील उद्योगांचे जाळे भक्कम करण्यासाठी पेट्रोलियम रिफायनरी, संरक्षण सामग्री निर्माण, ऑटो कॉम्पोनंट हब, स्टील प्लांट, खत कारखाना, वस्त्रोद्योग, खनिज आधारित उद्योग असे महत्त्वपूर्ण उद्योग सुरू होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महाराष्ट्रात येणाऱ्या गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी साधीसोपी नियमावली, त्याचप्रमाणे अधिकाधिक आकर्षक सेवा सुविधा पुरविल्या जातील.


**सुभाष देसाई**

**शब्दांकन – नंदू पुजारी**

## संकल्पाची दिशा

- ५ लक्ष कोटी गुंतवणुकीचे उद्दिष्ट
- २० लक्ष रोजगार निर्मिती
- राज्य सकल उत्पन्नातील उत्पादन क्षेत्राचा हिस्सा २८ टक्के करण्यासाठी प्रयत्न
- राज्यास औद्योगिक समृद्धीकडे नेण्यासाठी किमान १३ % औद्योगिक वाढ करण्याचे उद्दिष्ट
- 'मेक इन महाराष्ट्र' कार्यक्रम यशस्वी करून राज्याला देशात औद्योगिक आणि गुंतवणुकीत अग्रेसर करणार
- गुंतवणूकदारांना ७० ते ७६ परवाने घ्यावे लागतात ते कमी करून २५ पर्यंत आणण्यात येतील.
- विदर्भातील उद्योगांचे जाळे भक्कम करण्यासाठी पेट्रोलियम रिफायनरी, संरक्षण सामग्री, ऑटो हब, स्टील प्लांट, खते, वस्त्रोद्योग, खाणी आदी उद्योग सुरू करण्यात येतील.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 13

# पर्यावरण आणि विकासाची सुयोग्य सांगड

विकासाचे अनेक प्रकल्प केंद्रीय पर्यावरण विभागाकडे परवानगीसाठी प्रलंबित राहतात यामुळे विकासाची गती कमी होते. यासाठी केवळ प्रस्तावाची फाइल केंद्राकडे न पाठविता स्वत: केंद्रीय मंत्र्यांकडे जाऊन प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचा संकल्प पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी केला आहे.



रामदास कदम

कोकण किनारपट्टीवर पर्यटनासाठी मोठी संधी आहे. कोकणवासियांना रोजगाराची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर यातून शक्य आहे. म्हणून या किनारपट्टीचा पर्यटनदृष्ट्या विकास करणे महत्त्वाचे आहे. तथापि, पर्यावरणाला धक्का लागणार नाही आणि जैवनैसर्गिक पर्यावरण अबाधित राहील ही बाब लक्षात घेऊन आपण कोकणमध्ये पर्यटन क्षेत्रावरील प्रकल्पांना मंजुरी देण्याचा प्रयत्न करणार आहोत. मुंबईत तसेच अन्य महानगरपालिका, नगर पालिका यांच्या विकास आराखड्यांना परवानगी मिळत नसल्याने घनकचऱ्याचा प्रश्न भेडसावत आहे. यासाठी शासन विकास आराखड्यांना परवानगी देईल. वाळू, दगड, खडी या उद्योगात मोठा रोजगार आहे. बांधकाम क्षेत्राला लागणारा आवश्यक माल मिळणे कठीण असते. या प्रश्नांचा साकल्याने विचार करून प्रदूषणाला आळाही बसेल व या उद्योगातील रोजगारालाही धक्का लागणार नाही याची काळजी आपण घेणार आहोत.

**शब्दांकन – आकाश जगधने**

२०१५ नवे वर्ष नवे संकल्प

॥ घडत आहे नवा महाराष्ट्र ॥

## संकल्पाची दिशा

- पर्यावरण आणि विकास यांची योग्य सांगड घालण्यावर भर
- प्रदूषणकारी कारखान्यांवर कडक कारवाई
- घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी धोरण बनविण्यात येईल
- नद्यांमधील प्रदूषण टप्प्याटप्प्याने कमी करण्यावर भर
- नद्या आणि जलाशय स्वच्छ करण्यावर भर
- तिवरांचे संवर्धन, वृद्धी व त्यांचे शास्त्रोक्तपणे व्यवस्थापन करणार

# उत्तम पायाभूत सुविधांची निर्मिती

उपलब्ध पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा व काही नवीन प्रकल्प हाती घेऊन उत्तम पायाभूत सुविधा नागरिकांना आणि उद्योगधंद्यांना उपलब्ध करून देण्याचा संकल्प सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते, महामार्ग व वाहतूक व्यवस्थेत सुरक्षितता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील.



एकनाथ शिंदे

अधिक उद्योगधंदे राज्यात येण्यासाठी दळणवळण यंत्रणा सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल. शहरातील रस्ते, उड्डाणपूल, काही ठिकाणी नव्या रस्त्याचे तसेच भुयारी मार्ग, उन्नत मार्ग, जलवाहतूक प्रकल्पाचे बांधकाम केले जाईल. शहरांना जोडणारे रस्ते, राज्य महामार्ग, द्रुतगती मार्ग यांचा विस्तार व क्षमतावाढ केला जाईल. दुसऱ्या राज्यांना जोडणारे सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण प्राधान्याने पूर्ण केले जाईल. विकसित होत असलेल्या शहरातही उड्डाणपूल व रस्ते रुंदीकरणाचे काम किंवा बायपास बांधकाम करण्यात येणार आहे. महामंडळाने खासगीकरणाच्या माध्यमातून पूर्ण केलेल्या रस्त्यांवरील पथकरासंदर्भात अभ्यास करण्यासाठी ११ सदस्यांच्या अभ्यासगटाची नुकतीच नेमणूक केली आहे. या अभ्यासगटाचा अहवाल आल्यानंतर पथकरासंदर्भात योग्य तो निर्णय लवकर घेण्यात येईल. पथकराचे प्रमाण कमीत कमी करण्याचा माझा प्रयत्न आहे.

**शब्दांकन – विष्णू काकडे**

## संकल्पाची दिशा

- राजीव गांधी सागरी सेतू (सी–लिंक) पुढे वांद्रे ते वर्सोवापर्यंत नेणार
- मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावर जलवाहतूक सुरू करण्याकडे प्राथमिकतेने लक्ष देणार. नरिमन पॉईंट ते बोरीवली अशी प्रवासी जलवाहतूक सुरू करण्याचे प्रयत्न
- राज्याच्या २० वर्षीय रस्ते विकास कार्यक्रमाचे नियोजन करून सर्व प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी कृती आराखडा
- वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि शहरांतर्गत वाहतूक गतिमान करण्यासाठी मुंबई, ठाणे शहरांप्रमाणेच इतर शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे उड्डाणपूल बांधणार

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 14

# वीज गळती कमी करणार

वीजवितरणासाठी उपयोगात येणाऱ्या विद्युत वाहिनी या साधारणत: ३०-४० वर्षे जुन्या आहेत. त्यामुळे वीजहानीचे प्रमाण वाढले आहे. भविष्यात ही हानी दूर करण्याकरिता जुन्या लाइन दुरुस्त करण्यात येऊन नवीन करण्यात येईल. तारेऐवजी काही अडचणीच्या भागात भूमार्गे लाईन टाकण्याची योजना आहे. ती अमलात आणण्यात येईल. पायाभूत विकास योजना टप्पा दोनची प्रक्रिया सुरू झाली आहे. यात अतिरिक्त वीज उपकेंद्रे, उच्च व लघुदाब वाहिन्या मोठ्या प्रमाणात उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे वीज गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असे ऊर्जा, नवीन व



चंद्रशेखर बावनकुळे

नवीकरणीय ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नव वर्षातील संकल्पाची दिशा स्पष्ट करताना सांगितले.

शेतकऱ्यांचे जवळपास १० हजार कोटींचे कृषी पंपाचे थकीत बिल सध्या वसूल न करता वीजजोडणी यथास्थितीत ठेवण्यात येईल. कोराडी आणि चंद्रपूर येथील विस्तारित प्रकल्पासाठी नजीकच्या ४२ कोळसा ब्लॉकची निवड केली आहे.

याशिवाय महाजेनकोला वेकोली क्षेत्रात स्वत:ची कोल वॉशरीज सुरू करण्यास सांगितले आहे. यामुळे स्वस्त आणि स्वच्छ कोळसा कंपनीला मिळेल.

**शब्दांकन - अनिल ठाकरे**

## संकल्पाची दिशा

- लांब पल्ल्याच्या वाहिन्या कमी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान पाच ते सात वीज उपकेंद्र
- नवीन वीज निर्मिती केंद्रात ०.२ टक्के प्रदूषण होत असून भविष्यात हे प्रमाण शून्य टक्क्यांवर आणण्यावर भर
- विदर्भातील वातावरण अपारंपरिक ऊर्जेसाठी पोषक असल्याने सौर ऊर्जा निर्मिती करण्यावर अधिक भर
- नागपूरचा सोलर सिटी म्हणून विकास
- वीज खर्चाची माहिती ऑनलाईन देणार
- ३१ ऑक्टोबरला समाप्त झालेल्या कृषी संजीवनी योजनेला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ. त्याअंतर्गत थकीत बिलाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना मुद्दलासह व्याजात सवलत

# शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा

शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला शुद्ध पाणी मिळवून देण्याचा संकल्प पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी केला आहे. गुजरातच्या धर्तीवर संयुक्त पाणी पुरवठा योजना राबवण्यात येईल. या योजनेद्वारे घराघरात शुद्ध आणि स्वच्छ पाणी पुरवण्यात येईल. या योजनेद्वारे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका अशा संस्थांमार्फत पाणीपुरवठा केला जातो या सर्व क्षेत्रांमध्ये समन्वय साधण्यात येईल. राज्यामधील अनेक योजना ५ ते १५ वर्षांपासून बंद आहेत तर काही पाणी पुरवठ्याच्या योजना ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. परिणामी देखभाल



बबनराव लोणीकर

दुरुस्तीअभावी त्या बंद पडल्या आहेत. या योजनांच्या दुरुस्तीकडे प्राध्यान्याने लक्ष पुरवले जाईल. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या योजनेद्वारे २०१४-१५ साठी एकूण १३२६७ गावे/वाड्यांचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून ४२०० गावे/वाड्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्याद्वारे या गावांमध्ये शुद्ध, सुरक्षित, पुरेसे व घरापासून योग्य अंतरावर पाणी पुरवठा केला जाईल. नागरिकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतेची जाणीवजागृती करून स्वच्छ भारत निर्माणासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

**शब्दांकन - मुकुंद चिलवंत**

## संकल्पाची दिशा

- संयुक्त पाणी पुरवठा योजनेद्वारे घरा-घरात शुद्ध आणि स्वच्छ पाणी पुरवण्यात येईल. या योजनेद्वारे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका अशा संस्थामार्फत पाणीपुरवठा केला जातो या सर्व क्षेत्रांमध्ये समन्वय साधण्यात येईल.
- जीवन प्राधीकरण योजना, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, भुजल सर्वेक्षण विभाग, नगरविकास पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा असे वेगवेगळे विभाग एका छत्राखाली आणून पाणी पुरवठ्याबाबत सुसूत्रता आणणार
- ग्रामीण भागात शुद्ध, सुरक्षित, पुरेसे तसेच घरापासून योग्य अंतरावर पाणी पुरवठा केला जाईल.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 15

२०१५ नवे वर्ष नवे संकल्प

|| घडत आहे नवा महाराष्ट्र ||

# वैद्यकीय सेवांचा दर्जा वाढवणार



**डॉ. दीपक सावंत**

राज्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यासाठी उपाययोजना व कार्यक्रम राबवणे यास प्राधान्य असणार आहे. वैद्यकीय सेवेचा आढावा घेऊन त्यात कशा प्रकारे सुधारणा करता येतील, याचा अभ्यास करून जनतेला मिळणाऱ्या वैद्यकीय सेवांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी केला आहे.

ग्रामीण भागातील विशेषत: दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, कुटीर रुग्णालये, शासकीय जिल्हा रुग्णालये यामध्ये पुरविल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवांचा आढावा घेण्यात येईल. या रुग्णालयांची कमतरता दूर करणे ही आपली प्राथमिकता आहे. अद्ययावत उपकरणे व मुबलक औषधांचा साठा उपलब्ध करणे यावरही भर दिला जाईल. या ठिकाणी डॉक्टरांच्या नेमणुकाही करण्यात येतील. सिटी-स्कॅन यंत्रापासून अनेक यंत्रे नादुरुस्त असतात. ही परिस्थिती बदलण्यात येईल.

मनोरुग्णालयांमध्ये सुधारणा घडवल्या जातील. ऑटिझम, लर्निंग डिसॅबिलिटी या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकांना दिलासा दिला जाईल.

दुर्गम भागात टेलिमेडिसीन पद्धतीला अधिकाधिक प्राधान्य देणार.

**शब्दांकन – प्रकाश मळेवाडकर**

## संकल्पाची दिशा

- साथीच्या रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर भर
- यथायोग्य धोरण आखून आदिवासी व ग्रामीण भागांमध्ये दवाखाने आणि वैद्यकीय केंद्रे उभारण्यास चालना
- प्रत्येक जिल्ह्यात टप्प्या-टप्प्याने परंतु कालबद्धरीतीने बहु-विशेषत: रोग निदान केंद्रांची उभारणी

# सामाजिक न्यायाचे बळकटीकरण



**राजकुमार बडोले**

अनुसूचित जाती, नवबौद्ध, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गीय घटकांना विविध योजनांचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाच्या सुसूत्रीकरण आणि बळकटीकरणावर भर देण्याचा संकल्प सामाजिक न्याय व विशेष सहायमंत्री राजकुमार बडोले यांनी केला आहे. सामाजिक न्याय विभागाचे संगणकीकरण केले जाईल. सोशल मीडीयाचा प्रभावी वापर करून सामाजिक न्याय विभागांच्या योजनांचा प्रचार-प्रसार करण्यात येईल. दुर्बल उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी योजनांची फलनिष्पत्ती दिसण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेमध्ये सुधारणा करण्यात येईल.

मागासवर्गीय बेरोजगार तरुणांसाठी रोजगाराभिमुख नव्या योजना सुरू करण्यात येतील. मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, शिक्षणशुल्क आदी योजनांचा लाभ देण्याकरिता योजनांमध्ये सुधारणा केल्या जातील. स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात येतील. सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या विविध महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या नियंत्रणासाठी राज्यपातळीवर संनियंत्रण समिती स्थापण्यात येईल.

**शब्दांकन – विवेक खडसे**

## संकल्पाची दिशा

- सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची अंमलबजावणी तालुका पातळीवर करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी कार्यालये स्थापन करणार
- विशेष सहाय योजनांचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्यासाठी संनियंत्रण व मूल्यांकन समितीची स्थापना करणार
- लाभार्थ्यांच्या गरजेनुसार योजना तयार करणार
- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या संख्येच्या आधारावर जिल्हा व तालुका पातळीवर वसतिगृह उभारणार
- दलित वस्ती सुधार योजनेचे पुनर्विलोकन करणार
- अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कक्ष स्थापणार

# घोषणा नव्हे... कृती आराखडा

**नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारने अनेक सकारात्मक घोषणा केल्या. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी सात हजार कोटी रुपयांचे भरघोस पॅकेज जाहीर केले. त्याचबरोबर शिक्षण, पोलीस खाते, पर्यावरण, सुप्रशासन, सिंचन, उद्योग, पर्यटन अशा विविध क्षेत्रातील रेंगाळलेल्या कामांना गती देण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेतले. राज्याचा समतोल विकास घडवण्याच्या उद्देशाने नव्या सरकारने आपल्या पहिल्याच अधिवेशनात मागास आणि अविकसित भागांसाठी खास योजना तयार केल्या आहेत. नागपूर अधिवेशन हे या अर्थाने राज्याला विकासाच्या दिशेने नेणारी नांदीच ठरली आहे.**



शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 17




**नागपूर अधिवेशनात ११ डिसेंबर २०१४ रोजी सभागृहाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका दूरदृष्टीच्या प्रभावी भाषणाचा अनुभव घेतला. दुष्काळ आणि त्यानंतरच्या पॅकेजमधून सर्व काही आलबेल असल्याचे चित्र निर्माण करण्याची कृत्रिमता त्यात नव्हती. दुष्काळग्रस्त भागाला कायमस्वरूपी उपाययोजना देणारे हे भाषण विधिमंडळातील एक अभ्यासपूर्ण भाषण म्हणून स्मरणात राहील. ज्येष्ठ पत्रकार सुनील कुहीकर यांनी या घटनाक्रमाचा सभागृहातील पत्रकार गॅलरीतून घेतलेला हा आढावा.**

## सुनील कुहीकर

दिवस गुरुवारचा. वेळ दुपारी दोनच्या आसपासची. विधानसभेत आज (११ डिसेंबर) इतिहास घडला होता. राज्यात पहिल्यांदाच सरकार दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढायला निघाले होते. मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून योजनांची बरसात होत होती. आकड्यांची मांडणी होत होती. बरे... आकडे असे वाऱ्यावरचे, वरवरचे नव्हते. त्यामागील तर्क मांडले जात होते. सरकारचे नियोजन अभ्यासाअंती निश्चित झाले असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. प्रत्येक योजना, ती राबवण्यामागील कारण, ती राबवण्याचे भविष्यात दिसणारे परिणाम याची तंत्रशुद्ध माहिती देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करीत होते. त्यांच्या भाषणादरम्यान, आक्षेप नोंदवायला संधीच नव्हती. अगदी भाषण संपवून मुख्यमंत्री खाली बसेपर्यंत हाच क्रम सुरु राहिला होता. घोषणा आणि सत्ताधारी सदस्यांकडून त्यास बाके वाजवून मिळणारा प्रचंड प्रतिसाद...

मुख्यमंत्र्यांचे भाषण संपले की घोषणा द्यायच्या, सरकारला धारेवर धरायचे आणि मग सरकार शेतकरीविरोधी असल्याचा कांगावा करत आरोपांची बरसात करायची, अशा तयारीत विरोधक होते. पण, मुख्यमंत्र्यांच्या मुद्देसूद भाषणाने विरोधकांच्या पूर्वतयारीतील हवा पाऽऽर निघून गेली होती.

आजवर दुष्काळ पडला, त्यात पिकांचे नुकसान झाले की, एकरी किंवा हेक्टरी नुकसानभरपाईची आकडेवारी तेवढी जाहीर केली जायची. लोकांच्या मागण्याही तिथवरच मर्यादित राहायच्या. या संदर्भात विधिमंडळात दोन दिवस चाललेल्या विस्तृत चर्चेदरम्यानही सदस्यांच्या मागण्या हेक्टरी आर्थिक मदतीच्या पलीकडे गेलेल्या नव्हत्या. गणपतराव देशमुख यांच्यासारखा एखाददुसरा सदस्य वगळता, अपवादानेच कुणी दुष्काळावरील कायमस्वरूपी उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली होती.

मात्र, दुष्काळी परिस्थितीचा सखोल अभ्यास करत केंद्र सरकारच्या काही योजनांची सांगड घालून, त्याचबरोबर राज्य सरकारच्याच वेगवेगळ्या योजनांची एकत्र मोट बांधून, दूरगामी परिणाम साधणाऱ्या उपायांचा डोंगरच देवेंद्र फडणवीस यांनी आज उभारला होता. कुणालाच अपेक्षित नसलेल्या गोष्टी राज्य सरकारने स्वत:हुन देऊ केल्या होत्या. सावकारीच्या पाशातून पाच लक्ष शेतकऱ्यांना मोकळे करण्याची बाब विशेष उल्लेखनीय होती. अनेकांसाठी शेततळे, सामुदायिक तळे आणि सिमेंट बंधाऱ्यांच्या सूक्ष्मसिंचनातून दहा लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचित करण्याची कल्पनाही विचारांपलीकडची ठरली होती. विदर्भ–मराठवाड्यात तीन महिन्यांचे वीजबिल माफ करण्याची घोषणा करताना, ही अपवादात्मक मदत असल्याचे सांगायला मुख्यमंत्री विसरले नव्हते. हा कर्तव्यकठोर बाणा होता. त्यांच्या भाषणात शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग न स्वीकारण्याचे भावनिक आवाहन होते. अस्तित्वात असलेल्या योजनांची माहिती होती. नव्या योजनांची कल्पकता होती. संकटात सापडलेल्या जनतेने दिलेल्या सादेला ओ देण्याची तत्परता होती. त्यासाठी निधी उभारण्याचा निर्धार व्यक्त होत होता...

न्याय मिळाल्याने राज्यातील दुष्काळी भागातला शेतकरी मात्र आनंदात आहे. त्याचे वीजबिल माफ झाले आहे. बँकेचे कालपर्यंतचे कर्ज यापुढे आजपासून धरले जाणार आहे. कालपर्यंतचे व्याजही सरकार भरणार आहे. बँकच काय, सावकाराच्या तावडीतूनही आता त्याची मुक्तता होणार आहे... भविष्यातल्या या दुष्काळमुक्त वातावरणाचे श्रेय देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारचे असेल...!

(लेखक नागपूर येथील दैनिक तरुण भारतचे कार्यकारी संपादक आहेत.
**संपर्क** – ०९८८१७१७८३३)

❒ ❒

### कायमस्वरूपी उपाय :

- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ५० लाख हेक्टर क्षेत्रावर, प्रकल्पांची अंदाजित किंमत ६४३७ कोटी रुपये
- आगामी एका वर्षात किमान ५००० गावांना दुष्काळमुक्त करणार
- पुढील ५ वर्षात २.५० लाख शेततळी व ५० हजार सिमेंट नालाबांध बांधण्याचा शासनाचा मानस
- विकेंद्रित साठ्याद्वारे १० लक्ष हेक्टर शेतजमीन ओलिताखाली आणणार
- राज्यात तब्बल २० हजार सामुदायिक शेततळी करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम
- १० हजार शेततळी पूर्ण, राहिलेली शेततळी पुढील २ ते ३ वर्षांत करणार
- पुढील काळात ५ लक्ष सोलर पंप शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याकरिता धोरणात्मक निर्णय
- सिंचन वाढवण्यासाठी प्रतीक्षाधीन असलेल्या सर्व शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत समाविष्ट करणार

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 18

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रमुख घोषणा

## दुष्काळग्रस्तांना मदत

- ३९२५ कोटी रुपयांची थेट मदत. ९२ लाख हेक्टरबाधित शेती पिके आणि २.४४ लाख हेक्टर फळ पिकांच्या बाधित शेतकऱ्यांना फलोत्पादन पिकांवर नुकसानभरपाई देणार. यासाठी ८८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर.
- बागा वाचविण्याकरिता दरहेक्टरी ३५ हजार रुपयेप्रमाणे अनुदान दिले जाईल, २.५० लक्ष हेक्टरवरील दुष्काळी भागात बागा वाचवण्यात येतील.
- फळबागा वाचवण्याकरिता राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत प्रयत्न, पुनरुज्जीवनासाठी प्रतिहेक्टर २० हजार रुपये, एकात्मिक जैविक व कीड व्यवस्थापन १२०० रुपये प्रतिहेक्टर, प्लॅस्टिक मल्चिंग (Plastic mulching) साठी १६ हजार रुपये प्रतिहेक्टर उपलब्ध.
- वैरण विकास कार्यक्रमाकरिता ३७ कोटी ५० लाख उपलब्ध, ३ लक्ष हेक्टर क्षेत्रावर वैरण विकासाची कामे, १०० लक्ष टन हिरवा चारा प्राप्त होणार, १ हेक्टर वैरण पिकाकरिता रुपये १५०० पर्यंतची आर्थिक मदत बियाण्यांच्या स्वरूपात देण्यात येईल.
- दुष्काळग्रस्त भागामध्ये शेती पंपासाठी एका तिमाहीत २१५ कोटी रुपये विद्युतबिल अपेक्षित. सप्टेंबर तिमाहीकरिता दुष्काळी भागात वीजपुरवठा विनामूल्य.
- दुष्काळी भागात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राष्ट्रीयीकृत बँकांकडे सुमारे ८००० कोटी रुपये पीककर्ज थकीत राहण्याची शक्यता. थकीत व्याज ४८० कोटी शासन भरणार.

### सूक्ष्म सिंचनाचे अनुदान


सूक्ष्म सिंचनाचे अनुदान तीन वर्षे ४५० कोटी थकीत असून, यंदा ३२५ कोटी दिले जाणार आहेत. १० लाख हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणले जाईल. उसाचे जास्तीत जास्त क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणले जाईल. तसेच २० हजार सामूहिक शेततळी तयार करून ५ वर्षात ५० हजार सामूहिक शेततळी उभारण्यात येतील.

५ लाख सोलर पंप देण्यात येणार असून त्यासाठी वीजपंपाच्या प्रतीक्षा यादीतील शेतकऱ्यांना सहभागी करुन घेतले जाईल.

### शेती पायाभूत सुविधा खर्चात वाढ

सरकारकडून नुकसानभरपाईपोटी केली जाणारी मदत अत्यल्प आहे. त्यामुळे सूक्ष्म सिंचन, सिंचन सुविधांवरील खर्च वाढवला जाईल. हवामानाचा अंदाज व्यक्त करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. ओलाव्याच्या सुरक्षेच्या तंत्रावर भर दिला जाईल. मागील पाच वर्षांत मदतीसाठी ८३७७ कोटी रुपये दिले आहेत. या काळात शेती विकासावर फक्त २६९२ कोटी खर्च झालेत. आता सरासरी दरवर्षी १६०० कोटी रुपये दिले जाताहेत.

### फळबागा वाचविण्यासाठी विशेष उपाययोजना



**नाशिक जिल्ह्यातील शिंदवड आणि वडनेर भैरव येथे गारपिटीमुळे नुकसान झालेल्या द्राक्षबागेची पाहणी करताना मुख्यमंत्री.**

नाशिक जिल्ह्यातील शिंदवड आणि वडनेर भैरव येथे गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. पाहणीनंतर शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. फडणवीस म्हणाले, 'आच्छादलेल्या बागांचे कमी नुकसान होत असल्याचे पाहणीत आढळून आले. त्यासाठी आवश्यक आच्छादन नेट परदेशातून आयात करावे लागते. ते शेतकऱ्यांना सुलभतेने मिळावे यासाठी योग्य उपाय करण्यात येतील. तसेच फळबागा वाचविण्यासाठी संसाधनांची कमतरता भासू दिली जाणार नाही. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे राहील.'

तत्पूर्वी मुख्यमंत्र्यांनी दिंडोरी तालुक्यातील तळेगाव वणी आणि सोनजांब येथील नुकसानग्रस्त फळबागांची पाहणी केली.



टंचाईग्रस्त भागाची पाहणी करताना केंद्रीय पथक




## दुष्काळ निर्मूलन कार्यासाठी उच्चाधिकार समिती

दुष्काळग्रस्त गावांसाठी तातडीची मदत म्हणून जाहीर केलेल्या ७ हजार कोटी रुपयांच्या आणि येत्या पाच वर्षांत कायमस्वरूपी दुष्काळ निर्मूलन कामासाठी घोषित केलेल्या ३४ हजार ५०० कोटी रुपयांच्या पॅकेजच्या अंमलबजावणीसाठी एका उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय हे समितीचे अध्यक्ष असतील व अर्थ, नियोजन, कृषी, जलसंपदा आणि जलसंधारण आदी विभागांचे प्रधान सचिव आणि सचिव हे या समितीचे सदस्य असतील. ही समिती पॅकेजअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या योजनांचा नियमित आढावा घेऊन काही समस्या असल्यास त्याचे निवारण करणे, निधी उपलब्धतेसाठी विनियोजन आवश्यक असल्यास तसे निर्णय घेणे आदी विषय हाताळेल. दरमहा आयोजित बैठकीत या पॅकेजच्या भौतिक प्रगतीचा आढावा मुख्यमंत्री घेणार आहेत.

भविष्यात शेतीच्या पायाभूत सुविधांवरील खर्च वाढवला जाईल.

### २०१९ पर्यंत कायमस्वरूपी दुष्काळमुक्ती

२०१९ पर्यंत राज्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची योजना राबवली जाईल. यामध्ये तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना असतील. दुष्काळमुक्तीसाठी जलयुक्त शिवार योजना सुरू केली जाईल. विविध योजनांचे सुसूत्रीकरण केले जाईल. पाण्याचे ऑडिट केले जाईल. यात सिंचन आणि बिगरसिंचन पाण्याचा समावेश असेल. एकात्मिक जलसंधारण, ज्यात लोकसहभाग आणि लोकप्रतिनिधींचा समावेश असेल. संबधित जिल्हाधिकारी आणि जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला अधिकार देण्यात येतील.

### शेततळी व कोरडवाहू अभियान

४ हजार कोटी रुपये खर्च करून ५० लाख हेक्टर क्षेत्रावर शाश्वत शेती विकसित केली जाईल. १ वर्षात ५ हजार गावे दुष्काळमुक्त केली जातील. पाच वर्षात अडीच लाख शेततळी निर्माण करण्यात येतील. ५० हजार सिमेंट नालाबांध तयार करून त्यातून १० लाख हेक्टर सिंचन वाढविण्यात येणार आहेत. राज्यात कोरडवाहू शेती अभियान राबवणार. सध्या ५०० गावांना दुष्काळमुक्त करण्याकरिता ३०० कोटी रुपये निधी उपलब्ध, चालू वर्षात या कामाकरिता १५० कोटी रुपये उपलब्ध, १००० गावांचा समावेश करून ५०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार.

### सूक्ष्म सिंचन

मागील तीन वर्षांपासून सूक्ष्म सिंचनाकरिता थकलेले अनुदान पूर्णपणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय. तसेच चालू वर्षाकरिता ३०० कोटी रुपये सूक्ष्म सिंचनाकरिता उपलब्ध, पुढील ५ वर्षांत किमान १० लक्ष हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचा निर्णय. पाण्याच्या साठ्यासाठी गाळ काढण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेतला जाईल, त्यासाठी ५० कोटी रुपयांची अधिकची तरतूद. मूळ स्थळ जलसंधारणासाठी ब्रॉड बेस फरो (BBF) याचा अनुभव अतिशय चांगला असल्याने चालू वर्षात किमान १० हजार ब्रॉड बेस फरो उपलब्ध करून देण्याचे शासनाचे उद्दिष्ट, प्रत्येक गावात किमान एक ब्रॉड बेस फरो भाडेतत्त्वावर उपलब्ध होईल. ❐❐

### दुष्काळग्रस्तांना मदत

- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या थकीत कर्जाचे रूपांतर मध्यम मुदत कर्जात करण्यासाठी थकीत २९०० कोटी रुपये कर्जाचे १५ टक्के राज्य हिश्श्याचा सुमारे ४३५ कोटीचा निधी कर्जाच्या स्वरूपात बँकांना उपलब्ध करणार.
- पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्याकरिता पुढील ६ महिन्यांसाठी ४०० कोटी रुपयांचा आराखडा तयार, पाऊस सुरू होईपर्यंत सुमारे ३००० टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणार, असा अंदाज आहे.
- खरीप २०१४-१५ या हंगामात ४७ लक्ष शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभाग घेतला, हवामानावर आधारित पीक विमा योजनेत १३ लक्ष शेतकरी सहभागी, या पीकविम्यासाठी शासनाकडून ४५ कोटी रुपये विमा हप्ता अनुदान उपलब्ध, अंदाजित २३० कोटी रुपये नुकसानभरपाई ११ लक्ष शेतकऱ्यांना उपलब्ध
- अडीच लाख हेक्टर फळबागांसाठी ८८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव, प्रतिहेक्टर ३५ हजार मदत देणार
- फळबागा पुनरुज्जीवनासाठी प्रतिहेक्टर २० हजार रुपये देणार
- हवामान आधारित विमा- ११ लाख शेतकऱ्यांना विम्याची मदत देणार
- दुष्काळी भागासाठी तिमाही वीजबिल माफ केले जाईल. २२०० ट्रान्स्फॉर्मर नियमित करणार.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 20

# सक्षम पोलीस.. समर्थ महाराष्ट्र

## ठोस निर्णय

- पोलीस संबंधित परवान्यांसाठी सिंगल विंडो सिस्टिम
- गुन्ह्यांचा तपास शास्त्रशुद्ध पद्धतीनेच व्हायला हवा यासाठी प्रत्येक जिल्हा आणि आयुक्तालयात फॉरेन्सिक युनिट्सची स्थापना.
- दलित अत्याचाराबाबत गुन्हे लवकरात लवकर निकाली निघावेत म्हणून विशेष प्रयत्न.
- सायबर आणि आर्थिक गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी एक कायमस्वरूपी यंत्रणा उभारणार.
- आर्थिक गुन्हेगारांना चाप लावणार. एमपीआयडीए कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. घोटाळेबाज संस्थांच्या संचालकांची मालमत्ता पूर्वलक्षी प्रभावाने जप्त करण्यात येईल.
- पोलिसांच्या बदल्या तसेच इतर अधिकारांचे विकेंद्रीकरण करून ते खालच्या स्तरापर्यंत दिले जातील. सध्या दर दोन वर्षांनी पोलीस शिपायांची बदली करण्यात येते.
- महिलांवरील तसेच दुर्बलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी जीपीएस असलेल्या वाहनांद्वारे गस्त वाढविण्यात येईल. नागपूर, पुणे, अमरावती आणि औरंगाबाद या शहरांमध्ये पहिल्या टप्प्यात ही गस्त सुरू होईल.
- अत्याचार झालेल्या महिलांचे किंवा ज्येष्ठ नागरिकांचे, मुलांचे समुपदेशन करण्यासाठी मदत केंद्रे. त्यांना तज्ज्ञ व्यक्ती, मानसोपचार तज्ज्ञ यांची सेवा पुरवणार.
- महिलांवरील वाढते अत्याचार पाहता खटले जलदगतीने चालण्यासाठी येत्या काळात विशेष फास्टट्रॅक न्यायालयांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न.
- शहीद पोलिसांच्या कुटुंबीयांना संपूर्ण आर्थिक फायदे

राज्यातील कायदा-सुव्यवस्थेबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पोलीस यंत्रणा पाच वर्षात सक्षम करून कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व प्रकारच्या गुन्हेगारीबाबत झिरो टॉलरन्स ठेवण्यात येईल, त्याचप्रमाणे येत्या पाच वर्षात पोलीस यंत्रणा पूर्णपणे सक्षम

### गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविणार

गुन्हे वाढले याहीपेक्षा गुन्हेगारी वाढणे जास्त चिंताजनक आहे. शिक्षा होत नसल्याने आरोपी निर्ढावतात. गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण कमी असणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलण्यात येतील.



करून गुन्हेगारीला आळा घालण्यात येईल. तसेच पोलीस दलात बेशिस्त आणि वरिष्ठांचा अनादर सहन केला जाणार नाही.

येत्या पाच वर्षात राज्यातील गुन्हेगारीत लक्षणीयरीत्या घट आणली जाईल. जामीन मिळालेला असतानाही संबंधित व्यक्ती वारंवार गुन्हे करीत असेल तर अशा प्रकरणांमध्ये सातत्याने पाठपुरावा करून कायद्याचे राज्य आहे, हे सिद्ध करून गुन्हेगारीला संपविण्यात येईल.

गुन्हेगारांची गय केली जाणार नाही.

प्रत्येक जिल्ह्यात प्रोसिक्युटरच्या पॅनेलची स्थापना केली जाईल. चौकशीदरम्यान योग्य कायदेशीर मदत दिली जाईल. कुठल्याही परिस्थितीत पोलीस ठाण्यांनी झालेल्या तक्रारींची नोंद केलीच पाहिजे, असे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकाला मोकळेपणे गुन्हा नोंदविता येईल, याकडे अधिक लक्ष पुरवले जाईल.

❐ ❐

## असे असेल दहशतवादविरोधी धोरण

■ आयसीएस (ISIS) सारख्या संघटनांमध्ये सहभागी होण्यासाठी काही तरुण राज्यातून गेल्याची घटना ताजी आहे. यासंदर्भात अशा तरुणांना विविध प्रकारे समुपदेशन केले जाईल. ■ कुटुंबातील महिलांना विश्वासात घेऊन त्यांच्या कुटुंबातील युवकांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखले जाईल. ■ समाजातील तरुण उद्योजक आणि व्यावसायिकांचा आदर्श अशा चुकलेल्या युवकांसमोर राहील यासाठी प्रयत्न केला जाईल. ■ नोकरीच्या आणि शिक्षणाच्या पुरेशा संधी उपलब्ध करून दिल्या जातील. ■ समाजातील धार्मिक नेत्यांची मदत घेतली जाईल.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 21

# विदर्भाचा रेंगाळलेला विकास गतीने करणार




नगर नियोजन, सिंचन, रस्तेविकास, कृषि, पर्यटन, शिक्षण, आरोग्य आणि अन्य क्षेत्रातील आवश्यक ते सर्व निर्णय तातडीने घेऊन आणि त्यांची कालबद्ध प्रभावी अंमलबजावणी करून विदर्भाचा रेंगाळलेला विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. विदर्भासाठी महिन्यातील दोन दिवस राखीव ठेवण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला आहे.

गेल्या काही वर्षात राज्यपालांच्या निर्देशानुसार विदर्भासाठीचा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असला तरी तो खर्च झाला नाही आणि अन्य विभागाकडे वळविला गेला. मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे हे विदर्भातील अनेक प्रकल्प अपूर्ण राहण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. भूसंपादन अधिकाऱ्यांची पदे न भरल्याने भूसंपादनच होऊ शकले नाही. त्यामुळे या प्रकल्पांसाठी आलेला निधी अखर्चित राहून अन्य विभागांकडे गेला. नव्या सरकारने मात्र, अमरावती विभागातील सर्व पदे तत्काळ भरली आहेत. त्याचबरोबर विविध प्रकल्पांसाठी ठोस निर्णय घेतले आहेत.

जे अधिकारी आदेश देऊनही हजर होणार नाहीत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा निर्णय नव्या सरकारने घेतला आहे.

## अपूर्ण प्रकल्पांना सुधारित मान्यता देणार

मुख्यमंत्र्यांनी अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यावर भर दिला आहे. अपूर्ण प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता तातडीने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विदर्भाची सिंचन क्षमता वाढणार आहे. अमरावती, वाशिम, बुलढाणा, अकोला या अनुशेष जिल्ह्यातील १०२ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम सरकारने आखला आहे. हे सर्व प्रकल्प जून २०१५ पर्यंत पूर्ण करून २ लाख ३६ हजार हेक्टर सिंचन क्षमता वाढविण्यात येईल. विदर्भातील ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेले पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अशा प्रकल्पांच्या भूसंपादन, पुनर्वसन कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने १ हजार ६०० हेक्टरवर अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विदर्भातील शहरांचे वगळलेल्या भागांचे विकास आराखडे मागील दोन ते तीन वर्षांपासून राज्य शासनाच्या मंजुरीसाठी प्रलंबित होते, त्यांना तातडीने अंतिम मंजुरी दिली आहे. ❐❐



**गोसीखुर्द प्रकल्पाची पाहणी करताना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन**

### महत्त्वाच्या घोषणा

- गोसीखुर्द प्रकल्प अडीच ते चार वर्षांत पूर्ण करणार
- सिंचन योजनांसाठी दरवर्षी ५०० कोटी रुपयांचा निधी देणार
- विदर्भातील विविध विभागातील रिक्त पदे तातडीने भरणार
- विदर्भातील राज्य महामार्गावर जानेवारीपर्यंत खड्डामुक्ती
- वातानुकूलित गोदामे उभारणार. संत्री प्रक्रिया उद्योग. धान कृषी विद्यापीठ उभारणार
- नागपूरपासून ५ किमी अंतरापुढे उद्योगांना परवानगी देणार. निर्यात सुविधा केंद्र एक वर्षांत उभारणार
- नागपूरमध्ये एक वर्षांत टर्मिनल मार्केट सुरू करणार
- मेयो, मिहान प्रकल्पापुढील अडचणी दूर करणार
- अमरावतीला रात्रीही मोठी विमाने उतरविता येतील, अशी धावपट्टी व सुविधा उभारणार
- सेवाग्राम आराखडा आणि बुद्धिस्ट थीम पार्क उभारणार. - ताडोबा येथे स्थानिक रहिवाशांच्या रोजगारासाठी इको टूरिझम संकल्पना राबवणार
- डॉ. आंबेडकरांच्या शांतिभवन येथील स्मृतींचे जतन करणार
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने १ हजार ६०० हेक्टरवर अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात
- विदर्भातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याचा पर्यटन बृहत आराखडा तयार करणार

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 22

# आमदार दत्तक शाळा योजना

महाराष्ट्रातील सर्वप्रकारच्या शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी वेगवेगळे अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामुळे महाराष्ट्रामध्ये नवे शैक्षणिक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांना प्रगती आणि समृद्धीच्या अनेक संधी उपलब्ध होतील. शिक्षकांच्या प्रशिक्षणावरील विशेष भर देण्यात येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा आणखी वृद्धिंगत होईल.

**मराठी शाळा वाचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यामुळे सत्ताधारी व विरोधक असा भेदभाव न करता सगळ्यांनी पुढाकार घेतला तर मराठी शाळा टिकतीलच त्याशिवाय मराठी माध्यमांकडे वळण्याचे मुलांचे प्रमाणही वाढेल. केंद्र सरकारच्या दत्तक गाव योजनेप्रमाणेच राज्यात दत्तक शाळा योजना राबवण्याचा मानस शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी व्यक्त केला.**



राज्यातील सर्व शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आमदार दत्तक शाळा योजना सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक आमदाराने एक शाळा दत्तक घेण्यासाठी पुढाकार घ्यावा जेणेकरून प्रत्येक मतदार संघांमध्ये मॉडेल स्कूल निर्माण होईल.

मराठी शाळांच्या बळकटीसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. शिक्षणशुल्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

राज्यातील विशेष मुलांना शिक्षणाच्या चांगल्या संधी मिळणे गरजेचे असल्याने यासाठी सर्वंकष समिती नेमण्यात येईल. राष्ट्रीय उच्चस्तर अभियान अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येईल.

### विद्यापीठ कायद्यात बदल

विद्यापीठ कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. यापूर्वीच्या सरकारने नवीन विद्यापीठ कायदा प्रस्तावित केला आहे. यामध्ये लवकरच दुरुस्ती करून नवीन विद्यापीठ कायदा आणण्यात येईल. विद्यापीठ निवडणुका पुन्हा सुरू करण्यात येतील. या निवडणुकांमधून फक्त राजकीय नव्हे तर समाजातील अनेक क्षेत्रातील नेतृत्व उभे राहू शकेल.

### शिक्षकांचे प्रशिक्षण

राज्यातील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) मुंबई आणि इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) अहमदाबाद या संस्थांचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू शकेल. शिक्षकांचे समायोजन आणि संचमान्यता नियमानुसार आणि कायद्यानुसार पूर्ण करण्यात आली असून आगामी काळात एकही शिक्षकांची नोकरी जाणार नाही आणि कोणत्याही शिक्षकांवर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी शासन घेईल.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तिसाठी कॅशलेस योजना सुरू करण्यात येईल. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचा लाभ निवृत्तीच्या दिवशी मिळेल याची दक्षता शिक्षण विभाग घेईल.

### आयटीआय विद्यार्थ्यांसाठी 'गूड न्यूज'

आयटीआय विद्यार्थ्यांसाठी यंदा निगेटिव्ह मार्किंग पद्धतीचा वापर करण्यात आला होता. हा विषय केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत येतो.

याप्रकरणी शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या प्रधान सचिवांशी चर्चा केली आहे. आयटीआयच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेत विद्यार्थ्यांना निगेटिव्ह मार्किंग असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले, ही बाब त्यांनी निदर्शनास आणली.

निगेटिव्ह मार्किंगची पद्धत यंदा रद्द करण्याची मागणी केली असता ती मान्य करण्यात आली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना निगेटिव्ह मार्किंग देण्यात आले, त्यांचे पेपर पुन्हा तपासण्यात येतील. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. ❒ ❒

### कायमस्वरूपी उपाय :

- **वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सीईटीमध्ये सध्या सुरू असलेली निगेटिव्ह मार्किंग पद्धत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्यात येईल.**
- **विविध विद्यापीठात वैद्यकीय प्रवेशासाठी महाराष्ट्रातून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात जाऊन NEET मधून मागे घेण्याची विनंती करणार.**
- **NEET मधून बाहेर पडल्यास त्यामुळे महाराष्ट्रात वैद्यकीय प्रवेशासाठी सुमारे ३०० अतिरिक्त जागा उपलब्ध होतील. याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळेल.**
- **कौशल्य विकासाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आगामी दहा वर्षात महाराष्ट्रातून ४५ ते ५० लाख तरुण प्रशिक्षित करून स्किल डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटी, सुरू करण्याचा विचार.**

# आपले मंत्री...आपले शासन

**राज्य मंत्रिमंडळाच्या पहिल्या विस्तारात १० कॅबिनेट आणि १० राज्यमंत्र्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समावेश करून घेतला. भारतीय जनता पक्षाबरोबर शिवसेनाही मंत्रिमंडळात सहभागी झाली आहे. भाजपच्या १० आमदारांसोबत शिवसेनेच्या १० नेत्यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.**



**गिरीश भालचंद्र बापट**
(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य)

**जन्म :** ३ सप्टेंबर १९५०.
**जन्म ठिकाण :** तळेगांव दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे.
**शिक्षण :** बी.कॉम.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती गिरिजा.
**अपत्ये :** एक मुलगा.
**व्यवसाय :** समाजकारण
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** २१५-कसबा पेठ, जिल्हा पुणे.



**गिरीश दत्तात्रय महाजन**
(जलसंपदा)

**जन्म :** १७ मे १९६०.
**जन्म ठिकाण :** जामनेर, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव.
**शिक्षण :** बी.कॉम.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती साधना.
**अपत्ये :** दोन मुली.
**व्यवसाय :** शेती व सामाजिक कार्य.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** १९-जामनेर, जिल्हा-जळगाव.



**राज्यमंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर काही नव्या सहकारी मंत्र्यांसमवेत मुख्यमंत्री**

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 24



**शपथविधी सोहळ्यात एका प्रसन्न क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख, सहकार मंत्री चंद्रकांत पाटील, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, श्रीमती रश्मी ठाकरे.**

## शिवसेनेच्या सहभागामुळे सरकार बनले भक्कम

- तब्बल १५ वर्षांनंतर राज्यात पुन्हा युतीचे सरकार आले आहे.
- भाजप-सेनेचे पक्षबळ १८५ इतके मजबूत झाले आहे.
- मंत्रिमंडळातील मंत्र्यांची एकूण संख्या आता ३० झाली
- मंत्रिमंडळात १८ कॅबिनेट व १२ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे.

## शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतीला वंदन

शिवसेनेच्या मंत्र्यांनी भगवे फेटे बांधले होते. मंत्र्यांसह त्यांच्या सौभाग्यवतींना व्यासपीठावर स्थान देण्यात आले होते. शिवसेनेच्या मंत्र्यांनी शपथ घेण्यापूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीला वंदन केले. संजय राठोड, विजय शिवतारे, रवींद्र वायकर यांनी शपथ घेताना समोर बसलेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना प्रणाम केला.



**दिवाकर नारायणराव रावते**
(परिवहन)

**जन्म :** २३ ऑक्टोबर १९४४.
**जन्म ठिकाण :** मुंबई.
**शिक्षण :** एल.एस.जी.डी.
**ज्ञातभाषा :** मराठी,हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती मनीषा.
**अपत्ये :** दोन मुलगे.
**व्यवसाय :** समाजकार्य.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.



**सुभाष राजाराम देसाई**
(उद्योग)

**जन्म :** १२ जुलै १९४२.
**जन्म ठिकाण :** मालगुंड, तालुका रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी.
**शिक्षण :** एस.एस.सी., पत्रकारिता पदविका.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती सुषमा.
**अपत्ये :** तीन मुलगे.
**व्यवसाय :** उद्योग.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** सभागृहाचे सदस्य नाहीत



**रामदास गंगाराम कदम**
(पर्यावरण)

**जन्म :** २७ जुलै १९५३
**ठिकाण :** जामगे, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी.
**शिक्षण :** एस्.एस्.सी.
**ज्ञात भाषा :** मराठी व हिंदी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती ज्योती.
**अपत्ये :** दोन मुलगे व एक मुलगी.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था.



**एकनाथ संभाजी शिंदे**
(सार्वजनिक बांधकाम - सार्वजनिक उपक्रम)

**जन्म :** ६ मार्च, १९६४.
**जन्म ठिकाण :** दरे, तालुका-जावळी, जिल्हा-सातारा.
**शिक्षण :** एच.एस.सी.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती लता.
**अपत्ये :** एक मुलगा.
**व्यवसाय :** वाहतूक व बांधकाम व्यवसाय.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** १४७-कोपरी-पाचपाखाडी, जिल्हा-ठाणे.



**चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे**
(ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा)

**जन्म :** १३ जानेवारी १९६९.
**जन्म ठिकाण :** कोराडी, तालुका कामठी, जिल्हा नागपूर.
**शिक्षण :** बी.एस्सी भाग-२.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती ज्योती.
**अपत्ये :** एक मुलगा व एक मुलगी.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** ५८-कामठी, जिल्हा नागपूर.



**बबनराव दत्तात्रय लोणीकर**
(पाणीपुरवठा व स्वच्छता)

**जन्म :** १ मार्च १९६१.
**जन्म ठिकाण :** लोणी (खुर्द), तालुका-परतूर, जिल्हा-जालना.
**शिक्षण :** पाचवी
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती मंदा.
**अपत्ये :** एक मुलगा व दोन मुली.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** ९९-परतूर, जिल्हा-जालना.



**डॉ. दीपक रामचंद्र सावंत**
(सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण)

**जन्म :** ७ मार्च १९५५.
**जन्मठिकाण :** मुंबई.
**शिक्षण :** पीएच.डी.(हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन, जे.जे.हॉस्पीटल) (शिवाजी विद्यापीठ); एम.फिल.; एल.सी.ई.एच.(मुंबई), सी.जी.पी.,एम.ए.(इंग्लिश);एम.ए.(राज्यशास्त्र)
**ज्ञातभाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी डॉ.अनिला.
**अपत्ये :** एक मुलगा.
**व्यवसाय :** वैद्यकीय.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** मुंबई विभाग पदवीधर.



**राजकुमार सुदाम बडोले**
(सामाजिक न्याय व विशेष साहाय्य)

**जन्म :** २८ मार्च १९६२.
**जन्मठिकाण :** कोदामेडी, तालुका-सडक-अर्जुनी, जिल्हा- गोंदिया
**शिक्षण :** स्थापत्य अभियांत्रिकी पदविका, एम.ए.(भाग-१).
**ज्ञात भाषा :** मराठी,हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती शारदा.
**अपत्ये :** दोन मुलगे व एक मुलगी.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** ६३- अर्जुनी-मोरगांव (अनुसूचित जाती). जिल्हा-गोंदिया.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 26

# राज्यमंत्री



**प्रा. राम शंकर शिंदे**
(गृह (ग्रामीण), पणन, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन)

**जन्म :** १ जानेवारी १९६९.
**जन्म ठिकाण :** चोंडी, तालुका-जामखेड
**शिक्षण :** एम.एस् सी. (वनस्पतिशास्त्र),बी.एड
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती आशाताई.
**अपत्ये :** दोन मुली.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** २२७-कर्जत-जामखेड



**विजयकुमार सिद्रामप्पा देशमुख**
(सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), परिवहन, कामगार, वस्त्रोद्योग)

**जन्म :** २१ ऑक्टोबर १९५६.
**जन्मठिकाण :** सोलापूर, जिल्हा-सोलापूर.
शिक्षण : बी.कॉम.
**ज्ञात भाषा :** मराठी,हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित.
**अपत्ये :** एक मुलगा.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** २४८- सोलापूर शहर उत्तर, जिल्हा-सोलापूर



**संजय दुलीचंद राठोड**
(महसूल)

**जन्म :** ३० जून, १९७१.
**जन्म ठिकाण :** यवतमाळ, तालुका-यवतमाळ, जिल्हा - यवतमाळ.
**शिक्षण :** बी.कॉम., बी.पी.एड.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व बंजारा.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती शीतल.
**अपत्ये :** एक मुलगा व एक मुलगी.
**व्यवसाय :** शेती.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** ७९-दिग्रस, जिल्हा - यवतमाळ.



**दादाजी दगडू भुसे**
(सहकार)

**जन्म :** ६ मार्च १९६४.
**जन्म ठिकाण :** मालेगांव, जिल्हा नाशिक.
**शिक्षण :** डी.सी.ई.
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती अनिता.
**अपत्ये :** दोन मुलगे.
**व्यवसाय :** शेती व बांधकाम.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** ११५-मालेगांव बाह्य, जिल्हा नाशिक.

## शपथविधी सोहळ्याला नेत्यांची उपस्थिती

शपथविधी सोहळ्याला विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख, विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे, उपसभापती वसंत डावखरे, केंद्रीयमंत्री व शिवसेना-भाजप समन्वयक धमेंद्र प्रधान, केंद्रीयमंत्री पियुष गोयल तसेच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे व सर्व कुटुंबीय, माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, खासदार, आमदार तसेच सेना-भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवसेनेचे सर्व मंत्री मिरवणुकीने शिवाजी पार्कवर!

राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्यानंतर शिवसेनेचे सर्व १० मंत्री व नेते मिरवणुकीने दादर येथे शिवाजी पार्कवर गेले. तेथे त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतिस्थळाला वंदन करून मॉंसाहेबांच्या पुतळ्याचे दर्शन घेतले.



**विजय सोपानराव शिवतारे**
(जलसंपदा, जलसंधारण)

**जन्म :** २४ डिसेंबर, १९५९.
**जन्म ठिकाण :** यादववाडी, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणे.
**शिक्षण :** अभियांत्रिकी पदविका
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती मंदाकिनी.
**अपत्ये :** दोन मुलगे व एक मुलगी.
**व्यवसाय :** शेती, बांधकाम व मत्स्यव्यवसाय.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** २०२-पुरंदर, जिल्हा-पुणे.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 27



**दीपक वसंत केसरकर**
(वित्त, ग्रामविकास)

**जन्मतारीख :** १८ जुलै १९५५
**जन्मठिकाण :** सावंतवाडी
**शिक्षण :** बी.कॉम. डी.बी.एम.
**पक्ष :** शिवसेना
**वैवाहिक माहिती :** पत्नी श्रीमती पल्लवी,
**अपत्ये :** एक मुलगी
**व्यवसाय :** शेती, व्यापार.
**मतदार संघ :** २७०-सावंतवाडी विधानसभा मतदार संघ



**राजे अम्ब्रीशराव सत्यवानराव आत्राम**
(आदिवासी विकास)

**जन्म :** १५ ऑक्टोंबर १९८५
**ठिकाण :** राजमहल, अहेरी
**शिक्षण :** बिजनेस लॉ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, लंडन (बर्मिंगहम)
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** अविवाहित.
**व्यवसाय :** शेती, सामाजिक कार्य
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**(राज्याच्या मंत्रिमंडळातील सर्वात तरुण सदस्य)**
**मतदारसंघ :** ६९, अहेरी मतदार संघ



**रविंद्र दत्ताराम वायकर**
(गृहनिर्माण, उच्च व तंत्रशिक्षण)

**जन्म :** १८ जानेवारी १९५९.
**जन्म ठिकाण :** मुंबई.
**शिक्षण :** बी.एस्सी.(मुंबई).
**ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित,
पत्नी श्रीमती मनीषा.
**अपत्ये :** दोन मुली.
**व्यवसाय :** व्यापार.
**पक्ष :** शिवसेना.
**मतदारसंघ :** १५८- जोगेश्वरी पूर्व, जिल्हा मुंबई उपनगर.



**डॉ. रणजित विठ्ठलराव पाटील**
(गृह (शहरे), नगरविकास, सामान्य प्रशासन, विधी व न्याय, संसदीय कार्य)

**जन्म :** २० जानेवारी १९६४.
**जन्मठिकाण :** अकोला.
**शिक्षण :** एम.बी.बी.एस., एम.एस.(ऑर्थो).
**ज्ञात भाषा :** मराठी,हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित,
पत्नी डॉ. अर्पणा.
**अपत्ये :** एक मुलगा व एक मुलगी.
**व्यवसाय :** वैद्यकीय.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष.
**मतदारसंघ :** अमरावती विभाग पदवीधर

## विधानपरिषदेचे सहा सदस्य मंत्रीमंडळात

राज्य मंत्रीमंडळाच्या विस्तारात शिवसेनेच्या पाच कॅबिनेट मंत्र्यापैकी ३ आणि भाजपच्या पाच राज्यमंत्र्यापैकी दोन असे एकूण पाच जण विधानपरिषदेचे सदस्य आहेत. ३१ ऑक्टोबरला झालेल्या शपथविधीमधील चंद्रकांत पाटील हेही विधानपरिषद सदस्य आहेत. त्यामुळे या सरकारमध्ये सहा मंत्री विधानपरिषदेचे सदस्य आहेत. सुभाष देसाई हे कोणत्याही सभागृहाचे सदस्य नाहीत. तर अहेरी मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारे अंबरिश आत्राम हे सर्वात तरुण सदस्य आहेत, तर सुभाष देसाई हे मंत्रिमंडळातील सर्वात ज्येष्ठ सदस्य आहेत. मंत्रिमंडळात पंकजा मुंडे-पालवे आणि विद्या ठाकूर या दोन महिला सदस्यांचा समावेश आहे.

❒❒



**प्रवीण रामचंद्र पोटे**
(उद्योग व खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)

**जन्म :** ६ नोव्हेंबर १९६८.
**जन्मठिकाण :** राठी नगर, मु.पो. शिवाजी नगर, जिल्हा अमरावती.
**शिक्षण :** बी.कॉम.
**ज्ञात भाषा :** मराठी,हिंदी व इंग्रजी.
**वैवाहिक माहिती :** विवाहित,
पत्नी श्रीमती अनुराधा.
**अपत्ये :** एक मुलगा व एक मुलगी.
**व्यवसाय :** उद्योग.
**पक्ष :** भारतीय जनता पक्ष
**मतदारसंघ :** अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 28

# पर्यावरणासोबत विकास

केंद्रीय मंत्रिमंडळात असलेल्या महाराष्ट्राच्या मंत्र्यांचा परिचय आणि त्यांच्या विशेष मुलाखतीचे सदर डिसेंबर २०१४ च्या अंकापासून सुरू करण्यात आले आहे. केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रकाश जावडेकर यांचा महाराष्ट्र आणि देशाच्या विकासाबद्दलचा दृष्टिकोन...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील वेगवान आणि अचूक निर्णय घेणाऱ्या मंत्र्यांमध्ये केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रकाश जावडेकर यांचे नाव आघाडीवर घेतले जाते. पर्यावरण मंत्रालयाचा कारभार गेल्या ७-८ महिन्यांत गतिमान झाल्याची जी प्रतिक्रिया उमटली त्याची दखल खुद्द वरिष्ठ पातळीवरही घेण्यात आली. फायलींना ऑनलाइन परवानग्या देण्यापासून अलीकडेच लिमा येथे झालेल्या पर्यावरणाच्या जागतिक परिषदेत भारतासह विकसनशील देशांच्या भूमिकेला व्यापक मान्यता मिळाली, अल्पावधीत अनेक बाबतींत जावडेकर यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.**



पर्यावरण रक्षण और विकास- साथ साथ हा नारा घेऊन आपण काम करत असल्याचे जावडेकर नमूद करतात. या दृष्टीने पयार्वरणाचे रक्षण, संवर्धन होईल व विकासालाही अडसर ठरणार नाही, असा नवा कायदा त्यांच्या मंत्रालयाने बनविला आहे. लवकरच तो केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अंतिम मंजुरीसाठी जाईल. केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री प्रकाश जावडेकर यांच्याशी झालेली ही बातचीत.

**केंद्रीय पर्यावरण मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रासाठी केलेली कोणती कामे लक्षणीय म्हणून सांगाल?**

शिवस्मारकाला परवानगी माझ्या मंत्रिपदाच्या कारकीर्दीत मिळणे हा मी माझ्यासाठी मोठा भाग्ययोग समजतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक असावे हा प्रस्ताव गेली काही वर्षे रखडला होता. त्याला नुकतीच केंद्रीय मंजुरी देण्यात आली. हा प्रकल्प किमान दिल्लीच्या पातळीवरून नुकताच मार्गी लागला हे मला महत्त्वाचे वाटते. दुसरा प्रश्न होता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील प्रस्तावित विश्वस्तरीय स्मारकाच्या जागेबाबतचा. या जागेला वस्त्रोद्योग मंत्रालयाची परवानगी देण्याबाबतचे विधेयक नुकतेच मंजूर झाले आहे. चैत्यभूमी व इंदू मिलचे प्रस्तावित स्मारक यांना जोडणाऱ्या एका पायवाटेच्या मंजुरीत सीआरझेड कायद्यानुसार काही अडथळे येत होते. केंद्राने नुकतीच त्याबाबतची परवानगी दिली आहे.

तिसरा मुद्दा होता तो पेडर रोडवरील उड्डाण पुलाचा. त्यातील एक अडथळा या उड्डाणपुलामुळे दूर होणार आहे. यातील पर्यावरणाबाबतचा जो निर्णय होता, जी परवानगी होती, ती केंद्राने नुकतीच दिली आहे.

## परिचय

| | |
|---|---|
| पूर्ण नाव | : प्रकाश केशव जावडेकर |
| जन्म | : ३० जानेवारी १९५१ |
| जन्म ठिकाण | : पुणे |
| शिक्षण | : बी.कॉम. |
| ज्ञात भाषा | : मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : विवाहित, पत्नी डॉ. प्राची |
| अपत्ये | : दोन मुलगे |
| व्यवसाय | : समाजकारण |
| मतदारसंघ | : मध्यप्रदेशमधून राज्यसभा खासदार |

मंगेश वैशंपायन

**पर्यावरण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारल्यावर आपल्याला काय जाणवले?**

पर्यावरण मंत्रालय हे अतिशय संवेदनशील मंत्रालय आहे. मात्र गेल्या काही वर्षात त्याची अतिशय विचित्र प्रतिमा तयार झाली होती. वर्षानुवर्षे फायली तुंबल्या होत्या. निर्णय होत नव्हते. हे एकंदर चित्र पाहून मी पहिला निर्णय घेतला की फायलींच्या मालकांचे चेहरे पाहून नव्हे तर फायलींची गुणवत्ता पाहून निर्णय घ्यायचे. लोकांची कामे होणे व इथला कारभार गतिमान होणे, या व्यतिरिक्त मला येथून काही कमवायचे नव्हते.

साहजिकच मी सर्वप्रथम निर्णय घेतला तो पर्यावरण परवानग्यांच्या फाइली ऑनलाइन




करण्याचा. पर्यावरणाच्या किरकोळ परवानग्यांसाठीही फायली थेट दिल्लीत मागवून घेतल्या जात होत्या.आता फायली परवानग्या ऑनलाइन झाल्या व या परवानग्यांसाठी येणाऱ्या अर्जांना फाइलीसाठी एक ओळख दर्शवणारा क्रमांक देणे सुरू केले. परिणामी पहिल्या काही दिवसांतच तुंबलेल्या फायलींची संख्या शून्यावर आली. यामुळे व्यवस्थेतही पारदर्शकता आली. एक उदाहरण सांगतो. जंगल भागातील ४० हेक्टरखालील जमिनीचे पुनर्वनीकरण करण्याबाबतच्या व जंगलांचे परिवर्तन करण्यासाठी परवानग्यांचे अधिकार विभागीय पर्यावरण विभागांना दिले. त्यासाठी संबंधित राज्यांचे वनसचिव, महसूल सचिव व तज्ज्ञ यांच्या समित्या नेमल्या. यामुळे यासाठी थेट



दिल्लीत येणे, परवानग्या मिळविणे, त्यासाठी नाना खटपटी करणे , हे प्रकार एका फटक्यात टळू लागले. देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांच्या भागांतील रस्ते व त्यांच्या परवानग्या हे फारच जटिल प्रकरण होते. आता सरकारने सीमेवर ६००० किमी पर्यंतच्या रस्त्यांना परवानग्या दिल्याने ही कामे सुरू झाली आहेत.

**पश्चिमघाट विकासाबाबतची प्रगती कशी आहे?**

माळीण दुर्घटनेतून सरकारने एक धडा घेतला की दुर्घटना झाल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा त्याची शक्यता गृहीत धरून तसतशा खबरदारीच्या उपाययोजना करत जाणे. महाराष्ट्रासह ७ राज्यात पश्चिम घाट परिसरात कस्तुरीरंगन समितीच्या शिफारसींनुसार 'ग्राऊंड टूथिंग'चे काम सुरू आहे. यात ७००० गावांत प्रत्यक्ष जाऊन धोकादायक भागांचे सर्वेक्षण करणे, त्यानंतर तेथे सुरक्षा उपाययोजना करणे यांचा समावेश आहे.

**गंगा शुद्धीकरण प्रकल्पाबाबत काय सांगाल?**

जीवनदायिनी गंगेसह साऱ्याच नद्यातील प्रदूषणाचा मुद्दा माझ्या मंत्रालयाने गांभीर्याने घेतला आहे. निर्मल-अविरत गंगा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी केंद्र सरकारने २०३० कोटींचा प्राथमिक निधी दिला आहे. गंगेमध्ये घातक, विषारी द्रव्ये व रसायने सोडणाऱ्या कारखान्यांना चाप लावणे सुरू आहे. सर्वाधिक प्रदूषण करणारे ७०० उद्योग असल्याचे आढळले आहे. त्यापैकी ४६ उद्योग थेट बंद करण्यात आले आहेत.

**वाघांच्या बछड्यांसाठी केंद्राच्या नव्या संगोपनगृहांचा प्रकल्प सध्या चर्चेत आहे...**

वाघांच्या संख्येबाबत भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील ३००० पट्टेदार वाघांपैकी १७०० एकट्या भारतात आहेत. प्रोजेक्ट टायगर प्रकल्पांसारखे प्रकल्प निर्धाराने अंमलात आणण्याच्या सूचना व्याघ्र प्रकल्पांना दिल्या आहेत.

महाराष्ट्रासह १० व्याघ्र प्रकल्प असलेल्या राज्यात वाघाच्या वाट चुकून किंवा आईपासून ताटातूट होऊन वस्तीत आलेल्या बछड्यांसाठी संगोपनगृहे ही कल्पना प्रत्यक्षात येणार आहे. मागच्या वर्षी असे २६ बछडे मिळाले होते. हे टाळण्यासाठी या बछड्यांची ३ वर्षे शास्त्रशुद्ध रीतीने देखभाल करून त्यांना पुन्हा जंगलात सोडण्याचा हा प्रकल्प आहे. यासाठी जे २ प्रकल्प निवडले आहेत त्यात राज्यातील नागपूरजवळच्या पेंच व्याघ्र अभयारण्याचाही समावेश आहे.

**लिमा जागतिक पर्यावरण परिषदेतील भारताच्या यशाकडे आपण कसे बघता?**

लिमा परिषद ही सर्वार्थाने वेगळी ठरली. जगातील कार्बन उत्सर्जन करणाऱ्यात मोठ्या संख्येने असलेल्या श्रीमंत देशांना भारतासारख्या साऱ्याच विकसनशील देशांचे म्हणणे ऐकून घेणे भाग पडले. या देशांच्या अपेक्षेनुरूप जागतिक कायदा दृष्टिपथात आला व त्यामुळे आगामी वर्षात पॅरिसला होणाऱ्या पुढच्या पर्यावरण जागतिक परिषदेतील ठरावाचा मसुदा विकसनशील देशांचे म्हणणे प्रतिबिंबित करणारा ठरणार आहे.

(लेखक दैनिक सकाळचे नवी दिल्लीतील ज्येष्ठ प्रतिनिधी आहेत.
**संपर्क** - ०९९५८३४८४३७)

### ॲक्शन प्लॅन

- छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक असावे या प्रस्तावाला नुकतीच केंद्र सरकारने मंजुरी दिली.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील प्रस्तावित स्मारकातील सीआरझेडनुसार अडथळे दूर करण्यात आले.
- पर्यावरण परवानग्यांच्या फाइलींना ऑनलाइन मंजुरी
- ४० हेक्टरखालील जमिनीचे पुनर्वनीकरण करण्याबाबतच्या व जंगलांचे परिवर्तन करण्यासाठी परवानग्यांचे अधिकार विभागीय पयार्वरण विभागांना दिले.
- सागरी क्षेत्र नियमावलीचा प्रागतिक विचार करून निर्णय घेतले आहेत. किनारपट्टी विकासाचा विस्तृत आराखडा तयार.
- पर्यावरणाचे रक्षण करताना विकासालाही बाधा येणार नाही याची काळजी घेऊन एक नवा कायदा करणार.
- बोर येथील व्याघ्र प्रकल्पाला परवानगी देण्याबतचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्याची मंजुरी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
- पश्चिमघाट परिसरात येणाऱ्या महाराष्ट्रासह ७ राज्यात कस्तुरीरंगन समितीच्या शिफारशींनुसार ग्राऊंड टूथिंगचे काम अंतिम टप्प्यात.
- देशाच्या सीमा भागांतील ६००० किमी पर्यंतच्या रस्त्यांना परवानगी.
- गंगेच्या पट्ट्यांतील २३०० कारखान्यांना सेन्सॉर बसविणे

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 30



# गुणवत्तावाढीला सुधारणेची जोड

**शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची नितांत गरज वेळोवेळी व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत आपण नेमक्या कोणत्या सुधारणा करणार आणि आवश्यकता भासल्यास परीक्षा पद्धतीत काही बदल सुचवणार आहात का?**

विद्यार्थी व शिक्षणाची गुणवत्ता कशी वाढवता येईल आणि यामधून पुढची पिढी उत्तम पद्धतीने कशी तयार होईल यासाठी आपण प्राधान्य देणार आहोत. सध्याचा शालेय अभ्यासक्रम हा साचेबद्ध पद्धतीने तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामध्ये बहुतांश विद्यार्थ्यांना फारशी रुची नाही. त्यामुळे नजीकच्या काळात विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेण्याबरोबरच शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींशी सविस्तर चर्चा करून या अभ्यासक्रमांमध्ये अधिक सुधारणा करण्यात येईल. अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविणे तसेच परीक्षा, प्रश्नपत्रिका यांचा दर्जा वाढविण्यावर सरकारचा भर असेल. महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबत शिक्षणक्षेत्रातून वेगवेगळ्या सूचना आल्या आहेत. त्यांचा अभ्यास करून सहा महिन्यांत निर्णय घेतला जाईल. शिक्षणक्षेत्रात शिक्षणतज्ज्ञांना महत्त्व असले पाहिजे. त्यामुळे या क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप टाळून शिक्षण महर्षींची मदत घेतली जाईल. शिक्षण हे फक्त शहरांमध्ये मर्यादित न राहता शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार गावागावांत तसेच खेड्यापाड्यांत करण्यासाठी आमचे सरकार प्राधान्य देईल. राज्यातील शाळांमधील पायाभूत सुविधा अधिक उत्तम करण्यासाठी तसेच राज्य आणि केंद्राच्या शिक्षणाच्या चांगल्या योजना खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

भारत सर्वात तरुण लोकसंख्या असलेला देश असून भविष्यात या तरुणांमधूनच जगात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कौशल्याधारित शिक्षणक्रम विकसित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे.

> ‘महाराष्ट्र सरकारमध्ये आतापर्यंत शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण ही तीनही महत्त्वाची खाती स्वतंत्र होती. प्रत्येक खात्याला एक स्वतंत्र मंत्री होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेत केंद्र सरकारमध्ये जशी ही खाती एकत्रित करण्यात आली त्याप्रमाणे राज्यातदेखील ही खाती एकत्रित असावीत असा विचार पुढे आला. या खात्यांचा एकच मंत्री असल्यास कार्यभार चांगल्या पद्धतीने आणि नियोजनबद्ध होईल असा उद्देश त्यामागे आहे. ‘के.जी. टू पी.जी.’ असे या खात्यांच्या कार्यपद्धतीचे वर्णन करता येईल. शैक्षणिकदृष्ट्या या तीनही खात्यांचा सरकारदरबारी योग्य समन्वय असावा आणि त्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यावर अधिक भर दिला जावा हा उद्देश होता. या उद्देशाच्या पूर्तीसाठी आमच्या सरकारकडून कसोशीने प्रयत्न करण्यात येतील.’
>
> **- शिक्षणमंत्री विनोद तावडे**



संजय व्हनमाने

**विद्यापीठाच्या कुलगुरूंनी मंत्रालयात येणे हे फायद्याचे की तोट्याचे?**

आतापर्यंत नवीन शिक्षणमंत्री मंत्रालयात आपल्या पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर विविध विद्यापीठांचे कुलगुरू शिक्षणमंत्र्यांना मंत्रालयात भेटावयास येण्याची पद्धत चालत आली आहे. परंतु आपण ही पद्धत बंद करण्याचा विचार केला आहे. कुलगुरू यांची कार्यकक्षाही त्या-त्या विद्यापीठात असते. परंतु काही कुलगुरू मात्र मंत्रालयात वारंवार शिक्षणमंत्र्यांना भेटावयास यायचे. शिक्षण क्षेत्रात मुंबईविद्यापीठाचा विचार केल्यास राजाबाई टॉवरचे महत्त्व वेगळे आहे. त्यामुळे या राजाबाई टॉवरने कधीही मंत्रालयासमोर

झुकू नये असे मला वैयक्तिकदृष्ट्या वाटते. म्हणूनच मुंबई विद्यापीठ असो वा अन्य विद्यापीठांच्या कुलगुरूंनी मंत्रालयात येण्याऐवजी आपण त्यांची विद्यापीठात भेट घेऊ आणि त्यांचे प्रश्न नक्कीच सकारात्मक पद्धतीने सोडवू, असे माझे ठाम मत आहे. कुलगुरू हे पद शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पद आहे. या पदाला शिक्षण क्षेत्रात मानाचे स्थान आहे. त्यामुळे या पदाचे महत्त्व अबाधित ठेवण्यासाठी कुलगुरूंनी वारंवार मंत्रालयात येण्याची आवश्यकता नसल्याचे मला वाटते.

**शिक्षण विभागाचा बहुसंख्य निधी शिक्षकांच्या वेतनावर खर्च होतो त्याबाबत तुमचे काय मत आहे?**

शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतील ८५ टक्के रक्कम शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होते. परंतु हा खर्च नसून ती विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. आता या गुंतवणुकीतून काय मिळाले हे मोजण्याचे

■ अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविणे तसेच परीक्षा, प्रश्नपत्रिका यांचा दर्जा वाढविण्यावर सरकारचा भर.

निकष लवकरच निश्चित केले जातील. शिक्षकांच्या कामाचेही काटेकोरपणे मूल्यमापन करण्यात येईल. रस्त्यांची बांधणी करताना वा धरणे बांधताना कोट्यवधी रुपयांची आर्थिक गुंतवणूक केली जाते. त्यातून लाभस्वरूपात मिळणाऱ्या प्रतिपूर्तीचा विचार केला जातो. त्याप्रमाणे आता शिक्षणातील गुंतवणुकीचाही विचार करावा लागेल. राज्यात शिक्षण क्षेत्राकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागणार आहे. प्रवेश नियंत्रण समिती, शिक्षण शुल्क समिती न्यायालयाच्या निर्णयानुसार बंधनकारक असली, तरी त्याची अंमलबजावणी करताना अडचणी येतात. त्यासाठी एक कायदा करण्याचा विचार केला जाईल.

**राज्यात तीन टर्म सत्तेवर असलेल्या आघाडी सरकारने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयात काही बदल करणार का?**

शालेय विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण केले जात नसल्याची पद्धत रद्द करण्याबाबत शिक्षणतज्ज्ञांची मते भिन्न आहेत. त्यामुळे याबाबत सखोल अभ्यास करून निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात बदल करण्यासाठी आधीच्या सरकारांनी तीन समित्या नियुक्त केल्या होत्या. त्यांच्या अहवालांचा वापर करून या कायद्यात बदल केला जाईल. शिक्षण क्षेत्रातील बदलांसाठी नव्याने पुन्हा समिती नियुक्त केली जाणार नाही.

■ कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेसाठी कौशल्याधारित शिक्षणक्रम विकसित करणार.



**विद्यापीठात निवडणुका घेण्याबाबत तुमचे काय मत आहे?**

विद्यापीठांमध्ये निवडणुका घेण्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. विद्यापीठ निवडणुका म्हटल्या की फक्त राडा आणि मारामारी असे चित्र डोळ्यासमोर येते. परंतु आता वस्तुस्थिती बदलली आहे. गेली लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीवर एक नजर टाकल्यास त्यात युवा मतदारांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. कधीही नव्हती तेवढी युवा पिढी आता सजग झालेली दिसते. स्वातंत्र्याबरोबरच आपली जबाबदारी काय आहे याची त्यांना जाणिव झाली आहे. त्यामुळे विद्यापीठ निवडणुका पून्हा एकदा सुरू करताना त्या योग्य पद्धतीने आणि खेळीमेळीच्या वातावरणात कशा घेता येतील याबाबत आम्ही विचार करीत आहोत. त्यासाठी या क्षेत्रातील संबंधित प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ, विविध शैक्षणिक संघटना यांच्याशी आम्ही सविस्तर चर्चा करीत आहोत. सखोल चर्चा केल्यानंतरच या निवडणुकांची प्रक्रिया ठरवली जाईल.

**मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देण्यासाठी काय करणार?**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देण्याच्या दृष्टीने सरकारकडे सादर झालेल्या डॉ. नागनाथ कोतापल्ले समितीच्या अहवालातील शिफारशींवर विचार करण्यात येऊन त्या दृष्टीने केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येईल. महाराष्ट्रातील प्रत्येक बोली भाषा ही जतन होणे आवश्यक आहे. बोली भाषेनुसार आज त्या-त्या समाजाची ओळख आणि अस्तित्व आहे. त्यामुळे या सर्व बोली भाषांचे ऑडिओ- व्हिज्युअल पद्धतीने डिजिटायझेशन करण्याला आमचे सरकार अग्रक्रम देईल.

■ महाराष्ट्रात आजच्या घडीला ६० प्रकारच्या बोलीभाषा आहेत. या सर्व भाषांचे संवर्धन करण्यासाठी प्राधान्य.

**शालेय, उच्च व तंत्र तसेच वैद्यकीय अशा तीनही शैक्षणिक विभागांना सध्या मिळणारा निधी पुरेसा आहे का?**

तीनही विभागांचा निधी हा स्वतंत्र आहे, अर्थातच हा निधी पुरेसा नाही. निश्चितच या तीनही विभागांच्या निधीमध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षणावर जीएसडीपीच्या ६ टक्के निधी खर्च होणे अपेक्षित आहे. परंतु सध्या फक्त २.७ इतका कमी निधी खर्च होत आहे. राज्यातील उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचा आढावा घेतल्यास सध्या या विभागासाठी जीएसडीपीच्या २ टक्के निधी खर्च होणे आवश्यक असताना सध्या फक्त ०.४ टक्के इतकाच निधी खर्च करण्यात येतो. त्यामुळे एकूणच शिक्षणावरील खर्चात वाढ होणे आवश्यक आहे.

(लेखक महाराष्ट्र टाइम्सचे ज्येष्ठ पत्रकार आहेत.
**संपर्क** - ९८२१४३३९४७)

❐ ❐

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 32



# उत्साहाचा झरा

**आपले मंत्री, आपला दिनक्रम कसा घालवतात याबद्दल सर्वसामान्यांना उत्सुकता असते. व्यस्त अशा दिनक्रमामध्ये मंत्रिमहोदय असंख्य नागरिकांना भेटतात. त्यांच्या समस्या जाणून घेतात. अधिकाऱ्यांशी आपल्या विभागाशी संबंधित प्रश्नांची चर्चा करतात. असा त्यांचा व्यस्त दिनक्रम असूनही ते प्रसन्न आणि आनंददायी असतात. आपले मंत्री आपला दिवस कसा घालवतात हे जाणून घेण्यासाठी या अंकापासून आम्ही, 'एक दिवस मंत्रिमहोदयांसोबत' हे सदर सुरू करत आहोत. या सदरामध्ये परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्यासोबत घालविलेल्या एका दिवसाचा हा आँखोदेखा हाल.**

सकाळी सातची वेळ...... रवि भवन येथील कुटीर क्र. १०....... नवनियुक्त परिवहन मंत्री दिवाकर रावते तयार होऊन चहा घेताना वर्तमानपत्र वाचत होते...... एवढ्या सकाळी काही कार्यकर्ते बाहेर बसले होते.

आपल्या मंत्र्यांची दिनचर्या कशी असते. सकाळी उठल्यापासून रात्री उशिरापर्यंत त्यांचे कामकाज कसे चालते, याची माहिती जाणून घ्यायची होती. त्यांनीही हसतमुखाने माझा नमस्कार स्वीकारला. 'बोला काय म्हणताय.....?' माझ्या येण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. 'ठीक आहे..? मी जरा कार्यकर्त्यांशी बोलतो..... तुम्हीही बसा.....' तेवढ्यात नाश्ता येतो. नाश्ताही अगदी साधा....... स्थानिक कार्यकर्त्यांसह मलाही आग्रह करतात. अगदी दिलखुलास व्यक्तिमत्त्व........ त्याचे कार्यक्षेत्र मुंबई असले तरी यापूर्वी त्यांनी मराठवाडा व विदर्भात संपर्कप्रमुख म्हणून काम केले होते. शिवाय मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, युती शासनात परिवहन मंत्री, त्यामुळे त्यांचा वावर संपूर्ण महाराष्ट्रात .......

'बोला, काय काम काढलत...... एकेक करीत सर्वांशी ते बोलत होते. चहा, नाश्ता झाला. विधानमंडळात या.... कामे होतील. शासन आपले आहे. काळजी करू नका, असे आश्वासित करून आपल्या स्वीय सहायकांना विचारतात; अरे, आपल्या विभागाशी संबंधित असलेले कोणते प्रश्न आहेत. सचिव आले आहेत का ? सचिव त्यांना दिवसभराच्या कामकाजाबाबत ब्रिफिंग करतात.

दुष्काळावर चर्चा होणार असल्यामुळे आपण दिवसभर सभागृहातच राहणार असा निरोप ते विभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवितात. यावरून शेतकरी व त्यांच्या समस्या याबाबत दिवाकर रावते किती संवेदनशील आहेत याचा प्रत्यय येतो. त्यानंतर विविध ठिकाणाहून येणाऱ्या अभ्यागतांना बोलविण्याची सूचना त्यांनी दिली. निवेदन स्वीकारल्यानंतर आस्थेने चौकशी करून प्रत्येकांनी चहा घेऊन जावे असा आग्रह ते करतात. त्यानंतर विभागाचे ब्रिफिंग सुरु होते. अधिकारी ब्रिफिंग करतात तेव्हा अतिशय काळजीपूर्वक ऐकून त्यावर अभ्यासपूर्ण सूचना ते करतात. सर्वसामान्य, उपेक्षित व गरजू लोकांना आपले वाटेल असं काम हे सरकार करणार आहे असे ते मधेच सांगतात. ज्येष्ठ नागरिकांना प्रवास सवलत कार्ड याविषयी ते अधिक जाणून घेतात तेव्हा जेष्ठ



3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:37 PM Page 33



नागरिकांचीसुद्धा चिंता त्यांच्या बोलण्यातून दिसून येते. अशातच एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तींना रुग्णालयात जाण्याच्या दिवशी, एक दिवस बसने मोफत प्रवास करता यावा अशा मागणीचे निवेदन येते तेव्हा दिवाकर रावते हळवे होऊन ही मागणी खात्रीने पूर्ण करू असा शब्द देतात तेव्हा त्यांच्यामधील हळवेपणादेखील ठळकपण अधोरेखित होतो.

चर्चा झालेल्या विषयाची व्यवस्थित टिप्पणी तयार व्हावी असाही त्यांचा आग्रह असतो. एखादा विषय किती व्यवस्थितपणे मांडायला हवा याचे मार्गदर्शन दिवाकर रावते करतात. विधानभवनात जाण्याची वेळ झाली असे स्वीयसहायक सांगत असतानाच आणखी काही अभ्यागत त्यांचे अभिनंदन करण्यासाठी येतात. त्यांनाही पुरेसा वेळ देऊन दिवाकर रावते आस्थेने चौकशी करतात व लगेच विधानभवनासाठी रवाना होतात.

विधानभवन हेच आपले मंदिर आहे, याच ठिकाणी सर्वसामान्याला न्याय मिळू शकतो असे रावते सहज सांगून जातात. सभापती शिवाजीराव देशमूख, अध्यक्ष हरिभाऊ बागडे व उपसभापती वसंत डावखरे यांची भेट घेतल्यानंतर दालनात प्रवेश करतात. सभापती, अध्यक्ष यांची अधिवेशन काळात कामकाज सुरू होण्यापूर्वी आपण नियमित भेट घेत असल्याचे आवर्जून सांगतात. या भेटीनंतर विधान परिषद कामकाजात सहभागी होण्यासाठी दिवाकर रावते सभागृहात उपस्थित राहतात. दुष्काळावरील चर्चा गांभीर्यपूर्वक ऐकून त्यावर टिपण काढतात. विधिमंडळातील संपूर्ण दिवसाचे कामकाज आटोपल्यानंतर सायंकाळी ७ वाजता रवि भवन येथील कुटी नं १० मध्ये प्रवेश करतात. या ठिकाणी विदर्भ, मराठवाड्यातून आलेले अभ्यागत त्यांची वाट पाहत असतात. विधान भवन कामकाजात दिवसभर सहभागी होऊनही जराही थकवा जाणवू न देता तितक्याच आपुलकीने ते सर्वांच्या भेटी घेतात. शासकीय कामकाजासह वैयक्तिक कामासाठी आलेल्या प्रत्येकाला वेळ देतात. त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांना दिलासा देतात. लोकनेता म्हणून त्यांची ओळख तर आहेच. शेतकऱ्यांचे प्रश्न व्यवस्थित समजावून घेणारा नेता म्हणूनही त्यांना वेगळी ओळख आहे. येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताची राहण्याची व्यवस्था, जेवणाची व्यवस्था, सभागृहाचा पास आहे किंवा नाही अशी आस्थेने विचारपूस करतात. त्यावेळी कार्यकर्त्यांची काळजी घेणारा नेता ही त्यांची ओळख समोर येते. अभ्यागतांशी चर्चा व निवेदन स्वीकारत असतानाच मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक असल्याचा निरोप येतो. सर्वांच्या भेटीनंतर दिवाकर रावते लगेचच रामगिरीकडे रवाना होतात. रामगिरी येथील काम संपल्यावर रविभवनाला येतात. येथे राज्यातून आलेले शेतकरी, शेतमजूर व असंख्य नागरिकांची गर्दी निवास्थानी असतेच. प्रत्येकाच्या निवास व भोजनाची आवर्जून विचारपूस करतात. स्वीयसहायकाला निर्देश देतात व उद्याच्या अपॉईंटमेंटवर चर्चा करून रात्रौ उशिरा त्यांचा



**नाश्ता केल्यानंतर विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक सुरू होते. कुठलाही विषय अभ्यासपूर्वकच मांडायचा अशा सूचना अधिकाऱ्यांना देतात. विषय कुठलाही असो मुख्यमंत्र्यांशी चर्चा करूनच ठरायला हवा असा त्यांचा आग्रह असतो. या चर्चेत दिल्ली येथील उबर टॅक्सी प्रकरणाचा उल्लेख होतो तेव्हा या प्रश्नावर अतिशय गांभीर्यपूर्वक ते चर्चा करतात. महिलांच्या सुरक्षेला आपले सरकार सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे सांगायला ते विसरत नाहीत.**

दिवस संपतो. एका मुरब्बी कार्यकुशल दिलदार व्यक्तीबरोबर दिवसभर राहता आले व त्यांचे कामकाज पाहता आले, याचे मला समाधान लाभले.

**रवी गिते**

❐ ❐

# नवे प्रकल्प.. नव्या संधी

**'लोकराज्य'च्या डिसेंबर २०१४ च्या अंकात 'मेक इन महाराष्ट्र' या राज्य सरकारच्या उपक्रमाविषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या अनेक घडामोडी दरम्यानच्या काळात घडल्या. त्यांचा आढावा या अंकात घेतला आहे. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे सीएट टायर्सने बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून प्रकल्प सुरू करण्याचे निश्चित केले आहे. या प्रकल्पामुळे २८०० लोकांना रोजगार उपलब्ध होईल. या प्रकल्पात सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान वापरण्यात येणार असून टू आणि थ्री व्हिलर टायर्सची निर्मिती केली जाईल. या प्रकल्पामुळे विदर्भाच्या विकासाला आणखी गती मिळणार आहे त्याचबरोबर 'मेक इन महाराष्ट्र' या प्रकल्पाची दमदार सुरुवात झाली आहे.**




देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून रखडलेल्या कामांना गती देण्यासाठी धडाका सुरू केला आहे. राज्यात उद्योगांनी मोठी गुंतवणूक करावी, यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना उद्योग जगताकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या प्रकल्पाचा शिलान्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच झाला.

### महत्त्वाकांक्षी प्रकल्प

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सीएट टायर्स हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित होत असल्यामुळे या भागातील अडीच हजारांच्यावर तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. देशातील सर्वाधिक विकसित राज्य म्हणून महाराष्ट्राचा विकास करणार, आता यापुढे कुठलेही किचकट नियम असणार नाहीत. उद्योजकांना सुलभ सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एक खिडकी योजना अधिक गतिमान करण्यात येईल.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उद्योजकांचा विश्वास पुनर्स्थापित करणे हे शासनापुढे आव्हान होते. आपले वैभव पुन्हा प्राप्त करून घेण्यासाठी शासनाने उद्योजकांशी मैत्रीपूर्ण धोरण ठरविले आहे. रोजगार वाढल्यामुळे क्रयशक्तीही वाढणार आहे. अशा धोरणामुळे उद्योगाबरोबरच इतर विभागालाही चालना मिळणार आहे.

### फक्त २०-२५ ना देय प्रमाणपत्रे

सर्वसाधारणपणे उद्योग सुरू करण्यासाठी विविध प्रकारचे ७६ दाखले (ना हरकत प्रमाणपत्र) घ्यावे लागतात. ही संख्या कमी करून आता फक्त २०-२५ ना देय प्रमाणपत्रे घ्यावी लागतील.

उद्योजकांशी मैत्रीपूर्ण धोरणात आता परवाने देण्यासाठी एक खिडकी पद्धत लागू करणार आहोत. अर्ज केल्यापासून ठराविक दिवसात ना देय प्रमाणपत्र देणे कार्यालयांना बंधनकारक राहाणार आहे. उद्योगाच्या संदर्भात पारदर्शक धोरण ठेवून मिहानमध्ये वीज देण्यात येईल. उद्योगांना चालना देणाऱ्या धोरणामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल.

### दोन वर्षात क्षमता दुप्पट करण्याचे ध्येय

सीएट टायर्स लि.चे व्यवस्थापकीय संचालक अनंत गोयंका म्हणाले की, बुटीबोरीमध्ये अत्याधुनिक टायर प्रकल्पात ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. एप्रिल,२०१६ पर्यंत प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होईल. ६० एकर जागेवर हा अत्याधुनिक टायर प्रकल्प पसरलेला असून १.२ दशलक्ष टायर्सची निर्मिती होईल. दोन वर्षाच्या आत आमची क्षमता दुप्पट होईल. या समारंभास उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री प्रवीण पोटे, सीएट टायरचे कार्यकारी संचालक अनंत गोएंका आदी उपस्थित होते.

### एकाच दिवसात लेटर ऑफ इंटेंट

देशाच्या इतिहासातील पहिल्यांदाच एकाच दिवसात लेटर ऑफ इंटेंट देण्याचा विक्रम नव्या सरकारने सत्तेत आल्या आल्या केला.

नव्या शासनाने ३१ ऑक्टोबर रोजी शपथ घेतली. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी सीएटने मागणीपत्र दिले. लगेच संध्याकाळी लेटर ऑफ इंटेंट पत्र शासनाकडून वितरित करण्यात आले.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:38 PM Page 35

# अमेरिकेच्या २२ उद्योजकांनी दाखविले गुंतवणुकीत स्वारस्य



**अमेरिकचे महावाणिज्य दूत थॉमस वाडा आणि उद्योजकांसोबत मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री**

महाराष्ट्रात येऊ इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांना सर्व प्रकारच्या आवश्यक पायाभूत सुविधांसोबतच गतिमान निर्णयप्रक्रिया आणि उद्योगस्नेही वातावरणाची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अमेरिकेचे महावाणिज्य दूत थॉमस वाडा यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेतील २२ प्रमुख उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींनी फडणवीस यांची रामगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना सर्व सुविधायुक्त मिहानमध्ये आणि महाराष्ट्रात कोठेही उद्योग उभारण्याचे आवाहन केले. यावेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील गुंतवणुकीचा आपला अनुभव अतिशय समाधानकारक असल्याचे सांगितले. मेक इन महाराष्ट्र संदर्भात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याबाबत जे निर्णय घेतले, त्याबद्दल या उद्योगपतींनी समाधान व्यक्त केले. यावेळी सुकांती घोष,आशिष दुबे (APCO), मोहित बन्सल (AMAZON), वरुण खन्ना (BECTON), प्रत्युष कुमार (BOEING), प्रसाद शिवलकर (HINDUSTAN COCA-COLA), निकेत घाटे (COLGATE), रुस्तुम देसाई (CORNING), राजीव सिंग (DATACARD), विशाल वर्मा (EDGEWOOD), पी. बालेंद्रन ( GENERAL MOTORS), वरुण जैन (HONEYWELL), अनुप कुमार मेहरोत्रा, सुनिल नाईक, व्ही.व्ही. नाईक (JABIL CIRCUIT), जावेद अहमद (CATERPILLAR), महेश कृष्णमूर्ती (RGP), गिरीधरन अय्यर (VARIAN MEDICAL), क्रिश अय्यर, रजनीश कुमार (WAL-MART), अजय सिंघा, सुरभी वाहेल (AMCHM) आदी उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते.

## टाटा समूहाच्या उपक्रमास सहकार्य

राज्यातील सुमारे एक कोटी मुलांचा शिक्षणातून सर्वांगीण विकासाचा प्रकल्प टाटा समूह सुरू करीत असून राज्य शासनाने यात सहभागी व्हावे अशी भूमिका टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष सायरस मिस्त्री यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मांडली. या उपक्रमात राज्य शासन भागीदाराची भूमिका बजावेल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. टाटा समूहाचे अध्यक्ष सायरस मिस्त्री यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. उद्योग क्षेत्राबरोबरच खासगी संस्थांचा सामाजिक उपक्रमात सहभाग (सीएसआर) या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्योग वाढीसाठी राज्यशासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले की, खासगी संस्थांचा सामाजिक उपक्रमात सहभाग (सीएसआर) या योजनेंतर्गत टाटा समूह राज्यातील सुमारे एक कोटी मुलांचा शिक्षणातून सर्वांगीण विकासाचा प्रकल्प सुरू करीत आहे त्यात राज्य शासन भागीदाराची भूमिका बजावेल.

मेक इन महाराष्ट्र

## पाच लाख कोटींच्या गुंतवणुकीसाठी प्रयत्नशील

महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणुकीत आघाडीवर ठेवण्याबरोबरच उद्योग क्षेत्राला नवी झळाळी देण्यासाठी सुमारे ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी दिली आहे.

उत्पादन क्षेत्रात वाढ करून २० लाख रोजगार निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. नवीन औद्योगिक धोरण तसेच माहिती तंत्रज्ञान धोरणाला मार्च २०१५ पर्यंत वाढ देऊन या क्षेत्रास झळाळी प्राप्त करून देण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात येईल. उद्योगांना असंख्य परवाने द्यावे लागतात. ते परवाने २०-२५ वर आणण्यात येतील.

विदर्भात ३६१ विशाल प्रकल्प २९५०० लहान/मोठे प्रकल्प ११ जिल्ह्यात उभे राहणार आहेत. ६३ हजार ८०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाद्वारे ३ लाख ४३ हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल. इंडोरामा, मोरारजी, महिंद्रा आणि महिंद्रा, रेमंड, अम्बुजा यासारखे उद्योगही येणार आहेत. उद्योगासाठी ज्यांनी जमिनी घेतल्या आणि मुदतवाढ देऊनही ज्यांनी उद्योग उभारला नाही त्यांच्यावर कारवाई केली जाईल. नवीन उद्योगांचे परवाने कमी करण्याबरोबरच विजेचे दर कमी करण्यात येतील.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 36

# सौरऊर्जेची किमया

**सौरऊर्जेवर चालणाऱ्या कृषी पंपांचा शेतकऱ्यांना चांगला लाभ मिळू शकतो. त्याचा फायदा घेऊन शेतीच्या उत्पादनात वाढ करता येऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या कृषी पंपांचा अधिकाधिक वापर शेतकऱ्यांनी करावा, अशी भूमिका घेतली आहे. पुढील काही वर्षात पाच लाख कृषी पंप बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

पाणी आहे पण वीज नाही. वीज आहे पण ती अखंडितपणे मिळत नाही, अशा विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. मध्यप्रदेश, राज्यस्थान व अन्य राज्यात अपारंपरिक ऊर्जेचा वापर करून सौरऊर्जेवर चालणारे पंप शेतकऱ्यांना देऊन वेगळा मार्ग चोखाळला. परिणामी शेती ओलिताखाली आली. शेतीचे उत्पादन वाढले. कृषिदर झपाट्याने वाढले शेतीसाठी लागणारी वीज अन्यत्र वळविली, त्यामुळे उद्योगालाही वीज मिळू लागली.

अन्य राज्यात ही किमया होऊ शकते, तर महाराष्ट्रात का नाही? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथील आढावा बैठकीत केला. प्रधान सचिव अजय मेहता यांना या दिशेने पाऊल टाकण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री ठिकठिकाणी सौर ऊर्जेवर ठामपणे बोलत आहेत. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देणे आणि त्यांच्या पाठिशी उभे राहावे, हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे, असे ते मानतात.

सौरऊर्जेवर शेती ओलिताखाली आणता येते, ही संकल्पना आपल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी नवी आहे. घराच्या छतावर सौरऊर्जेचे पॅनल लावून घरात दिवे आणि गरम पाण्याची सोय करता येते, हे आपण पहिले आहे, परंतु सिंचन करता येते ही बाब प्रत्यक्षात जाणून घेण्यासाठी त्या शेतकऱ्यांचा शोध घेतला.



गणपतराव चापले हे नरखेड तालुक्यातील तिनखेडा या गावचे शेतकरी! गावात येण्याचे प्रयोजन सांगितल्यानंतर ते स्वत: नागपूरला आले त्यांच्यासमवेत सकाळी नऊ वाजायच्या सुमारास तिनखेडयाकडे आम्ही निघालो. नागपूरपासून सुमारे १०० कि.मी. अंतरावर हे गांव आहे. ३०-३५ कि.मी.चे अंतर कापल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला संत्र्यांच्या बागा दिसत होत्या. त्या बागांकडे आम्ही कौतुकाने पाहत होतो. ही बाब चापले गुरूजींच्या लक्षात येताच त्यांनी ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितली. कशासाठी थांबलो, हे आम्हाला कळण्याच्या आतच त्यांनी पटापट संत्र्यांच्या झाडावरील दहा-बारा संत्री तोडली आणि आमच्या हातात दिली.

या भागात चापले यांना गुरूजी म्हणून ओळखतात. दोन वर्षांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर काय करणार? असा प्रश्न केन्द्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी त्यांना विचारले असता, 'शेती..! असे उत्तर त्यांनी दिले. गडकरीदेखील अवाक् झाले, मला वाटले, आपण शिक्षण क्षेत्रात काम कराल, गडकरी यांचा प्रतिप्रश्न.''

आज शेतकरी मोठया संकटातून वाटचाल करीत आहे. अशा स्थितीत त्यांच्या बरोबरीने काम का करू नये? असा प्रश्न मी मनाशी केला आणि मी शेती करण्याचा निर्णय घेतला अशी भावना व्यक्त करताच गडकरी यांनाही आनंद झाला. चापले गुरूजी सांगत होते. तेवढ्यात त्यांचे शेत आले. आपल्या विहिरीवर बसविलेल्या सौरऊर्जा पंपाविषयी ते माहिती देऊ लागले, ते म्हणाले, विजेच्या लंपंडावामुळे शेतातील संत्रा बागा सुकून जायच्या, डॉ. भोरे हे आमचे इंजिनिअर मित्र! सौरऊर्जेवर ते संशोधन करीत होते. त्यांच्या सूचनेनुसार डिसेंबर २०१२ मध्ये दोन हॉर्स पॉवरचे ७६ वॉट क्षमतेचे सौरऊर्जेचे १६ पॅनल बसविले. त्यासाठी ३ लाख २३ हजार रुपये खर्च आला. हा आमच्या भागातील पहिलाच प्रयोग होता. सौर ऊर्जेवर पंप कसा चालतो हे बघण्यासाठी आजूबाजूचे शेतकरी आले होते. सर्वांच्या साक्षीने पंप सुरू झाला. दोन इंच पाणी विहिरीतून बाहेर फेकू लागला.

या संदर्भात तांत्रिक माहिती देताना ते म्हणाले, रोज ३६ ते ४० हजार लिटर पाणी सिंचनासाठी उपलब्ध होते. डिसेंबर आणि जानेवारीच्या महिन्यात पाण्याचा दाब थोडा कमी होतो, परंतु उर्वरित दहाही महिने मुबलक पाणी उपलब्ध होते. माझी तीन एकर शेती ओलिताखाली आहे. २५० संत्र्यांच्या

झाडांना पाणी देण्यात येते. वार्षिक उत्पन्न खर्च वजा जाता अडीच ते तीन लाख रुपये मिळते.

या विहिरीवर १० हॉर्स पॉवरची विद्युत मोटर आहे, परंतु सोलर पंप त्यास चांगला पर्याय ठरत आहे. गतवर्षी कापासाची लागवड केली. मात्र मध्येच पावसाने ओढ दिली. त्यामुळे इत्तर शेतकऱ्यांची पिके करपू लागली. मात्र सौरऊर्जेच्या पंपावर मी पिके वाचवली. पाऊस नाही, वीज नाही, अशावेळी शेतकरी हतबल होतो. मुख्यमंत्र्यांनी सोलर पंपाची संकल्पना बोलून दाखविली, खरोखरच हा आंबिया बहार फुटल्यामुळे आर्थिक उत्पन्नही झाले आहे. पुढील वर्षी प्रत्येक झाडावर ३०० ते ४०० फळे लागतील आणि दोन ते अडीच लक्ष रुपयांचे उत्पन्न होईल, असा विश्वासही चापले यांनी व्यक्त केला.

सोलर पंपाद्वारे ८० फूट खोल विहिरीतून सबमर्सिबल पंपाद्वारे पाणी काढण्यात येते. यासाठी संपूर्ण स्टीलचा पंप बसविण्यात आला. यासाठी सौरऊर्जाक्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले. त्या ठिकाणी उपस्थित असलेले तिनखेडा या गावातील प्रगतिशील

**सौरपंप बसविण्यासाठी प्रारंभी खर्च करावा लागतो. परंतु दोन वर्षापासून कुठलाही खर्च नाही. विद्युतीकरण केल्यास दर महिन्याला २ ते ३ हजार रुपयाचे वीजबिल भरावे लागत. विहिरीतून पाण्याचा डिस्चार्ज चांगला आहे. पावसाळ्यात बॅटरीसुध्दा चार्जिंग होऊ शकते. विदर्भातील तीव्र उन्हाळा हा सौरऊर्जेसाठी चांगला पर्याय आहे.**



**सबमर्सिबल (स्टील बॉडी असलेल्या) पंपाद्वारे डी.सी. विद्युत पुरवठ्याने विहिरीतून पाणी थेट पिकांना देण्यात येते. यासाठी दोन किलोमीटर लांबीच्या पाइप लाइनद्वारे प्रवाही पद्धतीने ठिबक सिंचनाचा वापर करून संत्र्याच्या झाडाला पाणी दिले जाते. सोलर पंपाद्वारे ८० फूट खोल विहिरीतून सबमर्सिबल पंपाद्वारे पाणी काढण्यात येते. यासाठी फालकन या कंपनीचा संपूर्ण स्टीलचा पंप बसविण्यात आला.**

स्तुत्य उपक्रम आहे. जे शेतकरी स्वत:च्या खर्चाने सोलर पंप घेऊ शकत नाही, त्यांच्यासाठी तर हा आशेचा किरण आहे.

सबमर्सिबल (स्टील बॉडी असलेल्या) पंपाद्वारे डी.सी. विद्युत पुरवठ्याने विहिरीतून पाणी थेट पिकांना देण्यात येते. यासाठी दोन किलोमीटर लांबीची पाइप लाइन टाकण्यात आली असून प्रवाही पद्धतीने ठिबक सिंचनाद्वारे प्रत्येक संत्र्याच्या झाडाला पाणी सिंचन केले जाते. २५० संत्र्याच्या झाडासह ५० मोसंबीची झाडेही या सिंचनाखाली आणली आहेत. संत्र्याची झाडे ६ वर्षांची झाली असून यावर्षी शेतकरी सुभाष मारोतराव उमाठे यांच्याकडे १७ एकर जमीन असून शेतात सिंचनासाठी विहीर आहे. परंतु शेतीला पाणी देण्याची सुविधा नसल्यामुळे परंपरागत कोरडवाहू पिकेच घ्यावी लागतात. सोलर पंप उपलब्ध झाल्यास विविध पिकांसह फळझाडेही जगवता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्याधर पांडुरंग कामडी या युवा शेतकऱ्याकडे २ एकर शेती आहे. शेतात विहीर असूनही सिंचनाची सुविधा नसल्यामुळे कापूस हे एकमेव पीक ते घेतात. सोलरसारखी पर्यायी व्यवस्था निर्माण झाल्यास संत्राबाग फुलविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरेश यादवराव बारई हा प्रगतिशील शेतकरी असून सात एकर शेतीवर कापूस, सोयाबीन आदी पिके घेत आहे. मागील वर्षी पावसात खंड पडल्यामुळे पिकांचे नुकसान झाले. अशावेळेस एक पाणी दिले तरी पिके वाचू शकतात. यासाठी सोलर पंपांची सुविधा अत्यंत आवश्यक असून शासनाने सवलतीच्या दराने सोलर पंप उपलब्ध करून दिल्यास तत्काळ बसविण्याची तयारीही दर्शविली. नरखेड परिसरातील गणपतराव मुकुंदराव चाफले यांनी शेती सिंचनासाठी सौरऊर्जेवर चालणारा पंप बसविल्यामुळे शेतीमध्ये झालेल्या बदलाबाबतची अनेक शेतकरी या उपक्रमाला भेट देऊन पाहणी करतात व सोलर पंपाच्या उपयुक्ततेची माहिती घेतात. विदर्भ वैधानिक विकास मंडळातर्फे अतिदुर्गम व आदिवासी भागातील शेतकऱ्यांना सोलर पंप पुरविण्याच्या योजना आखताना, गणपतराव चाफले यांनी सुरू केलेल्या उपक्रमाच्या यशस्वितेची व उपयुक्ततेची माहिती घेण्यात आली आणि त्यानंतरच धानोरा, अहेरी, एटापल्ली, भामरागड तसेच सिरोंचा तालुक्यातील २३ आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीला सिंचनासाठी सौरऊर्जेवर चालणारे कृषिपंप देण्यात आले. सौरउर्जेद्वारे कृषिपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आलेल्या आणि मागील दोन वर्षांपासून यशस्वीपणे सुरू असलेल्या या उप्रक्रमाचा आदर्श इतरांनाही निश्चित मार्गदर्शक ठरणारा आहे.

**मोहन राठोड**
**अनिल गडेकर**

❑ ❑

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 38

# गौरव व्यासंगमूर्तीचा

**नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात संसदीय प्रशिक्षण समितीने ज्येष्ठ पत्रकार व व्यासंगी भाष्यकार मा. गो. वैद्य यांचा सत्कार केला. हा सोहळा अतिशय भावपूर्ण व चिरस्मरणीय झाला.**



**ज्येष्ठ पत्रकार मा. गो. वैद्य यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख आणि श्रीमती वैद्य.**

दुपारी साडेतीनची वेळ.. नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या कार्यकाळात दरवर्षी एका ज्येष्ठ पत्रकाराचा सत्कार करण्याची परंपरा वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण समितीने सुरू केली. यावर्षीच्या कार्यक्रमाचे वेगळेपण होते, व्यासंगी भाष्यकार व प्रसिद्ध विचारवंत आणि ज्येष्ठ पत्रकार मा. गो. वैद्य यांच्या सत्काराचे !

बरोबर साडेतीन वाजता सत्कारमूर्तींचे सपत्नीक आगमन झाले. त्यानंतर काही क्षणातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, विधान परिषद सभापती शिवाजीराव देशमुख, आदी मंत्री व मान्यवरांचे आगमन झाले. सर्वांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात सत्कारमूर्तींचे अभिनंदन केले. त्यांनी नम्रपणे अभिनंदनाचा स्वीकार केला. सभागृह खचाखच भरले होते. तरुण, अभ्यासू व व्यासंगी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार होणार होता. स्वागताचा सोपस्कार पार पडल्यानंतर मा. गो. वैद्य आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, 'खरे तर मी अपघाताने पत्रकार झालो. वयाच्या ४१ व्या वर्षी कोणी पत्रकार होतो काय? असा मनाशी प्रश्न करून खरे तर मी हाडाचा शिक्षक- प्राध्यापक नंतर पत्रकारितेत आलो. पत्रकार व राजकारणी हे प्रतिस्पर्धी असले तरी समाजाचे कल्याण हे दोन्ही क्षेत्राचे ध्येय असले पाहिजे' असे भाष्य करत दोन्ही क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. भाषणाच्या प्रारंभी ते म्हणाले, 'देवेंद्रजी म्हणताना अवघडल्यासारखे होत आहे' असे भावोद्गार त्यांनी काढताच त्यामागची भावना सभागृहातील सर्वांच्याच लक्षात आली.

> 'बाबुराव वैद्य हे आम्हाला पितृतुल्य आहेत. त्यांनी ज्या क्षेत्रात काम केले त्या क्षेत्रात ते रमले. . . . त्या क्षेत्राला न्याय दिला. त्यांनी जी जबाबदारी स्वीकारली ती इमानेइतबारे त्यांनी समर्थपणे पार पाडली. पत्रकार, राजकारणी सामाजिक कार्यकर्ते सर्वांसाठी त्यांचे विचार पथदर्शी आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो.'
>
> **– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे आमदार होते. त्यांचे स्नेही होते. बरोबर काम केलेले. एकमेकांच्या घरी उठबस होती. त्यामुळे आजचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लहानाचे मोठे होताना जवळून पाहिले होते. आपला मुलगा मोठा होताना जो आनंद होतो, तेवढाच आनंद मा. गो. वैद्य व त्यांच्या सुविद्य पत्नी यांना होत असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

आज ते ९१ वर्षांचे झाले; परंतु त्यांचा कणखर आवाज आणि स्मरणशक्ती बघून सर्वचजण अचंबित होत होते. प्राध्यापक, पत्रकार, संपादक, आमदार, भाष्यकार या सर्वच क्षेत्रात ते मुक्तपणे वावरले. तरुण भारतचे ते संपादक होते. त्या वृत्तपत्रात त्यांनी भरपूर लिखाण केले. परंतु अन्य ठिकाणीही प्रसंगानुरूप ते लिहीत राहिले. बाबुराव आज लिहिणार, बाबुरावांनी काय लिहिले, अशी चर्चा त्या काळी रंगायची. त्यांचे वक्तृत्व म्हणजे सर्वांसाठी एक पर्वणीच असायची. आजच्या कार्यक्रमातही तीच शैली.. ते बोलतच राहावेत आणि आपण ऐकतच राहावे, असा श्रोतृवर्गामध्ये सूर दिसत होता. आमदारकी कशी मिळाली, याची आठवण सांगताना, आपण कधी निवडणूक लढविली नाही; पण विधान परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून निवडून गेलो. आमदारकी मागायला कधी गेलो नाही, ती चालून आली.

ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याकडून संपादकाची सूत्रे स्वीकारताना निश्चितच दडपण होते. १७ वर्षे संपादकत्वाची जबाबदारी स्वीकारतच अन्य टोपणनावानेही भरपूर लिखाण केले. पत्रकारांनी विवेक ठेवणे गरजेचे आहे. लिहिताना कोणाची निंदानालस्ती होता कामा नये हे पथ्य मी आयुष्यभर पाळले.

या कार्यक्रमाचा सोहळा भावपूर्ण असाच होता. अशा ज्येष्ठ व्यासंगी पत्रकाराचा सत्कार करून विधान मंडळ सचिवालयाने नि:पक्ष पत्रकारितेचा सन्मान केला आहे.

**अनिल गडेकर**

❒ ❒

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 39

# गौरव दोन दिग्गजांचा




माजी पंतप्रधान ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी आणि थोर शिक्षणतज्ज्ञ व स्वातंत्र्यसैनिक पं. मदनमोहन मालवीय यांना देशाचा सर्वोच्च 'भारतरत्न' नागरी सन्मान देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे.२५ डिसेंबर हा दोन्ही महान नेत्यांचा जन्मदिवस. त्यांच्या जन्मदिवसाच्या पूर्वसंध्येलाच सरकारने ही घोषणा केली. वाजपेयी यांचा जन्मदिवस 'सुशासनदिन' म्हणूनही साजरा करण्यात आला.


हिंदू महासभेचे नेते, काँग्रेसचे स्वातंत्र्यपूर्व काळातील माजी अध्यक्ष आणि बनारस हिंदू विश्व विद्यापीठाचे संस्थापक असलेल्या पं.मालवीय यांना हा पुरस्कार मरणोत्तर देण्यात येणार आहे. येत्या २६ जानेवारीला हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या निर्णयाचे स्वागत केले असून देशभर आनंद व्यक्त करण्यात येत आहे. प्रणव मुखर्जी यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून देखील ही माहिती देण्यात आली आहे.



पंडित मदनमोहन मालवीय आणि अटल बिहारी वाजपेयी यांचे कार्य अतुलनीय असून देशासाठी प्रेरणा देणारे आहे. त्यांचा 'भारतरत्न'ने सन्मान होणे हा उचित सन्मानच आहे.

**- नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान**

## अटलबिहारी वाजपेयी यांचा अल्पपरिचय



- २५ डिसेंबर १९२४ रोजी ग्वाल्हेर येथे जन्म.
- **शिक्षण :** राज्यशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी
- १९३९ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश १९४२ मध्ये भारत छोडो चळवळीत सहभागाबद्दल अटक
- श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासमवेत भारतीय जनसंघाचे काम सुरू.
- १९५७ मध्ये बलारामपूर मतदारसंघातून संसदेत प्रथम प्रवेश
- जनता पक्षाच्या सरकारमध्ये २७ मार्च १९७७ ते २८ जुलै १९७९ या कालावधीत परराष्ट्रमंत्री म्हणून काम
- १९८० भारतीय जनता पक्षाची स्थापना केली.भाजपचे ते पहिले अध्यक्ष.
- १६ मे १९९६ ते १ जून १९९६ या केवळ १३ दिवसांसाठी पंतप्रधान म्हणून रालोआचे सरकारचे नेतृत्व केले.
- १९ मार्च १९९८ ते १९ मे २००४ या कालावधीत पुन्हा पंतप्रधानपद.
- वाजपेयी यांना १९९२ साली पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- १९९४ साली लोकमान्य टिळक पुरस्काराने गौरव. त्याच वर्षी उत्कृष्ट संसदपटू म्हणून भारतरत्न पंडित गोविंद वल्लभ पंत पुरस्काराने वाजयेपी यांना सन्मानित करण्यात आले.

## पंडित मदनमोहन मालवीय यांचा अल्पपरिचय



- **जन्म :** २५ डिसेंबर १८६१ अलाहाबाद येथे
- भारतीय समाजकारण आणि राजकीय, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत तेजस्वी व्यक्तिमत्त्व.
- वयाच्या पाचव्या वर्षापासून वडिलांनी त्यांना संस्कृत शिकविण्यास सुरुवात केली.
- जुलै १८८४ मध्ये अलाहाबाद येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून ते रुजू झाले.
- १८८६ 'हिंदुस्थान' दैनिकांत संपादक म्हणून नियुक्ती केली.
- १८८८ दि इंडियन युनियनचे सहसंपादक म्हणून रुजू झाले.
- १९१६ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना
- 'सत्यमेव जयते' घोषणेचे जनक.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे १९०९ आणि १९१८ मध्ये अध्यक्ष.
- १९२४ ते १९४६ या कालावधीत 'हिंदुस्थान टाइम्स'चे अध्यक्षपद भूषविले.
- स्वदेशीची चळवळ, वंगभंग चळवळ, असहकार आंदोलन यामध्ये सक्रिय सहभाग
- महात्मा गांधींकडून 'महामाना' म्हणून गौरव. ही पदवी मिळविणारे एकमेव व्यक्तिमत्त्व.



पंडित मदनमोहन मालवीय आणि अटल बिहारी वाजपेयी यांचा भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाणे हा त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा उचित सन्मानच आहे.

**- देवेंद्र फडणवीस,**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**



वाजपेयी यांना 'भारतरत्न' जाहीर झाल्याने आपल्याला आनंद झाला आहे.. त्यांचा मुत्सद्दीपणा राजकारणापेक्षा उच्च होता

**- अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन,**
**नोबेल पुरस्कार विजेते**

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 40



# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा



सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करताना कामाचा दर्जा तसेच वेळेचे बंधन याचा समन्वय साधून निर्धारित वेळेत आराखड्यानुसार कामे पूर्ण करा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अनुषंगाने आयोजित बैठकीत दिल्या आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनाची तसेच पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी तसेच प्रभारी मंत्री म्हणून जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे १४ जुलै ते १९ ऑगस्ट २०१५ पर्यंत सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनातर्फे विविध पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. यासाठी २ हजार ३७८ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विभागनिहाय आराखडा तयार करण्यात आला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शाही स्नानाच्या मार्गामध्ये बदल करून, दुर्घटना होणार नाही. या दृष्टीने पर्यायी मार्गाबाबत महंत आणि साधू यांची संमती प्रशासनाने मिळवावी असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. साधुग्राम तयार करण्यासाठी ३२५ एकर जागेचे तात्पुरते अधिग्रहण आवश्यक आहे. यासाठी न्यायालयात असलेल्या प्रकरणासंदर्भात राज्याचे महाधिवक्ता राज्याची बाजू मांडतील.

पहिल्यांदाच आठ घाट तयार करण्यात येत असून या घाटाच्या सौंदर्यीकरणाचे कामही पूर्ण करावे. तसेच त्र्यंबकेश्वर येथे चार घाट बांधण्यात येणार आहेत. त्र्यंबकेश्वर व नाशिक येथील स्वच्छतेला प्राधान्य देऊन नदीच्या पात्रातील पाणी स्वच्छ राहील यासाठीही तातडीने उपाययोजना करण्यात येतील.

# गावातील अतिक्रमण मुक्तीसाठी कायद्यात सुधारणा

ग्रामीण भागातील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी तसेच अशी बांधकामे भविष्यात होऊ नयेत या दृष्टीने योग्य कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

गावठाण क्षेत्रामध्ये विकास परवानगी देण्यासाठी ग्रामपंचायत सक्षम असेल. गावठाणाबाहेरील क्षेत्रातील विकास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी हे सक्षम असतील. संपूर्ण जिल्ह्यातील विकास परवानगी देण्याचे, जिल्हाधिकारी स्तरावर केंद्रित झालेले अधिकार, विकास परवानगी मंजुरीची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टिकोनातून, तहसीलदारांपर्यंत देण्यात येतील.

अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येतील.

## तारांकित

### दहिहंडी उत्सव साहसी क्रीडा प्रकार म्हणून मान्य

दहिहंडी उत्सवाला साहसी क्रीडा प्रकार म्हणून मान्यता दिली जाईल, अशी घोषणा क्रीडा मंत्री विनोद तावडे यांनी केली आहे.

राज्यामध्ये क्रीडा धोरण नव्याने तयार केले जाईल. मुंबई शहर आणि उपनगरात ४ क्रीडासंकुले उभारण्यात येतील. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा योग दिवस म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातही योग महोत्सव २१ जूनला भव्य स्वरूपात साजरा केला जाईल. त्याबाबतचे नियोजन आणि महोत्सवाचे स्वरूप ठरविण्यासाठी एक स्वतंत्र कमिटी गठीत केली जाईल.

३८१ क्रीडा संकुलांपैकी २७८ तालुक्यांमध्ये भूखंड उपलब्ध आहेत. त्यापैकी २६ क्रीडासंकुले पूर्ण झाली असून १६९ संकुलाची कामे प्रगतिपथावर आहेत. १०३ तालुक्यांमध्ये संकुलासाठी जागा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. ८३ तालुक्यातील कामे तांत्रिक व प्रशासकीय कारणामुळे सुरू होऊ शकलेली नाहीत.

जिल्हा व तालुकास्तरावरील क्रीडा संकुलांची बांधकामे निधी उपलब्धतेच्या अधीन राहून प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील.



3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 41

# अंधशाळेला राज्यपालांची भेट



अंध विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी नागपूर येथील दक्षिण अंबाझरीतील ब्लाईंड रिलीफ असोशिएशन नागपूरद्वारा संचालित असलेल्या अंध विद्यालयात भेट दिली. तेव्हा केले. या अंध विद्यालयाच्या ऑर्केस्ट्राबद्दल त्यांनी कौतुकोद्गार काढले.

राज्यपालांनी या विद्यालयातील संगणक कक्ष, दृकश्राव्य स्टुडिओ, कार्यशाळेला भेट देऊन माहिती जाणून घेतली. ब्रेल लिपीच्या टाइपरायटरवर अंध विद्यार्थी अमोल साहू याने टाइप केलेले, 'आपण या संस्थेला भेट दिली म्हणून आम्हाला आनंद झाला आहे,' हे वाक्य दाखविले. ब्रेललिपीद्वारे गणित करणे, संगणकावरील चित्रात रंग भरणे व त्याची ओळख यावेळी अंध विद्यार्थ्यांनी राज्यपालांना करून दाखविली. त्यांनी ब्रेल लिपी प्रिंटरची पाहणी केली.

विदर्भात ब्रेललिपीतील पुस्तकाची छपाई या विद्यालयात होत असल्याची माहिती संस्थेचे सहसचिव नागेश कानगे यांनी दिली. ब्रेललिपीत तयार करण्यात आलेल्या रानवाटा, ग्रामगीता, श्रीमत दासबोध, त्यागमूर्ती अनुताई वाघ या ब्रेललिपीतील पुस्तकांचीदेखील पाहणी राज्यपालांनी केली.

# टंचाईग्रस्त गावांना अखंडित वीज पुरवठा

टंचाईग्रस्त गावांचा वीजपुरवठा खंडित केला जाणार नाही, अशी ग्वाही ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

टंचाईग्रस्त भागात शेतकऱ्यांच्या अनधिकृत जोडण्यांना जागेवरच वैध करण्याबरोबरच रोहित्र जळणार नाहीत याचीही काळजी घेतली जाईल. जळालेल्या रोहित्रांच्या ठिकाणी नवीन रोहित्र बसविले जातील. दुष्काळी भागातील कृषिपंपाचे तीन महिन्याचे थकीत वीजबिल माफ केले जाईल. दुष्काळग्रस्त १९ हजार गावांचे पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे कनेक्शन तोडले जाणार नाही. कृषिपंपासाठी प्रतीक्षाधीन शेतकऱ्यांना सौर पंप देण्याबरोबरच सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना व आदिवासी शेतकऱ्यासाठी सौर पंप, वॉटर गिझर देण्याच्या दोन योजना राबवण्यात येणार आहे.

**उद्योगांसाठी कमी वीजदर**


नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी या महिन्यात उद्योगाचे विजेचे दर कमी करण्यात येतील. चांगला कोळसा राज्याला मिळावा यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच विजेच्या मनोऱ्यासोबतच्या लाइनसाठी नवीन धोरण आखण्यात येणार आहे. वीज निर्मितीच्या परिसरातील किमान ५ कि.मी. सभोवतालचा परिसर भारनियमनमुक्त करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## तारांकित

### लोकनेते गोपिनाथ मुंडे ऊसतोड कामगार मंडळ

लोकनेते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र ऊसतोड कामगार व तत्सम श्रमजीवी कल्याण मंडळ स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

ऊसतोड कामगारांना देय असलेल्या सोयी-सुविधा मिळत नाहीत. त्यांचे जीवनमान आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करणे, सामाजिकदृष्ट्या त्यांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या जीवनात स्थिरता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी



माथाडी अधिनियम १९६९ अंतर्गत ऊसतोड कामगारांचे मंडळ स्थापण्याचे ठरविले आहे. हे मंडळ लोकनेते गोपिनाथ मुंडे यांच्या नावाने स्थापन करण्यात येईल. या मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असेल तर मुख्यालय परळी, जिल्हा बीड येथे राहील. या मंडळामार्फत ऊसतोड कामगारांची मजुरी व त्यावरील लेव्ही ही मालकामार्फत थेट मंडळात जमा करण्यात येईल. त्याद्वारे या कामगारांची मजुरी मंडळामार्फत देण्यात येईल. लेव्हीतून विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येतील. मंडळास प्राप्त होणाऱ्या लेव्हीतील ३ टक्के लेव्ही ही प्रशासकीय खर्चासाठी वापरण्यात येईल.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 42



# मुंबई होणार आदर्श शहर



झी बिझनेस या वृत्तवाहिनीच्या पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री

मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईला शांघाय किंवा वॉशिंग्टन न बनविता मुंबईला आदर्श शहर हा नावलौकिक मिळवून देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी झी बिझनेस या वृत्त वाहिनीच्या ५ व्या बेस्ट मार्केट ॲनालिस्ट ॲवार्ड २०१४ या कार्यक्रमात स्पष्ट केले.

'मेक इन महाराष्ट्र' यशस्वी होण्यासाठी योजना आखायला आणि राबवायला सुरुवात झाली आहे. मुंबईतील दळणवळणाच्या समस्या सोडविण्यासाठी नुकतीच ७२ कि. मी. मेट्रो रेल्वे मार्गाला मान्यता देण्यात आली आहे. कोस्टल रोड आणि हार्बर स्कीमचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत. यापुढे मुंबईत गृहनिर्माण क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. राज्यात उद्योगाला अनुकूल वातावरण निर्माण केले जात आहे. उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या प्रस्तावात सुलभता आणली आहे. सर्व व्यवहार ऑनलाइन करून पारदर्शकता आणली आहे. गुड गव्हर्नन्ससाठीच्या सगळ्या उपाययोजनांचा आम्ही अवलंब करीत असून येत्या वर्षभरात संपूर्ण देशासाठी महाराष्ट्र गुड गव्हर्नन्स रोल मॉडेल बनेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# संसद आदर्श ग्रामयोजना कार्यशाळा



सिंचनाच्या शाश्वत सुविधेसाठी पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करावे लागणार असल्याचे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी केले आहे.

हिवरेबाजार येथे संसद आदर्श ग्राम योजनेतील पहिली कार्यशाळा घेण्याचा निर्णय ग्रामविकास व जलसंधारण मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी घेतला. त्याला आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी साथ दिली. त्यानुसार हिवरेबाजारच्या यशवंत सांस्कृतिक भवनात ही १ डिसेंबरला एक दिवसीय कार्यशाळा झाली. ग्रामविकास मंत्र्यांनी यावेळी गावाचा फेरफटका मारला व गावातील हॅण्डपंपच्या शुद्ध पाण्याचा आस्वाद घेतला.

## तारांकित ★★★★★

### नियम पाळणाऱ्यांचा सन्मान: हेल्मेटधारकांना गुलाबपुष्प!

लोकशाही राज्यात नागरिकांसाठी नागरिकच कायदे करतात. परंतु नागरिकांच्या फायद्यासाठी असणारे कायदे त्यांनी पाळायचे नाही असे ठरविले तर काय करणार? असा प्रश्न बहुतेकदा प्रशासनाला पडतो. परंतु अशा मानसिकतेवर प्रशासनात नव्याने आलेले तरुण अधिकारी आणखी काही नवीन प्रयोग शोधून काढतात. नव्या पालघर जिल्ह्यातील हा अभिनव प्रयोग आहे. शासकीय यंत्रणेत देखील तुमच्या आमच्या घरातीलच मुले अधिकारी म्हणून येतात. सामान्य जनतेच्या वागणुकीची त्यांना उत्तम जाणीव असते. आतापर्यंत कायदा न



पाळणाऱ्यांना कायद्याची जाणीव करून देण्यासाठी खजील करण्याचे शस्त्र वापरल्याची अनेक उदाहरणे आपण पाहिली. उदा. सिग्नल तोडणाऱ्यांना रस्त्यात रोखून गुलाबपुष्प देणे, सिग्नल नसताना देखील वाहन घुसवून रेल्वे क्रॉसिंग करणाऱ्यांना गुलाबपुष्प देणे असे कायदेभंग करणाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

मात्र आता पालघर जिल्ह्यातील बोईसर विभागाचे तरुण पोलीस उपअधिक्षक विजय सागर यांनी जिल्ह्यात हेल्मेट घालणाऱ्या आणि कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांना गुलाबपुष्प देणे सुरू केले आहे. हा नवा प्रयोग जिल्ह्यात चर्चेत आहे. त्याचबरोबर कायदा न पाळणाऱ्यांनाही यामुळे नैतिक जबाबदारीची जाणीव होत आहे.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 43

## विणकरांचे उत्पादन ऑनलाइन



विदर्भातील विणकरांनी तयार केलेल्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळावे तसेच परंपरागत उत्पादनास आधुनिकतेची जोड देऊन ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी राज्य हातमाग महामंडळाने तयार केलेल्या www.indrayanihandlooms.com या संकेतस्थळाचे तसेच ऑनलाइन पद्धतीने खरेदी प्रणालीचे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

या संकेतस्थळामुळे विणकरांना प्रत्यक्ष लाभ मिळेल तरुण पिढीला हातमागावरील कापडाबद्दल आवड निर्माण होऊन अत्याधुनिक पद्धतीच्या सिल्क, टसर साडी, कोसा सिल्क, अहिंसा सिल्क आदी उत्पादनांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल.

वस्त्रोद्योग विभागाकडून हातमागावर महामंडळाद्वारे उत्पादन दर्जा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. हातमागावर काम करणाऱ्या विणकरांना उत्तम प्रकारच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. विणकरांनी तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी यासाठी हँडलूम ट्रेडमार्क व सिल्क ट्रेडमार्कचे अधिकृत ब्रँड प्रमाणित करण्यात येत आहेत.

ग्राहकांच्या मागणीनुसार कापडाची निर्मिती करण्यात येते तसेच संकेतस्थळामुळे ग्राहकांना ऑनलाइन घरबसल्या खरेदी करणे सुलभ झाले आहे.

## एमटीडीसी आता गुगलवर

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) गुगल या जागतिक सर्च इंजीनच्या ग्रेट ऑनलाइन शॉपिंग फेस्टिव्हलमध्ये (जीओएसएफ) सामील झाले आहे. त्यामुळे गुगलच्या नकाशावर आपली नोंद करणारे पहिले राज्यस्तरीय महामंडळ म्हणून एमटीडीसीने स्थान पटकावले आहे. जीओएसएफ हे राज्यातील पर्यटनस्थळ दर्शवणारे एक महत्त्वाचे साधन ठरू शकते, जागतिक पर्यटकांपर्यंत पोहोचण्यासाठी हा प्रकल्प म्हणजे उत्तम व्यासपीठ आहे. राज्यातील विविध पर्यटनस्थळे त्यामुळे पर्यटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. देशातील २० लाख दर्शकांनी गुगलच्या या प्रकल्पाला प्रतिसाद दिला आहे.

## महाराष्ट्रातील जिल्हानिहाय पालकमंत्री

| जिल्ह्याचे नाव | पालकमंत्री |
|---|---|
| मुंबई शहर | सुभाष देसाई |
| मुंबई उपनगरे | विनोद तावडे |
| ठाणे | एकनाथ शिंदे |
| पालघर | विष्णू सवरा |
| रायगड | प्रकाश महेता |
| रत्नागिरी | रविंद्र वायकर |
| सिंधुदुर्ग | दिपक केसरकर |
| अहमदनगर | प्रा. राम शिंदे |
| नाशिक | गिरीश महाजन |
| धुळे | दादाजी भुसे |
| नंदुरबार | गिरीश महाजन |
| जळगांव | एकनाथराव खडसे |
| पुणे | गिरीश बापट |
| सातारा | विजय शिवतारे |
| सांगली | चंद्रकांत दादा पाटील |
| कोल्हापूर | चंद्रकांत दादा पाटील |
| सोलापूर | विजय देशमुख |
| अमरावती | डॉ. प्रवीण पोटे |
| अकोला | डॉ. रणजित पाटील |
| यवतमाळ | संजय राठोड |
| वाशिम | डॉ. रणजीत पाटील |
| बुलढाणा | एकनाथराव खडसे |
| नागपूर | चंद्रशेखर बावनकुळे |
| वर्धा | सुधीर मुनगंटीवार |
| भंडारा | डॉ. दिपक सावंत |
| गोंदिया | राजकुमार बडोले |
| गडचिरोली | राजे अम्ब्रीशराव अत्राम |
| चंद्रपूर | सुधीर मुनगंटीवार |
| औरंगाबाद | रामदास कदम |
| जालना | बबनराव लोणीकर |
| परभणी | दिवाकर रावते |
| हिंगोली | दिलीप कांबळे |
| नांदेड | दिवाकर रावते |
| लातूर | पंकजा मुंडे |
| उस्मानाबाद | डॉ. दीपक सावंत |
| बीड | पंकजा मुंडे-पालवे |

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 44



## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास अभिवादन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने दादर येथील चैत्यभूमीवर राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. तसेच यावेळी त्रिशरण पंचशील म्हणण्यात आले.

या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विनम्र स्मृतीस पोलीस पथकाद्वारे शासकीय मानवंदना देऊन चैत्यस्तूपावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षणमंत्री विनोद तावडे, गृहनिर्माणमंत्री प्रकाश महेता, खासदार रामदास आठवले, महापौर स्नेहल आंबेकर, मनपा आयुक्त सीताराम कुंटे, विराज आंबेडकर तसेच भंते व अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाद्वारे समतेचा व बंधुभावाचा संदेश देशाला दिला. भारतीय संविधानाद्वारे त्यांनी आधुनिक भारताची मांडणी केली. आज या प्रसंगी आपण सर्वांनी समतेचे राज्य निर्माण करण्याचा संकल्प करू या, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य व सुंदर असे स्मारक बांधण्यास मान्यता दिली आहे. केंद्र व राज्य सरकार त्या अनुषंगाने कायदेशीर तरतुदी तातडीने पूर्ण करेल व इंदू मिल येथे लवकरात लवकर बाबासाहेबांचे जागतिक दर्जाचे, सुंदर व भव्य स्मारक उभारण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. त्यांनी चैत्यभूमीवरील सर्व सोयी-सुविधा, नागरी बंदोबस्त आदी बाबींचा आढावा घेतला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विधानसभेत अभिनंदन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून जगभर साजरा व्हावा असा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्राच्या महासभेने मान्यता देऊन त्यांचा गौरव केल्याबद्दल, महाराष्ट्र विधानसभेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे एकमताने अभिनंदन करण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी हा प्रस्ताव मांडला होता.

२१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सर्व देशांनी साजरा करावा, असा प्रस्ताव पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत मांडला होता. या प्रस्तावाला १९३ पैकी १७६ देशांची सहमती मिळाली.

## श्रद्धांजली

### महाराष्ट्राने तडफदार, अभ्यासू नेता गमावला



शेतकऱ्यांची कर्जमाफी, बेरोजगारांना भत्ता, पोलिसांसाठी फुलपॅण्ट यासारखे अनेक धडाकेबाज निर्णय घेणारे माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रेहमान अंतुले (वय ८५) यांचे २ डिसेंबरला दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला होता. मुख्यमंत्रिपदाच्या आपल्या १८ महिन्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. लातूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची निर्मिती आणि कुलाबा जिल्ह्याचे रायगड हे नामांतर त्यांच्याच कार्यकाळात झाले होते. पोलिसांसाठी फुलपॅण्टचा गणवेश त्यांनीच निश्चित केला. अकोला जिल्ह्यात एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करण्याचा इशारा दिला असता राज्यातील सर्व शेतकऱ्यांना त्यांनी कर्ज माफी जाहीर केली होती. कोकणाच्या विकासासाठीही त्यांनी अनेक पावले उचलली होती. अंतुले तडफदार होते आणि प्रश्न समजून घेण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती. एकदा निर्णय घेतला की, ते कोणत्याही प्रसंगाने डगमगून जात नसत. त्या निर्णयावर ठाम राहत असत. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अभ्यासू आणि कार्यक्षम नेता गमावला आहे.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 45

# काय म्हणतो केळकर समिती अहवाल

राज्याचा समतोल विकास कसा करता येईल, कोणत्या प्रदेशाच्या विकासासाठी काय उपाययोजना करता येतील याचा अभ्यास करून सरकारला शिफारशी करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीचा अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आला.

### डॉ. केळकर समितीच्या अहवालातील ठळक मुद्दे-

- अनुसूचित जाती उपयोजना (SCSP) आणि आदिवासी उपयोजना (TSP) या दोन्ही योजनांसाठी आवश्यक तरतूद करणे.
- जलक्षेत्रातील उपलब्ध होणाऱ्या निधीच्या ८.५ टक्के निधी टंचाईग्रस्त तालुके (४४), भूस्तर प्रतिकूल तालुके (८५), खारपाण पट्टा आणि माजी मालगुजारी तलाव याकरिता प्राधान्याने राखून ठेवणे.
- जलक्षेत्राचा उर्वरित ९१.५ टक्के निधी जलसंपदा, जलसंधारण, कडा (CADA) आणि पाणीपुरवठा व स्वच्छता (जीएसडीएसह) याकरिता उपलब्ध करणे.
- जलक्षेत्रासाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या ३० टक्के निधीमध्ये मंडळ निहाय निधी वाटप करताना विदर्भासाठी ३५.२६ टक्के, मराठवाड्यासाठी २१.५९ टक्के व उर्वरित महाराष्ट्रासाठी ४३.१५ टक्के निधी राखून ठेवण्याचे धोरण सुचवले आहे.
- अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना तसेच पाण्यासाठी असणाऱ्या योजनांसाठी आवश्यक तरतूद केल्यानंतर विकासाचा समतोल साधण्यासाठी सर्वसाधारण क्षेत्राकरिता ६० टक्के निधी राखून ठेवून उर्वरित निधीची मंडळनिहाय विभागणी करण्यात यावी. या मंडळनिहाय विभागणीचे प्रमाण पुढीलप्रमाणे असावे:
- विदर्भ ३०.७८ टक्के, मराठवाडा २८.५१ व उर्वरित महाराष्ट्र ४०.७१ टक्के. तसेच जिल्हा नियोजन समितीस (किमान ३०टक्के) आणि तालुक्यांकरिता (किमान ३० टक्के) याप्रमाणात वाटप करणे.
- क्षेत्रनिहाय निधी वाटपासाठी किमान निकष: संपर्क सुविधा (Connectivity) (रस्ते, रेल्वे, बंदरे व हवाई)-२०टक्के, कृषी व संलग्न सेवा (ADF व सहकार यासह)-१५टक्के, उर्जा-८टक्के, सर्वजनिक आरोग्य-



डॉ. विजय केळकर

११टक्के आणि शिक्षण (प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्र आणि वैद्यकीय) या क्षेत्रातील सर्वसाधारण योजनांच्या किमान निधी विभागणीबाबत प्रादेशिक स्तरावर दक्षता घेणे.

### इतर शिफारशी

- प्रादेशिक विकास मंडळे पुनर्रचित व सुरळीत करणे.
- मंडळावर त्या प्रदेशातील मंत्र्यांव्यतिरिक्त काही विधिमंडळ सदस्य, काही स्थानिक संस्था व काही तज्ज्ञ व्यक्ती यांना प्रतिनिधित्व देणे.
- मंडळाचे सदस्य सचिव अपर मुख्य सचिव दर्जाचे असणे.
- या सदस्यांकडे प्रादेशिक मंडळांवर त्या प्रदेशातील विकास आराखड्यांचे नियोजन, पर्यवेक्षण व संनियंत्रण असेल ह्या बाबींची जबाबदारी.
- राज्यातील सार्वजनिक खाजगी-भागीदारी तत्त्वावरील मोठ्या प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी तसेच प्रकल्पनिहाय कर्जाच्या व्यवस्थापनासाठी 'प्रकल्प मूल्यमापन मंडळा'ची स्थापना करणे.
- राज्यातील सांख्यिकी माहितीच्या बळकटीकरणाकरिता 'राज्य सांख्यिकी मंडळ' स्थापन करणे.
- लोकाभिमुख धोरण व्यासपीठ म्हणून धोरण संस्थांची उभारणी.
- 'महाराष्ट्र विकास संशोधन परिषद' स्थापना करणे.
- जनजाती सल्लागार समितीचे 'जनजाती सल्लागार व विकास परिषद' असे नामाभिधान करून त्याची अधिक व्याप्ती वाढवणे.
- आदिवासी उपाययोजना निधीमधून नियमित सर्वसाधारण योजना राबवण्याआधी प्रामुख्याने आदिवासीभिमुख योजना अधिक्याच्या तत्त्वाने राबविणे.
- प्रादेशिक समतोल राखण्याच्या दृष्टीने आदिवासी उपाययोजनेतील निधी ग्रामसभा, ग्रापंचायत, पंचायत समित्यांनादेखील वितरित करणे.
- 'प्रादेशिक महिला शेतीकाम प्रशिक्षण संस्था' (Farm Women Training Institute) स्थापन करणे.
- लाभदायक रोजगार उपलब्ध होण्यासाठी विशेषत: विदर्भामध्ये खादी, हातमाग आणि तत्सम वस्त्रोद्योग उद्योगांना चालना देणे.
- प्रादेशिक पर्यटन विकास महामंडळांच्या माध्यमातून पर्यटन उद्योगास चालना देणे.
- परभणी- हिंगोली-वाशिम या संपूर्ण प्रदेशाकरिता विशेष मदत निधी (पॅकेज) देऊन सदर प्रदेश वस्त्रोद्योग क्षेत्र म्हणून घोषित करणे.

❐❐

# ध्येयासक्तीला प्रयत्नांची जोड

यूपीएससी परीक्षा देणे आणि यशस्वी होण्याचे ध्येय ठेवणे हेच या परिक्षेत यश मिळविण्याचे पहिले आणि महत्त्वाचे पाऊल आहे. हे पाऊल ज्याने टाकले त्याला यश हुलकावणी देत नाही. समाजसेवेचे व्रत जोपासण्यासाठी मेडिकलचा अभ्यास करून डॉक्टर झालेले आणि त्याचाच परीघ वाढविण्यासाठी प्रशासनात आलेले उस्मानाबादचे जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे सांगातहेत आपल्या यशाची सूत्रे.

**प्रारंभापासूनच समाजसेवेची आवड असणाऱ्या डॉ. प्रशांत नारनवरे यांनी जाणीवपूर्वक नागरी सेवा परीक्षेचा पर्याय निवडला. या सेवेत येऊन शासनाच्या सर्वसामान्यांसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येते. ही बाब चांगलीच ठाऊक असल्याने त्यांनी अतिशय प्रयत्नपूर्वक व नियोजनबद्धरीत्या अभ्यास करून या परिक्षेत उत्तम यश मिळवले. आपले ध्येय निश्चित असेल आणि कठोर परिश्रमाची तयारी असेल तर या अत्यंत कठीण परिक्षेत यश मिळवणे सहजसाध्य होऊ शकते, असा त्यांचा अनुभव आहे.**



**डॉ. प्रशांत नारनवरे**
(रँक १२३)
भाप्रसे, जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद

### वेगळा ठसा निर्माण करण्याचा ध्यास

वडील नागपूरमध्ये वकिली करतात तसेच आई जिल्हाधिकारी कार्यालयात होत्या. त्यामुळे त्यांच्याबरोबर अनेकवेळा जिल्हाधिकारी कार्यालयात जाणे व्हायचे, त्यावेळी वाटायचे आपणही जिल्हाधिकारी व्हावे. पण लहानपणीची ही कोवळी स्वप्ने असतात. नंतर ती मागे पडली. वडील वकिली करत असले तरी मला वकील व्हावे असे कधी वाटले नाही. आपण काहीतरी वेगळे करायचे आणि आपला वेगळा ठसा निर्माण करायचा हा माझा ध्यास पहिल्यापासूनच होता. माझ्या भावाने वडलांप्रमाणेच वकिली व्यवसाय स्वीकारला पण मी मेडिकलला जाण्याचा निर्णय घेतला. समाजासाठी काहीतरी केले पाहिजे असे सतत वाटायचे त्यामुळेच महाविद्यालयीन जीवनातही झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी शिकवणी घेतली.

डॉक्टर झाल्यानंतर आम्ही काही मित्रांनी मिळून समाजातील गरीब व्यक्तींना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात म्हणून प्रयत्न सुरू केले. आम्हाला मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हकडून औषधे मिळायची, ही औषधे आम्ही या झोपडपट्टीत मोफत द्यायचो. समाजातील तळागाळातील लोकांचे प्रश्नही यामुळे अधिक तीव्रतेने कळत गेले. या समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही तळमळ स्वस्थ बसू देत नव्हती. समाज स्वास्थ्य हा विषय त्यामुळे डोक्यात घोळत राहू लागला. त्यामुळे या विषयात पीएचडी करायचा निर्णय घेतला. यासाठी अनेक पुस्तके वाचली त्याहीपेक्षा समाजाचा चेहरा जास्त वाचला. हा प्रबंध लिहीत असताना मला समाजाच्या अनेक पैलूंचा अभ्यास करता आला. त्याविषयी काहीतरी केले पाहिजे हे सतत वाटू लागले. त्यादरम्यानच दिल्ली, उत्तरप्रदेश आणि मिझोरामसारख्या राज्यात काम केले. तेथील सामाजिक स्थिती जवळून अनुभवली.

### मर्यादा कळल्या

वैद्यकीय शिक्षणातून समाजसेवा करताना मर्यादा येतात. समाजाचे प्रश्न अनेक आहेत आणि त्याच्या सोडवणुकीसाठी शासनाने अनेक उपाययोजना राबवल्या आहेत. पण त्या तळागाळात पोहोचलेल्या नाहीत. या योजना तळागाळात पोहोचवायच्या असतील तर प्रशासन मजबूत आणि कठोर निर्णय घेणारे असले पाहिजे. त्यामुळे प्रशासनाची जबाबदारी जास्त आहे हे ओळखून आपणच जर प्रशासनात गेलो तर काहीतरी चांगले करण्याचा नक्की प्रयत्न करू, असा विश्वास वाटू लागला. त्यामुळे यूपीएससी परीक्षा देऊन प्रशासनात येण्याचे नक्की केले.

### सुयोग्य नियोजन

यूपीएससी परीक्षा देण्याचे निश्चित तर केले, पण नोकरीमधून वेळ काढणे कठीण होते. अवघे सहा तास हाती मिळत होते. यूपीएससीचा मोठा परीघ आणि हातात दिवसाकाठी सहा तास त्यामुळे नियोजन केले. अगोदर संपूर्ण अभ्यासक्रम वाचून घेतला. कोणती पुस्तके वाचणे आवश्यक याची यादी तयार करून घेतली आणि त्यानुसार अभ्यास सुरू केला. हातात वेळ कमी असला तरी त्याचे योग्य नियोजन केले तर तो वेळ पुरेसा ठरतो हे जाणवले. स्वयंअध्ययन ही अशी गोष्ट आहे की जी अनेक कोचिंग क्लासपेक्षा सरस ठरते. यात तुमचे ध्येय काय, तुमच्या उजव्या बाजु कोणत्या, कमकुवत बाबी कोणत्या आहेत हे ठळकपणे कळते. त्यावर थोडे कष्ट घेतले की यश सहज मिळून जाते.

### स्वयंअध्ययनाचा फायदा

स्वयंअध्ययनाचा आणखी एक फायदा असा असतो की, त्यात तुम्हाला तुमची टार्गेट ठरवता येतात. तुमचे मूल्यमापन तुम्हीच करत असल्याने ते आणखी कठोरपणे केले जाते. आपण स्वत:ला फसवू शकत नाही त्यामुळे आपला अभ्यास किती झाला आहे, कोणत्या विषयाचा अभ्यास राहिला आहे, हे स्पष्ट होत राहते, अर्थात कोचिंग क्लासचा उपयोग होतच नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल. मार्गदर्शन मिळणे हे कधीही चांगलेच. व्यावसायिक मार्गदर्शकांकडून चांगले मार्गदर्शन मिळते. मात्र त्यांच्यावरच अवलंबून राहणे हे कधीही धोक्याचेच.

आज मी उस्मानाबादचा जिल्हाधिकारी म्हणून काम करत असताना ही बाब ठळकपणे जाणवते की शासनाच्या अनेक योजना

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 47



तळागाळापर्यंत पोहोचवण्याची संधी आपल्याला मिळते आहे. अनेक निर्णय घेताना समाजातील दुर्लक्षित आणि गरीब घटकांचा विचार पहिल्यांदा येतो. त्यांच्यासाठी काहीतरी करता येते ही संधी मला कॉर्पोरेट क्षेत्रात मिळाली नसती. या समाजातील गरिबांच्या चेहऱ्यावरील हास्य जे समाधान देते ते पैशात मोजता येणार नाही.

### निराश होऊ नका

याबरोबरच या परीक्षेच्या तयारीला खूप वेळ दिला पाहिजे हे खरेच पण हे एकमेव खरे नाही. तुमचे ध्येय निश्चित असेल आणि योग्य दिशेने अभ्यास करत असाल तर यश नक्की मिळते. तुम्ही रोज सहा-सात तास. असा पूर्ण झोकून दीड वर्षे अभ्यास केलात तर यश मिळते. त्याचबरोबर पहिल्या प्रयत्नात यश नाही मिळाले तर नाराज आणि निराश होण्याचे कारण नाही. कारण दुसरा, तिसरा आणि चौथाही प्रयत्न करायला हरकत नाही. यामध्ये यश नक्की मिळते. समजा तुम्हाला चौथ्या प्रयत्नातही यश नाही मिळाले तर इतक्या वर्षांचा अभ्यास तुम्हाला दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात यश मिळवून द्यायला उपयोगी पडतोच पडतो. याबरोबरच तुमची पार्श्वभूमी काय आहे यालाही फारसे महत्त्व राहत नाही. ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थी असोत अथवा शहरी भागातील असोत प्रयत्न आणि त्यात सातत्य हवे.

### अधिकृत पुस्तके वाचा

स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी बाजारात अनेक प्रकाशनांची असंख्य पुस्तके उपलब्ध आहेत. एकाच विषयाची दहा-बारा पुस्तके बाजारात उपलब्ध असतात. अनेक वेळा त्यात विरोधाभासही असतो. काही वेळा अगदीच दुय्यम माहिती या पुस्तकात असते. त्यामुळे आपला गोंधळ होतो. उलट परीक्षेत गुणही मिळत नाही. ही पुस्तके वाचणे त्यातील आशय समजून घेऊन टिपणे काढणे याला वेळही खूप लागतो. शिवाय रिव्हिजन करताना मग ही सर्व पुस्तके वाचणे शक्य होत नाही. त्यामुळे अधिकृत यादीतील पुस्तकेच वाचायला हवीत त्यातून स्वत:च्या मायक्रोनोट्स काढल्या गेल्या पाहिजेत. परीक्षा जवळ आल्यानंतर नेमके कोणते वाचावे, किती वाचावे याचा गोंधळ उडतो. अशावेळी आपण काढलेले टिपण वाचले तर कमी वेळेत रिव्हिजन होऊन जाते. यामुळे वेळ आणि गोंधळ वाचतो. शिवाय अभ्यासाचा ताण येत नाही. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा सर्वप्रथम आपण अभ्यास करायला हवा. ही परीक्षा नेमकेपणाची आहे. ज्याप्रमाणे नेमकी उत्तरे अपेक्षित असतात अगदी त्याचप्रमाणे वाचनही नेमकेपणानेच व्हायला हवे. एखादे पुस्तक पहिल्यापासून शेवटच्या पृष्ठापर्यंत वाचत बसण्यापेक्षा आपल्याला आवश्यक असलेला भाग कळला पाहिजे. तेवढाच आपण वाचला तर वेळेची बचत होते. अभ्यासक्रमाबाहेरचे अनावश्यक वाचन टाळून युपीएससीच्या अभ्यासक्रमावरच अधिक भर द्यावा. विविध पुस्तके वाचून आपण नोट्स काढलेल्या असतील तर परीक्षा जवळ आली असताना कमी वेळेत उजळणी होईल आणि परीक्षेचा ताण येणार नाही. मी याच पद्धतीने अभ्यास करून यश मिळवले.

**शब्दांकन – प्रवीण कुलकर्णी**

❐ ❐

**उच्चशिक्षित आणि ज्यांना समाजाबद्दल थोडी आस्था आहे अशा तरुणांनी प्रशासकीय सेवेत यायला हवे. या सेवेत कॉर्पोरेटपेक्षा कमी पगार मिळत असला तरी समाजाच्या प्रश्नांना सरळ भिडता येते. समाजास काहीतरी देता येते. समाजाच्या वेदना कमी करता आल्या नाहीत तरी त्यावर फुंकर मात्र मारता येते. त्याचबरोबर या नोकरीत समाधान आणि प्रतिष्ठा आहे. कॉर्पोरेटमध्ये तुम्हाला पगार चांगला मिळेल पण समाधान मिळेलच असे नाही. त्याचबरोबर समाजात प्रतिष्ठा आणि सन्मान प्रशासकीय सेवेइतका क्वचितच मिळेल. त्यामुळे प्रशासकीय सेवेकडे करिअर म्हणून बघावे.**

**– डॉ. प्रशांत नारनवरे**

### यशाची सूत्रे

- कोचिंग क्लास लावण्याची आवश्यकता असतेच असे नाही. स्वयंअध्ययन हीच यशाची गुरूकिल्ली आहे.
- अभ्यासक्रम व्यवस्थित समजावून घ्यायला हवा.
- अभ्यासक्रमावरच लक्ष केंद्रित करायला हवे.
- रोज किमान सहा ते सात तास अभ्यास करायला हवा.
- वेळेचे, अभ्यासाचे नियोजन हवे. त्यासाठी एक एक टप्पा पार करणे आवश्यक आहे.
- अधिकृत पुस्तकेच वाचली पाहिजेत.
- विविध पुस्तके वाचून स्वत:च्या नोट्स काढण्याची सवय ठेवा परिक्षेच्या काळात या नोट्समुळे कमी वेळेत उजळणी होईल आणि परीक्षेचा ताण येणार नाही.
- या नोट्सवर आधारित स्वत:च्या मायक्रोनोट्स काढणे उपयुक्त ठरू शकते. परीक्षेच्या दिवसात अशा मायक्रोनोट्समुळे नेमके कोणते वाचावे, किती वाचावे याचा गोंधळ उडणार नाही.
- ही परीक्षा नेमकेपणाची आहे. त्यामुळे पेपरमध्ये नेमकीच उत्तरे लिहा.
- अभ्यासक्रमाबाहेरचे अनावश्यक वाचन टाळून नागरी सेवा परीक्षेच्या सामान्य अध्ययन व तुम्ही निवडलेल्या ऐच्छिक विषयाच्या अधिकृत अभ्यासक्रमावरच जास्तीत जास्त भर द्यावा.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:45 PM Page 48

# सांभाळा आपल्या हृदयाला



सर जे. जे. रुग्णालयामध्ये हजारो रुग्णांना जीवनदान देणारे डॉ. के. एन. भोसले हे वर्षभरात किमान ६०० हृदय शस्त्रक्रिया करतात. गेल्या ३० वर्षांपासून रुग्णसेवा करणारे हृदयरोग तज्ज्ञ म्हणून डॉ. भोसले ओळखले जातात. जे. जे. रुग्णालयात हृदय आणि ऊरशल्यचिकित्सा विभागाचे ते प्रमुख आहेत. हृदयविकार किंवा हार्टअटॅक हा शब्द उच्चारल्यानंतर हृदयाचा ठोका चुकतो. डॉ. भोसले यांनी हृदयविकार होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना या लेखात सुचविल्या आहेत.

मानवी शरीररचनेतील ऊर्जा निर्मितीचा स्त्रोत म्हणजे हृदय होय. शरीराच्या चैतन्याची अनुभूती म्हणजे हृदयाचे धडधडणे होय. हृदय हे शरीररचनेच्या आणि उपचाराच्या केंद्रस्थानी असते. वैद्यकशास्त्रामध्ये याबाबत मोठ्या प्रमाणात संशोधन कायम सुरू असते. कधीकाळी हृदयाचा आजार म्हटला की चिंता वाटायची. वैद्यकशास्त्रातील प्रगतीने हृदयरोगावर बऱ्याच अंशी मात केली आहे. हल्ली हृदयरोग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक मोहीम आणि चिकित्सा सुरू झाली आहे.

### हृदयाची रचना व मुख्य कार्य

हृदयाचे प्रमुख कार्य शरीरामध्ये रक्ताभिसरण करणे होय. एखाद्या पंपिंग स्टेशनप्रमाणे हे इंद्रिय काम करते. हृदयाकडे आलेले रक्त आत घेते व बाहेर टाकते. हृदयाला चार कप्पे वर दोन कर्णिका व खाली दोन जीवनिका असतात. उजव्या बाजूला अशुद्ध रक्त असते व डाव्या बाजूला शुद्ध रक्त असते. हृदय सतत आकुंचन व प्रसरण पावते. त्याचा वेग मिनिटाला ६० ते १०० ठोके असतो. उजव्या बाजूला शरीराकडून आलेले रक्त फुफ्फुसाकडे पाठवले जाते. फुफ्फुसामध्ये रक्तातील कार्बन डायऑक्साईड बाहेर फेकला जाऊन प्राणवायू शोषला जातो. हे रक्त हृदयाच्या डाव्या कर्णिकेत आणले जाते. तेथून ते डाव्या जीवनिकेतून शरीरभर पोहचवले जाते.

### हृदयविकाराचे प्रकार

हृदयविकाराचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत


अ) जन्मजात हृदयविकार

ब) झडपांचा हृदयविकार


क) हृदय रक्तवाहिन्यांचा विकार

**अ) जन्मजात हृदयविकार :-** जन्मजात हृदयविकार केवळ २ टक्के प्रमाणात आढळतो. हल्ली गर्भाशयाच्या सहाव्या महिन्यात सोनोग्राफीमध्ये याबाबतचे निदान आणि उपचार आता शक्य झाले आहेत. साधारणत: हृदयाला छिद्र असण्याचे प्रकार आपल्याकडे आढळतात. जीवनिकेच्या पडद्याला असणारे छिद्र, कर्णिकेच्या पडद्याला असणारे छिद्र, हृदयाच्या झडपा आकुंचित असणे असे या आजाराचे स्वरूप असते. या आजाराने ग्रस्त झालेली मुले पिंक बेबी गटात येतात. यावर विनाशस्त्रक्रिया इलाज करणे शक्य आहे.

दुसरा प्रकार म्हणजे ब्ल्यू बेबी. हा गुंतागुंतीचा हृदयविकार असून यामध्ये शुद्ध व अशुध्द रक्त याचे मिश्रण होऊन किंवा फुफ्फुसाचा रक्तप्रवाह कमी प्रमाणात होत असल्याने रक्ताभिसरणातील प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन शरीराला रक्त पुरवठा केला जातो. त्यामुळे या विकाराने ग्रस्त रुग्णांची काया निळसर होते. तथापि जन्मजात हृदयविकारावरील उपचारासाठी हृदय शस्त्रक्रियेने उजवा व डावा कप्पा वेगळे करणे, फुफ्फुसाचा रक्त पुरवठा वाढविणे हे आजच्या प्रगत तंत्रज्ञानाने शक्य आहे.





**ब) झडपांचा (व्हॉल्व) हृदयविकार :** हृदयाला चार झडपा असतात. दोन उजवीकडे आणि दोन डावीकडे. वर्तमानपत्रांच्या कागदासारखी पातळ पडद्याची त्यांची रचना असते. यामध्ये उद्भवणाऱ्या आजाराला झडपांचा (व्हॉल्व) हृदयविकार म्हटले जाते. भारतामध्ये मोठ्या संख्येतील समाज हा मुलभूत सुविधांअभावी गलिच्छ वस्तींमध्ये आपले जीवन कंठतो. दाटीवाटीच्या लोकसंख्येत राहणे आणि योग्य आहार न मिळणे यामुळे हृदयाचे स्नायू बळकट होत नाही आणि पर्यायाने झडपादेखील पूर्णशक्तीने काम करीत नाहीत. अशा स्थितीत रुग्णांना या पद्धतीचा आजार होण्याची शक्यता अधिक असते.भारतात हा आजार अधिक आढळतो. बलून उपचाराद्वारे झडपांमधील अरुंदपणा कमी करण्याचे काम केले जाते.



### हृदयविकाराची लक्षणे

- बऱ्याच वेळा छातीत दुखणे, धडधडणे
- पाठीच्या दोन फेऱ्यांमध्ये दुखणे (दोन्ही बाजूला)
- डाव्या हाताला दुखणे
- पोटाच्या वरच्या भागाला दुखून उलट्या होणे
- प्रचंड अस्वस्थता वाटणे
- रक्तदाब वाढणे
- धाप लागणे
- रक्ताच्या गुठळीमुळे झटका येणे



## अशी घ्या काळजी



- नियमित रक्तदाब, मधुमेह आणि रक्तातील कोलेस्ट्रोरॉलचे प्रमाण (चरबी घटकांची तपासणी) याची नियमित तपासणी
- ईसीजी काढून त्यातील बदलानुसार पुढील तपासण्या कराव्यात.
- हृदयाची आकुंचन/प्रसरणाची बाजू तपासणारी इको (ECHO Test) चाचणी
- वैद्यकीय सल्ल्यानुसार एंजिओग्राफी (ही १०० टक्के निदान करणारी सुरक्षित आणि महत्त्वाची चाचणी)
- हृदयाच्या स्नायूंचे रक्ताभिसरण (परफ्युजन स्कॅन) यामुळे हृदयाला कोणत्या भागात रक्तपुरवठा होतो हे माहिती पडते. ही तपासणी गरजेनुसार करावी.
- आयव्हस (अल्ट्रासाऊंड) चाचणी- हृदयाच्या रक्तवाहिनीच्या आतमध्ये असलेल्या अडथळ्याचे निदान के ले जाते.
- फ्रॅक्शनल फ्लो रिझर्व्ह - हृदयाच्या रक्त वाहिनीतील प्रवाहाची नोंद करणारी चाचणी
- ७० टक्क्यांपेक्षा अधिक अडथळे (ब्लॉकेज) असतील तरच ॲन्जिओप्लास्टी किंवा बायपास सर्जरी सुचविल्या जातात.
- रक्ताचा प्रवाह ५० टक्के किंवा अधिक सुरू असला तर त्यावर औषधोपचार सुचविला जातो.

**याशिवाय**

- नियमित संतुलित आहार
- क्षार व चरबीयुक्त पदार्थांचे सेवन टाळणे, नियमित व्यायाम
- तणावविरहीत जीवनशैली



## हृदयविकाराची कारणे


- स्थूलपणा
- अतिधूम्रपान
- मधुमेह
- उच्च रक्तदाब
- रक्तातील चरबीचे (कोलेस्ट्रॉल) वाढलेले प्रमाण
- व्यायामाचा अभाव
- अधिक बैठे काम
- मानसिक आणि शारीरिक ताण

बऱ्याचदा झडपा खराब होऊन दुरुस्तीपलीकडे गेल्या असल्यास शस्त्रक्रियेने झडप बदलून कृत्रिम झडप लावणे हेही कमी धोक्याच्या पद्धतीने करता येते.

**क) हृदय रक्तवाहिन्यांचा हृदयविकार :** हृदय चालण्यासाठी नियमित, समप्रमाणात आणि सातत्यपूर्ण रक्तपुरवठ्याची आवश्यकता असते. त्यामुळे रक्तवाहिन्या या निकोप असणे गरजेचे आहे. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी आर्टरी यांच्या मध्ये येणाऱ्या अडथळ्याने हा पुरवठा कमी होऊ शकतो. रक्तवाहिनी आकुंचन पावते किंवा अरुंद होते. त्यामुळे हृदयाच्या स्नायूवर परिणाम होतो. तसेच रक्ताभिसरणाच्या नियमित प्रक्रियेमध्ये अडथळा येऊन त्याचा शरीरावर परिणाम होतो. अस्वस्थता वाढते व पुढे हृदयविकाराचा झटका येतो.

### एन्जिओप्लास्टी म्हणजे काय?

प्रत्यक्ष शस्त्रक्रिया न करता शरीरातील रक्तवाहिन्यातील अडथळे दूर करण्याची प्रक्रिया



## परिणाम

- हृदय रक्तवाहिनीमध्ये रक्ताच्या गुठळ्या आणि आकुंचन स्थिती व आंतरस्थराच्या जाडेपणामुळे रक्तपुरवठा प्रभावित होतो.
- त्यामुळे हृदयाच्या मागणीप्रमाणे पुरवठा करण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो व हृदयाचे स्नायू प्राणवायुच्या कमी पुरवठ्यामुळे अकार्यक्षम होतात.



# निरामय

म्हणजे एन्जिओप्लास्टी होय. रक्तवाहिन्यांच्या भागामध्ये आलेले अडथळे शरीरामध्ये छोटी नळी टाकून त्या ठिकाणचा अरुंद झालेला भाग बलूनने मोठा केला जातो. यामध्ये धातूचा स्टेंट वापरला जातो. रक्ताची गुठळी होऊ नये किंवा शरीराला अपाय होणार नाही, अशा औषधीयुक्त रसायनांनी हा स्टेंट तयार केला जातो. औषधीयुक्त स्टेंट अधिक प्रमाणात वापरले जातात.

महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजनेद्वारे रुग्णांना हृदयविकाराच्या शस्त्रक्रियेसाठी अर्थसाहाय्य केले जाते. या योजनेमुळे सामान्य कुटुंबातील गरजू रुग्णांना हृदय शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. गेल्या काही वर्षापासून हृदय रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. हे लक्षात घेऊन सर्वसामान्यांना परवडेल, असा इलाज या योजनेत केला जातो. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले आहे.

### बायपास सर्जरी म्हणजे काय?

एन्जिओप्लास्टी केल्यानंतर पुन्हा ब्लॉकेज उद्‌भवणे किंवा जेव्हा दोन वा अधिक रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस असतात तेव्हा अथवा एन्जिओप्लास्टी यशस्वी होत नाही, अशा वेळेस बायपास सर्जरीचा निर्णय घेतला जातो. ऑनपंप आणि ऑफपंप अशा दोन प्रकारे ही शस्त्रक्रिया केली जाते. या शस्त्रक्रियेमध्ये जोडण्यात येणाऱ्या रक्तनलिका रोहिणी प्रकारातील असल्यास अधिक फायदेशीर ठरते. एन्जिओप्लास्टी किंवा बायपास शस्त्रक्रिया केल्यानंतर रुग्णाला अधिक कार्यक्षमतेने जगणे शक्य होते. या दोन्हीही उपचाराने आयुष्यच वाढते असे नसून अधिक सक्षमतेने जीवन जगणे शक्य होते.

**शब्दांकन - प्रवीण टाके**

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 50

# मोगलीचे अद्भुत विश्व

धुक्यात बुडालेली डिसेंबरमधली पहाट. पांढरा झुळझुळीत पडदा अलगद सोडलेला असावा तसे दाट धुके सगळीकडे पसरले होते. या धुक्यातून गाडी काढत आम्ही पेंचकडे निघालो. सकाळी साडेसातच्या सुमारास गाडी कन्हानला पोहचली. कन्हान फाट्यावरून डावीकडे एक रस्ता आत जातो. हाच रस्ता सिल्लरी गेटकडे जाण्याचा. या रस्त्यावर वळलो तसे जंगल सुरू झाल्याच्या खाणाखुणा दिसू लागल्या.

### अमलतास

साधारण ५ किमीचा हा रस्ता पार केला की 'अमलतास' अशी पाटी दिसते. याच ठिकाणी पेंच व्याघ्रप्रकल्पाच्या जंगल सफारी आणि निवासस्थानाचे बुकिंग होते. इथून एक गाईड आपल्यासोबत येतो. जंगलसफारी प्रवेश सकाळी ८ वाजता बंद होत असल्याने आम्ही थोडी घाई केली आणि २०-२२ वर्षाचा एक मुलगा नागेश आम्हाला या जंगलसफारीसाठी गाईड म्हणून मिळाला. नागेशसोबत आमच्या अद्भुत दुनियेचा प्रवास सुरू झाला.

### मानसिंगदेव अभयारण्य

पेंच राष्ट्रीय उद्यान अर्थात मानसिंगदेव अभयारण्य हा भारतातला २५ वा व्याघ्र प्रकल्प आहे. एकूण ६६४.३२ किमी परिसरात पसरलेले घनदाट जंगल ! यापैकी २११.६ किमीचे कोअर तर ४०७ किमी बफर झोन अशी या जंगलाची विभागणी करण्यात आली आहे.

यापैकी पर्यटकांना प्रत्यक्ष साधारण ६० किमीच्या परिसरात प्रवेश आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या दक्षिणेकडे वसलेले पेंच दऱ्या, डोंगर, नदी, घनदाट वृक्षराजी आणि वन्यप्राणी यांनी समृद्ध आहे.

पुरातनकाळापासून पेंचने आपले वेगळेपण जपले आहे. कालिदासाच्या शाकुंतल आणि मेघदुतामध्ये या जंगलाचे वर्णन आढळते. एव्हढेच नाही तर बादशहा अकबराने लिहिलेल्या 'आईने-अकबरी' या ग्रंथात या जंगलाचे वर्णन अकबराने केले आहे. रुडयार्ड किपलिंग यांना 'जंगलबुक' सुचले ते हे पेंचचे जंगल बघून.

**कीर्ती पांडे**

अशा सगळ्या गोष्टी पेंचबद्दल ऐकलेल्या होत्या म्हणूनच मोगलीच्या या घराला भेट देण्याची उत्सुकता होती. नागेशच्या सूचनेप्रमाणे आमची गाडी आता जंगलाच्या दिशेने निघाली होती. वातावरणात धुके खूप होते आणि डिसेंबर महिना त्यामुळे एकूणच वातावरण काहीसे गारठलेले मधूनच कुठेतरी पानांच्या जाळीतून





सूर्यकिरण झिरपत होते. सगळीकडे एक शांतता होती. 'पिन ड्रॉप सायलन्स' म्हणतो त्यापेक्षाही थोडी जास्तच पण या शांततेलाही चैतन्याची आणि सृजनाची झालर होती. नुकतीच पूजा आटोपलेले देवघर कसे नीटनेटके आवरलेले दिसते तसेच काहीसे जंगल होते. अगदी शिस्तबद्ध!

तिथून ५० मीटर पुढे जात नाही तोच झुडुपांमध्ये कसली तरी हालचाल जाणवली. ती सांबराची एक जोडी होती. शांतपणे गवत खात होती. गाडीच्या आवाजानेही त्यांची एकाग्रता भंग झाली नाही. तिथून नागमोडी वळणांवर सफाईदार फिरत आमची गाडी जंगलात आत शिरत होती. वातावरणात एक सुंदर गंध होता. जंगलाचा, झाडांचा, रानफुलांचा ! हवा अगदी स्वच्छ !

झाडांवरून खाली आणि पुन्हा झाडांवर असा खेळ करता असलेले माकडांचे टोळके आम्हाला एका ठिकाणी दिसले आणि माकडचेष्टा या शब्दाचा शब्दश: अर्थ लागला.

### गराडीचे वन

गाडी आता घनदाट जंगलात आली होती. साग, सालाची झाडे आता बरीच मागे पडली होती. या भागात होती ती काळ्या कुळकुळीत खोडांची सरळ उंचच उंच वाढलेली झाडे याला गराडीचे वन म्हणतात, नागेशने माहिती पुरवली. देवळातल्या काळ्या शिसवी खांबांनी छताला आधार द्यावा अशी ही गराडीची झाडे सर्वदूर पसरली होती. आतापर्यंतच्या प्रवासात आम्हाला अनेक ठिकाणी हरीण बऱ्याच ठिकाणी

### मोगलीचे जंगल

'जंगल जंगल पता चला है चड्डी पहन के फुल खिला है' आठवते ना! कधीकाळी या टायटल साँगने आणि जंगलबुकने लहानमोठ्या साऱ्यांनाच वेड लावले होते. जंगलबुकमधला मोगली, शेरा, बघिरा, बालू ह्यांची तर छोट्यांशी पक्की दोस्ती झाली होती. सगळ्याच प्रकारची झाडं, घनदाट जंगल आणि प्राणी, पक्षी यांची वर्दळ हे जंगलबुकमधल्या जंगलांचे वैशिष्ट्य. या जंगलबुकची कल्पना रुडयार्ड किपलिंग यांना सुचली ती पेंचच्या जंगलावरून. घनदाट झाडांनी, बांबूवनांनी वेढलेल्या या जंगलातच त्यांना मोगली भेटला.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 51

## असे जाता येईल

- जवळचे विमानतळ नागपूर ७० किमी
- जवळचे रेल्वे स्टेशन – नागपूर
- जवळचे बस स्टँड – रामटेक ३५ किमी येथून रोज पेंचला जायला बसेस सुटतात.

## येथे राहता येईल

- वन विभागाचे सिल्लारी येथे रेस्ट हाऊस आहे. उप वनरक्षक यांच्याशी संपर्क करून ते आरक्षित करता येते. दू.क्र.०७१२-२५२४६२४
- महाराष्ट्र पर्यटन विकास प्राधिकरणातर्फे निवासासाठी सिल्लारी येथे खोल्या उपलब्ध आहेत. एम.टी.डी.सी. रिजनल ऑफिस दू.क्र. ०७१२-२५३२७३३
- जलसंपदा विभागाचे रेस्ट हाऊस संपर्क – अजनी नागपूर – दू.क्र.०७१२-२५३२७३३

## भेटीचा उत्तम काळ

- पेंच राष्ट्रीय उद्यान १ ऑक्टोबर ते ३० जून या कालावधीत पर्यटकांसाठी खुले असते.
- जुलै ते सप्टेंबर या काळात येथे प्रवेश बंद असतो.
- या जंगल सफारीसाठी सकाळी ६ ते ११ आणि दुपारी ३.०० ते सायं.६.०० या वेळात पर्यटकांना प्रवेश मिळतो.
- १५ आसनी वाहनांना तसेच छोट्या वाहनांना जंगलात प्रवेश दिला जातो.

## पेंचचे वैशिष्ट्य

या जंगलामध्ये गरूड, किंगफीशर, निलकंठ, बगळे यासारखे १६४ प्रकारचे पक्षी, ३३ प्रकारचे स्तनदायी प्राणी, १५ प्रकारची फुलपाखरे, ५४ प्रकारचे कीटक, ३० प्रकारचे घोणस, नाग, यासारखे सरपटणारे प्राणी आहेत.

दिसले होते. एक दोन हरणांचे कळप रस्त्याच्या कडेला आम्ही बघितले. आम्हाला खरे तर उत्सुकता होती ती वाघाच्या दर्शनाची ! वातावरणातील गारवा त्याची तहान भागवायला पुरेसा असल्याने आज तो पाणथळीच्या जागांना भेट देण्याची शक्यता नाही असे नागेशने सांगितले. गराडीच्या या जंगलात एका नीलगायीने आमचा रस्ता अडवला. साप्तेंनी शहराच्या सवयीने हॉर्न वाजवला तसा आपला अजस्त्र देह सांभाळत ती रस्त्यातून बाजूला झाली.

### जंगलाची बदलणारी रूपे

जंगलाची बदलणारी रूपे आम्ही नि:शब्दपणे बघत होतो. गराडीच्या झाडांची जागा आता बांबूंची घेतली होती. या रस्त्यावर बांबुच्या झाडांनी हिरव्या कमानी उभ्या केल्या होत्या. दूरपर्यंत इतस्तत: पसरले बांबू. त्यातच शांततेला चिरणारा बार्किंग डिअरचा आवाज आणि रानकोंबड्यांचा इशारे देणारा आवाज यामुळे एखाद्या भयपटाला आवश्यक अशी सगळी पार्श्वभूमी त्या बांबूच्या वनात तयार झाली होती. या वेळू वनात आम्हाला दोन-तीन ठिकाणी मोर दिसले. वाघाचे मात्र दर्शन काही होत नव्हते.

### चमचमते पाणी

आता नागेश आम्हाला एका तलावाच्या ठिकाणी घेऊन आला. सूर्यप्रकाशाशी खेळ करणारे चमचमते पाणी यांनी एक अप्रतिम दृश्य या तलावाच्या काठी तयार झाले होते.

हा तलाव तोतलाडोह या प्रकल्पाच्या बॅकवॉटरमुळे तयार झाला आहे. ५४ किमीच्या परिसरात पसरलेला हा तलाव असंख्य देशी विदेशी पक्ष्यांचा आवडता निवारा आहे. याच परिसरात आम्हाला गरुडांचे दर्शन झाले.

पक्षी तर विविध प्रकारचे बघायला मिळाले. एका ठिकाणी गवतात कोतवाल पक्ष्यांचे संमेलन भरले होते. तलावामध्ये एका काळ्या मानेच्या बगळ्याने समाधी लावली होती. बदकी पिल्लांसह पाण्यामध्ये सपसप पोहून जात होती. इथे गवतफुले आणि रानफुले खूप त्यामुळे फुलपाखरेही खूप बघायला मिळाली.

या जंगलात २७ वाघ आहेत असे म्हणतात. याशिवाय बिबटेही आहेत पण आम्हाला मात्र एकाचेही दर्शन झाले नव्हते. धुक्यामुळे ते बाहेर आले नाहीत असे नागेशच म्हणणे. जंगलाची ही सैर मात्र अद्भुत होती. आज सकाळपासून वातावरणात अचानक बदल झाला होता. हा बदल प्रमाण मानत वाघोबा दर्शनाला बाहेरच आले नव्हते. सकाळी उजाडल्यापासून एक नवा कोरा दिवस निसर्ग आपल्याला देतो. थोडासा आशावादी, काहीसा अनिश्चिततेने भरलेला. या अनिश्चिततेवर जगण्याचे नवेपण टिकून राहते असे मला वाटते. त्यामुळेच वाघोबाने दर्शन दिले नाही म्हणून वाईट वाटले पण पुढच्या पेंच भेटीची उत्सुकताही लागली आहे.

❒ ❒

### घोस्ट ट्री अर्थात भुताचे झाड



पेंचचे जंगल वृक्षराजींनी अतिशय संपन्न आहे. साग, साल, खैर, ऐन, गुंज, बेहडा, जांभुळ, बोरू, शेरणी, चारे, अर्जुन, कुसूम, हळदू, तेंदू, अमलतास बेल, धावडा अशी कितीतरी झाडे या जंगलात आहेत. याच जंगलात सागाच्या पळसाच्या काळ्यासावळ्या असंख्य खोडांतून डोकावते ते अगदी पॉलिश केल्यासारखे फ्लोरोसंट रंगाचे झाड. हे झाड रात्री अंधारात चमकते म्हणून त्याला भुताचे झाड किंवा घोस्ट ट्री म्हणतात. याचे दुसरे नाव म्हणजे जंगल परी. स्वच्छ तुकतुकीत खोडाचे हे झाड बघितले की एखादी परी न्हाऊनमाखून सकाळच्या उन्हात केस सुकवते आहे असे वाटते. हे झाड वर्षातून तिनदा लाल, हिरवा आणि पिवळसर पांढरा असे रंग बदलते. इतरांपेक्षा थोडे हटके म्हणूनच ते घोस्ट ट्री!

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 52

# देशपातळीवर हवे 'थिंक टँक'

**नियोजन आयोग बरखास्त करून नवी व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने पंतप्रधानांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची मते जाणून घेण्यासाठी नुकतीच नवी दिल्ली येथे विशेष बैठक आयोजित केली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आर्थिक विकास आणि सुधारणा मंडळ अशी संस्था निर्माण करावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना केली. केंद्रपुरस्कृत योजना बंद करून राज्यांना थेट निधी दिला पाहिजे, राज्यांना विकासाची मानके ठरवून विकासाची संधी दिली पाहिजे, देशपातळीवर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली थिंक टँक निर्माण करावा अशाही सूचना केल्या.**




७ डिसेंबर २०१४ रोजी पंतप्रधानांचे निवासस्थान असलेले ७ रेसकोर्स गजबजून गेले होते. निमित्त होते देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीचे. या बैठकीचे अध्यक्ष होते, खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी. बैठकीचा विषय होता नियोजन आयोग बरखास्त करून नवी नियोजन व्यवस्था निर्माण करण्याचा. यासाठी पंतप्रधानांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची मते जाणून घेण्यासाठी त्यांना निमंत्रित केले होते.

१३ ऑगस्ट २०१४ रोजी कॅबीनेट बैठकीत नियोजन आयोगाच्या स्थापनेचा दि.१५ मार्च १९५० रोजीचा शासन निर्णय रद्दबातल ठरविण्यात आला. नियोजन आयोगाऐवजी नवीन संस्था निर्माण करण्याचे अधिकार पंतप्रधानांना देण्यात आले होते, तेव्हा पासूनच नव्या नियोजन व्यवस्थेसंदर्भात देशभरात चर्चा घडून येत होती. १५ ऑगस्ट २०१४ स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात नियोजन आयोगाऐवजी नवीन व्यवस्था निर्माण करण्याचे सूचित केले होते. पंतप्रधान आपल्या भाषणात म्हणाले होते, नियोजन आयोगाची स्थापना त्यावेळेच्या देशाच्या परिस्थितीनुरूप करण्यात आली होती. देशाच्या विकासात नियोजन आयोगाने मोलाची भर घातली. परंतु, आज देशांतर्गत स्थिती बदलली आहे. जागतिक व्यवस्थाही बदलली आहे. देशाच्या संघराज्याच्या संकल्पनेचे महत्त्व वाढले आहे. या संघराज्याला अधिक मजबूत करण्याची

### मुख्यमंत्र्यांच्या ठोस सूचना

- पंचवार्षिक योजनेऐवजी दीर्घकालीन नियोजन हवे.
- आर्थिक आणि कायदेशीर बाबींवर केंद्र व राज्य शासन यांच्यामध्ये चर्चा होऊन कायदे तयार करावे.
- केंद्रपुरस्कृत योजना बंद करून राज्यांना थेट निधी दिला जावा.
- विकासाची मानके ठरवून राज्यांना विकासाची संधी द्यावी.
- केंद्र शासनाचा निधी वर्षाच्या शेवटी वितरित न करता तो नियमित वितरित केला जावा.
- राष्ट्रीय रोजगार हमी योजना, अन्न सुरक्षा योजना राबवण्याकरिता राज्यांना थेट निधी द्यावा. या योजना राबवण्यासाठी राज्यांना त्यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य द्यावे.
- नव्या व्यवस्थेत राज्य व केंद्र यांच्यातील समन्वय तसेच विकास प्रक्रियेत बरोबरीची भागीदारी याला महत्त्व द्यावे.
- स्मार्ट सीटी, मेक इन इंडिया यासारख्या योजनांसाठी नवीन कायदे व नवीन वित्तीय संसाधने तयार केली पाहिजेत.

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 53

गरज निर्माण झाली आहे. यासाठी नियोजन आयोगाऐवजी नव्या नियोजन व्यवस्थेची निर्मिती आम्हाला करावयाची आहे. पंतप्रधानांनी नियोजन आयोगाऐवजी राज्य आणि केंद्र सरकार यांची भागीदारी असणारी संस्था निर्माण करण्याचे सूतोवाच केले आहे, ही व्यवस्था निर्माण करताना देशातील ४ हजारांहून अधिक तज्ज्ञांची मते जाणून घेण्यात आली आहेत. देशाच्या विकास प्रक्रियेशी निगडित असेलेली संस्था निर्माण करताना प्रथमच लोकसहभागाचा अवलंब करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्र्यांची परिषद

नियोजन आयोगाऐवजी नवी व्यवस्था निर्माण करण्याचा मूळ उद्देश राज्य व केंद्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र व राज्यांची भागीदारी असलेली राष्ट्रीय आर्थिक व सुधारणा मंडळ अशी संस्था निर्माण करावी अशी सूचना केली. देशाच्या अर्थव्यवस्थेने नवे वळण घेतले आहे, त्यामुळे नियोजन आयोगाची उपयोगिता आता संपली असून राज्य व केंद्र यांची भागीदारी असलेली नवी नियोजन व्यवस्था निर्माण करावी असे सांगितले. नियाजन आयोगाने एका विशिष्ट परिस्थितीत देशाच्या विकासात चांगले योगदान दिले आहे, परंतु जागतिक व देशांतर्गत परिस्थितीनुरूप नियोजन आयोगाच्या स्वरूपात बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. राज्यांना आपल्या विकास योजना राबविण्यासाठी नियोजन आयोगाकडे याचकाच्या रूपात जावे लागत असे, नव्या व्यवस्थेत राज्य व केंद्र यांच्यातील




नियोजन आयोगाऐवजी राष्ट्रीय आर्थिक विकास आणि सुधारणा मंडळ अशी संस्था निर्माण करण्यात यावी. या संस्थेच्या रचनेत पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व पूर्वोत्तर अशी प्रादेशिक मंडळे तयार करण्यात यावीत. पंतप्रधान हे या प्रादेशिक मंडळांचे अध्यक्ष असतील व राज्यांच्या मुख्यमंत्री त्या मंडळांचे सदस्य असतील. दर तीन महिन्यांनी या प्रादेशिक मंडळांची बैठक घेण्यात यावी, राष्ट्रीय मंडळांची



शासनात समन्वय साधणे हा आहे. राज्य विकसित झाले तरच देश विकसित होऊ शकतो, यासाठी देशाच्या नियोजनात राज्यांची भागीदारी असली पाहिजे ही भूमिका आता मांडण्यात येऊ लागली आहे. महाराष्ट्राचे समन्वय तसेच विकास प्रक्रियेत बरोबरीची भागिदारी याला महत्त्व द्यावे लागणार आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्या नियोजन व्यवस्थेची रचना कशी असावी याबद्दल आपल्या सूचना मांडल्या. ते म्हणाले,

बैठक दरवर्षी घेण्यात यावी. प्रादेशिक मंडळांचे निर्णय हे राष्ट्रीय कार्यसूची म्हणून मान्य व्हावेत.

## थिंक टँक

सध्याचे नियोजन आयोग हे सोविएत मॉडेलवर आधारित आहे. ही व्यवस्था केंद्रित स्वरूपाची आहे, त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत अपेक्षित विकास आपण साध्य करू शकत नाही, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी रोजगार निर्मिती, आर्थिक विकास व सर्वांगीण विकास यासाठी थिंक टँकची संकल्पना मांडली आहे. देशपातळीवर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली थिंक टँक निर्माण व्हावे व प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री याचे सदस्य असतील. नव्या संकल्पना, विकास प्रकल्प साकार व्हावयाचे असतील तर सूक्ष्म नियोजन थिंक टँकच्या माध्यामातून केले जाऊ शकते. मुख्यमंत्री फडणवीस या बैठकीत मुंबईच्या विकासाबद्दल म्हणाले, देशाचा विकास मुंबईशिवाय शक्य नाही. मुंबईच्या प्रश्नांचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

## वस्तू व सेवा करासंदर्भात बैठक

महाराष्ट्राचे वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार हे नुकतेच देशातील सर्व राज्यांच्या वित्तमंत्र्यांच्या बैठकीसाठी दिल्लीत आले होते. वस्तू व सेवाकरा संदर्भातील उच्चाधिकार समितीची ही बैठक होती. जम्मू काश्मीरचे वित्तमंत्री अब्दुल रहिम अथर हे या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष आहेत. या बैठकीत वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतर राज्यांना महसुलाची नुकसान भरपाई पुढील दहा वर्षापर्यंत मिळावी अशी आग्रही मागणी मुनगंटीवार यांनी या बैठकीत केली.

**दयानंद कांबळे**

❐❐

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 54

# सातत्य लोकाभिमुख संवादाचे

**दि. ३१ ऑक्टोबर २०१४ राज्याचे नवे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले आणि त्याच दिवशी नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राज्यातील जनतेशी दृक-श्राव्य माध्यमातील पहिला थेट संवाद 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाने घडवून आणला. नवीन सरकारचे प्राधान्यक्रम, आव्हाने आणि लोकाभिमुखता यांविषयी वित्त, महसूल व शिक्षण मंत्र्यांच्या मुलाखतीही या कार्यक्रमातून प्रसारित करण्यात आल्या.**

राज्याच्या आश्वासक, अभ्यासू, युवा, तडफदार, आपल्याशा वाटणाऱ्या नव्या मुख्यमंत्र्यांची राज्यातील जनतेशी प्रथम ओळख 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाने करून दिली. नव्या सरकारच्या कारकिर्दीची एक संस्मरणीय सुसंवादी अशी सुरुवात थेट जनतेपर्यंत या कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहचविण्याचा खरा आनंद संपूर्ण टीमला मिळाला.

राज्याच्या विकासाची एक नवी दृष्टी, नवा मार्ग या मुलाखतीतून त्यांनी जनतेला दिला. राज्याची आर्थिक स्थिती, सुरक्षा, शेती, ऊर्जा, सिंचन महानगरांचा विकास, उद्योग, पायाभूत सुविधा, महिला विकास व सुरक्षा, शिक्षण, युवक कल्याण, सामाजिक न्याय, पर्यटन, गतिमान प्रशासन अशा सर्वच आघाड्यांवर ठोस, कृतिशील पावले उचलून खऱ्या अर्थाने जनतेचे राज्य नवे सरकार कशाप्रकारे आणणार आहे, याचे आश्वासक चित्रच मा.मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीतून जनतेपुढे मांडले गेले. तसेच नागपूर नगरीचा महापौर ते राज्याचा मुख्यमंत्री या त्यांच्या प्रेरणादायी, गौरवास्पद वाटचालीचे दर्शनही जनतेला या मुलाखतीतून झाले.

त्यानंतर राज्याचे महसूल, कृषी इ.महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री मा. एकनाथ खडसे यांनीही 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून राज्याच्या विकास प्रक्रियेतील महत्त्वाच्या खात्याबद्दलची त्यांची भूमिका स्पष्ट केली. राज्य शासनाचा कणा असलेल्या महसूल विभागाचे आधुनिकीकरण, सुसूत्रीकरण, बळकटीकरण यांतून हा विभाग अधिकाधिक लोकाभिमुख करण्यात येईल, अशी नि:संदिग्ध ग्वाही त्यांनी त्यांच्या मुलाखतीतून दिली.

**सात शतके लोकप्रियतेची...**

जय महाराष्ट्र

**प्रसारण : दर मंगळवार आणि शुक्रवार**
**रात्री : ८ ते ९, सह्याद्री उपग्रह वाहिनीवर**

ई-मोजणी (मोजणी प्रक्रियेचे संगणकीकरण), ई-चावडी (तलाठ्याच्या दफ्तरांचे संगणकीकरण), ऑनलाईन फेरफार (म्युटेशन), अभिलेखांचे स्कॅनिंग करणे, फेरमोजणीनंतर गावचे सर्व अभिलेख डिजिटाईज्ड आणि संगणीकृत असतील, असेही खडसे यांनी सांगितले.

राज्याच्या अर्थव्यवस्थेची राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका असते आणि त्यामुळेच नवीन सरकार राज्याची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी नेमके काय करणार आहे, हे जाणून घेण्यासाठी राज्याचे अर्थमंत्री मा. सुधीर मुनगंटीवार यांची मुलाखतही प्रसारित करण्यात आली. राज्याच्या तिजोरीचा प्रवास खडखडाटाकडून खणखणाटाकडून नेण्यासाठी आर्थिक शिस्तीला प्राधान्य देणारे असल्याचे स्पष्ट संकेत अर्थमंत्र्यांनी त्यांच्या मुलाखतीतून दिले.

जनतेच्या प्रत्येक रुपयाचा विनियोग योग्य प्रकारे होण्यासाठी योजनांची आखणी आणि अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यावर तसेच करचुकवेगिरीला आळा घालण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. खऱ्या अर्थाने अर्थ खात्याला उभारी देणारे नियोजन नवे अर्थमंत्री करीत असल्याचा विश्वास त्यांच्या मुलाखतीतून जनतेला मिळाला.

**- मीनल जोगळेकर**


**मुख्यमंत्री**
**देवेंद्र फडणवीस**


**महसूल मंत्री**
**एकनाथराव खडसे**


**वित्त व नियोजन मंत्री**
**सुधीर मुनगंटीवार**


**शालेय, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री**
**विनोद तावडे**

# दिवसाची सुरुवात 'दिलखुलास'

**दिलखुलास हे जनतेचे संवादाचे हक्काचे व्यासपीठ असल्याने शासकीय योजना, ध्येय-धोरणे याच्यासोबतच समाजपयोगी कामे करणाऱ्या, शिक्षणासाठी, असाध्य रोगांनी पीडित असणाऱ्यांसाठी, गतिमंद, मतिमंद मुलांसाठी, कुपोषण निर्मूलनासाठी काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचे प्रेरक कार्य तसेच जनतेमधील उत्कृष्ट काम करणाऱ्यांची नोंदही या कार्यक्रमातून वेळोवेळी घेण्यात येते.**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ पासून घोषित केलेल्या देशव्यापी स्वच्छता मोहिमेबद्दल व्यापक जनजागृतीही या कार्यक्रमांमधून करण्यात येत आहे. १४ नोव्हेंबर या बालदिनापासून राज्यातही शाळा-शाळांमधून स्वच्छता सप्ताह पाळण्यात आला आणि यापुढे हे अभियान असेच राबवण्यात येणार आहे.

स्वच्छतेचे महत्त्व लहान वयापासूनच बिंबविण्याची आवश्यकता ओळखून हे पाऊल उचलल्याचे नवे शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी दिलखुलासमधून दिलेल्या मुलाखतीतून सांगितले.

शाळेची परिसर स्वच्छता, स्वच्छ-पोषक संतुलित आहार, विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, किशारवयीन मुलांमध्ये होणाऱ्या नैसर्गिक बदलांमुळे शरीरातील विशिष्ट अवयवांची स्वच्छता, स्वच्छ पाणी, स्वच्छ शौचालय, शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतादूत नेमणे या सर्व बाबींवर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर या महापरिनिर्वाणदिनानिमित्त बाबासाहेबांचे कार्य आणि विचार जाणून घेण्यासाठी ज्येष्ठ विचारवंत रमेश पतंगे यांना निमंत्रित करण्यात आले होते. पतंगे यांचा डॉ.बाबासाहेबांच्या जीवनचरित्रावर विशेष अभ्यास असून बाबासाहेबांच्या चरित्रातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग आणि त्यातून महामानव म्हणून त्यांची विश्वाला झालेली ओळख त्यांनी करून दिली.




२५ डिसेंबरला साजरा होणारा ख्रिसमस अर्थात नाताळ हा सण खऱ्या अर्थाने आनंददायी असतो. नवीन वर्षापूर्वी येणारा, ख्रिश्चन बांधवांचा हा पवित्र सण. याच दिनाचे औचित्य साधून , सुप्रसिद्ध साहित्यिक व लेखक तसेच पुरोगामी विचारांचे धर्मगुरू फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना जय महाराष्ट्र कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले होते. ख्रिसमसची सुरुवात कधी झाली, यामागची नेमकी संकल्पना काय, कन्फेशन, हिलिंग सेशन, वेगवेगळ्या पंथांमध्ये, वेगवेगळ्या प्रदेशात ख्रिसमस कसा साजरा केला जातो याची माहिती दिब्रिटो यांनी कार्यक्रमातून दिली.

राज्यातील आदिवासीबहुल भागात अनेक व्यक्ती, अनेक संस्था कुठल्याही प्रसिद्धीची अपेक्षा न करता काम करीत आहेत. त्यापैकीच अमरावती जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम अशा बैरागड भागात असलेल्या आदिवासी बांधवांना वैद्यकीय सेवेसह आवश्यक ती सर्व मदत देण्यासाठी, अनेक वर्षांपासून अत्यंत नि:स्वार्थी भावनेने मानवसेवा करणारे डॉ. रवींद्र आणि स्मिता कोल्हे हे दाम्पत्य. त्यांचे आजवरचे सामाजिक कार्य, वैद्यकीय पार्श्वभूमी असतानाही समाजसेवेकडे वळण्यामागची भूमिका, आणि पत्नी स्मिता कोल्हे यांची मिळालेली तितकीच मोलाची साथ यांसह त्यांच्या समाजकार्यासह आयुष्याचे आजवरचे विविध पैलू या कार्यक्रमादरम्यान उलगडण्यात आले.

समाजाच्या भल्यासाठी शासनासोबतच प्रत्येक व्यक्तीने आपला खारीचा वाटा उचलावा, याची प्रेरणा या मुलाखतींनी जनतेला दिली. ❐❐




**धर्मगुरू, साहित्यिक**
**फादर फ्रान्सिस दिब्रिटो**



**सामाजिक कार्यकर्ते**
**डॉ. रवींद्र कोल्हे**



**सामाजिक कार्यकर्त्या**
**स्मिता कोल्हे**



**विचारवंत, लेखक**
**रमेश पतंगे**




# महान्यूज : माध्यम युगातील व्रतस्थ वाटचाल

शासनाचे निर्णय, योजना, उपक्रमांची माहिती यांचे मिनीट टू मिनीट अपडेशनची परंपरा महान्यूजने २००८ पासून अखंडपणे जपली आहे. त्याचाच एक भाग म्हणून महान्यूजमधून प्रत्येक अधिवेशनाचे त्वरित प्रसारण केले जाते.

सभागृहात घडणाऱ्या घडामोडींकडे सर्व राज्याचेच लक्ष लागलेले असते. विशेषत: हिवाळी अधिवेशनातील नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये सभागृहातील प्रश्नोत्तरे, लक्षवेधी, तारांकित प्रश्न, मंत्रिमहोदयांनी




चर्चेला दिलेली उत्तरे, विधेयकांना मंजुरी यांची माहिती यशस्वीपणे फ्लॅश केली. एवढेच नाही तर मुख्यमंत्री व इतर मंत्रिमहोदयांच्या बैठकांचे वृत्तदेखील त्वरित देण्यात आले.

शासनाने घेतलेले लोकहिताचे निर्णय आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जनतेपर्यंत गतीने पोहोचवणे ही महान्यूज निर्मितीमागील संकल्पना होती. महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक आणि सध्याच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी ती यशस्वीरीत्या राबवल्यामुळेच महान्यूज या न्यूज पोर्टलला अल्पावधीतच हिट्‌सच्या रूपाने नेटिझन्सची पसंती मिळाली. इंटरनेटच्या माध्यमातून शासनासंदर्भात खात्रीशीर आणि एकत्रित माहिती मिळण्याचे ते एकमेव माध्यम बनले. आजही हे व्रत टीम महान्यूजने अविरतपणे सुरू ठेवले आहे.

राज्य मराठी विकास परिषद आणि माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्याकडून प्रत्येकी एक असे दोन सुवर्ण पुरस्कार मिळाल्यामुळे महान्यूजची उपयुक्तता आणि लोकप्रियता यावर शिक्कामोर्तब झाले. हे यश सहजासहजी तर निश्चितच मिळाले नव्हते. त्यामागे म्हैसकर मॅडम यांची दूरदृष्टी होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महान्यूजने प्रसंगानुरूप राबवलेले उपक्रम आणि समयसूचकता दाखवून घेतलेले निर्णय यांचाही हातभार आहे. महान्यूजच्या बाबतीत 'नो कॉम्प्रमाईज इन क्वॉलिटी' यावर त्यांचा भर होता. त्यामुळेच अर्ध्या तपानंतरही महान्यूजमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या मजकुराची सर्वत्र दखल घेतली जात आहे. महान्यूजमधील बातमी, फोटो, व्हिडिओ आणि गॅलरीचा उपयोग झाल्याबद्दल वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून बऱ्याच वेळा धन्यवाद देणारे फोनही आले आहेत. जिल्हानिहाय वृत्त, बैठकीच्या बातम्या, मंत्रिमंडळाचे निर्णय, मुलाखती, योजना, यशकथा, विकासवार्ता, नोकरी वार्ता अशा प्रकारच्या प्रत्येक सदरातून राज्याच्या विकासाचे मनोहारी चित्र प्रतिबिंबित होते.

निवडणूक काळात केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या माहितीद्वारे उमेदवार, कार्यकर्ते आणि जनतेचे प्रबोधनही करण्यात आले. मुंबईवरील २६/११ चा दुर्दैवी दहशतवादी हल्ला, झवेरी बाजार व अन्य ठिकाणचे बॉम्बस्फोट, २०१२ मधील मंत्रालय आग दुर्घटना, अतिवृष्टी, पूर, अवर्षण, आग लागण्याच्या घटना अशा आपत्कालीन परिस्थितीत शासन करत असलेल्या उपाययोजनांची माहिती तत्काळ प्रसिद्ध करण्याचे कार्य महान्यूजमधून केले गेले.



**नागपूर अधिवेशनावेळी विधिमंडळ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्याचे छायाचित्र. महान्यूजने अधिवेशनाचे वृत्त सर्वात जलद गतीने संकेत स्थळावर प्रकाशित केले.**

दुष्काळी परिस्थितीत शासन करत असलेल्या उपाययोजनांच्या माहितीचे वहन महान्यूजमधून केले जात आहे. महान्यूजमधून प्रसिद्ध होणाऱ्या वास्तववादी बातम्यांमुळे शेतकरीही निश्चितपणे आश्वस्त होत असणार, याची खात्री आहे.


महान्यूजच्या वाटचालीला अर्धे तप (सहा वर्षे) पूर्ण झाले आहे. ज्यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला, त्या श्रीमती म्हैसकर मॅडम या सहा वर्षपूर्तीच्या वेळी विभागाच्या सचिव आहेत हा दुग्धशर्करा योगच! त्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्वीप्रमाणे आजही महान्यूज टीम व्रतस्थपणे कार्यरत आहे.

**संतोष तोडकर**

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 57

# नित्यनूतनाची आस MAHARASHTRA *Ahead*

वर्ष होते २००९. देशाने दखल घ्यावी अशा अनेक चांगल्या वाईट घटना महाराष्ट्रात घडल्या होत्या आणि घडत होत्या. उद्योग, आय टी, शिक्षण या क्षेत्रातील महाराष्ट्राच्या कामगिरीची दखल देशपातळीवर घेण्यात येत होती. अशा या संक्रमणाच्या वातावरणात अशा एका माध्यमाची आवश्यकता होती, ज्याद्वारे महाराष्ट्रातील अमराठी वाचक








आणि महाराष्ट्राबाहेर देशपातळीवर राज्याची उज्वल प्रतिमा पोहचवता येईल. वेळोवेळी ही गरज अधोरेखित झाली होती.

आणि हे सारे लक्षात घेऊन मार्च २००९ मध्ये 'महाराष्ट्र अहेड' या इंग्रजी मासिकाची सुरुवात माहिती महासंचालक मनिषा पाटणकर-म्हैसकर यांच्या प्रेरणेतून आणि दिशादर्शनातून झाली.

माहिती जनसंपर्क महासंचालनालयाला जनसंवादाची उज्वल परंपरा आहे. महासंचालनालयाचे 'लोकराज्य' हे मासिक १९४७ पूर्वीपासून वेगवेगळ्या स्वरूपात अस्तित्वात आहे. ३५ लाखाहून अधिक वाचक असलेले लोकराज्य हे महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय मासिक आहे. याशिवाय उर्दू लोकराज्य प्रकाशित केले जाते ज्याची वाचकप्रियता १ लाखाच्या घरात आहे.

या मालिकेमध्ये तिसरा मणी महाराष्ट्र अहेडच्या रूपाने ओवला गेला आणि वाचकप्रियही झाला. महाराष्ट्र अहेड हे तसे लोकराज्यचे धाकटे भावंड पण त्याची प्रतिकृती नाही. लोकराज्यची परंपरा जपताना महाराष्ट्र अहेडने गेली पाच वर्ष आपले वेगळेपण जपले आहे आणि टिकवूनही ठेवले आहे. मुळात महाराष्ट्र अहेडचा उद्देश राज्याची प्रतिमा








देशपातळीवर तयार करणे हा आहे. त्यामुळे वेळोवेळी यातून महाराष्ट्रातील पर्यटन, सांस्कृतिक वैशिष्ट्य, उद्योगाच्या संधी, जैविक संपदा, महाराष्ट्राची विविध क्षेत्रातील घोडदौड प्रतिबिंबित करण्यात आली आहे. महाराष्ट्र अहेडचे पर्यटन, वनसंपदा, सण आणि संस्कृती, चित्रशिल्प, शहरे यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, निवडणुका असे विविध विषयावर काढण्यात आलेले अंक विशेष खूपच लोकप्रिय आहेत.

प्रत्येक नियतकालिकाच्या जीवनात मधूनमधून एक टप्पा तोचतोपणाचा येतो. तो व्यक्तींच्याही जीवनात येतो. तसा एक काळ अलीकडे महाराष्ट्र अहेडलाही आला. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र अहेडला 'न्यू लूक' देऊन नव्या वर्षात वाचकांना सादर करायचा असे महासंचालनालयाच्या सचिव मनिषा पाटणकर-म्हैसकर यांनी सांगितले आणि महासंचालक चंद्रशेखर ओक यांच्या मार्गदर्शनाखाली अंकाला 'न्यू लूक' देण्याचे काम सुरू झाले. मा. सचिवांच्याकडून तसेच महासंचालकांकडून वेळोवेळी आलेल्या सूचना आणि त्यासाठी झालेले ब्रेनस्टॉर्मिंग यामुळे आज या अंकाला खरेच न्यू लूक मिळाला आहे.

महाराष्ट्र अहेडचे बदललेले हे स्वरूप वाचकांना नक्कीच आवडेल असा आम्हाला विश्वास आहे. यापुढेही महाराष्ट्र अहेड आपले आगळेपण जपणारच आहे. याशिवाय नवे काहीतरी सतत वाचकांना देण्याचा प्रयत्न







यातून होत राहील. महाराष्ट्राचे प्रतिबिंब देशाला दाखवण्याबरोबरच दिग्गजांच्या लेखणीतून महाराष्ट्र कसा आहे हे दाखवण्याचा आमचा प्रयत्न राहील. लोकराज्य, महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्यवर वाचकांनी प्रेम केले आहे ते तसेच द्विगुणित होईल असा विश्वास वाटतो.

**कीर्ती पांडे**

❑ ❑

**'महाराष्ट्र अहेड' या इंग्रजी अंकाचे मुल्य ५० रुपये असून वार्षिक वर्गणी ५०० रुपये आहे. वार्षिक वर्गणी वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय बरेक क्र. १९ फ्री प्रेस जरनल मार्ग, मुंबई - ४०० ०२१ या पत्त्यावर मनिऑर्डरने पाठवावी किंवा लेखाधिकारी, मा. व ज. स., मंत्रालय, मुंबई यांचे नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा.**

3-35_lok-1-29.qxd 12/30/2014 4:46 PM Page 58




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या दोन महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

दीर्घकालीन उपाययोजनांची राज्यातील शेतीला असलेली गरज लक्षात घेऊन सौर उर्जेवर चालणारे पंप शेतकऱ्यांना देण्याच्या योजनेचा पुनरूच्चार मुक्ताईनगर येथे को-जनरेशन यूनिटचे उद्घाटन करताना केला.

Our Govt decides to give 5 lakh 5 hp solar pumps to farmers to ensure that farms should not get affected due to scarcity of electricity.
I told this while inaugurating 1st sugarcane crushing season of Sant Muktai Sugar & Energy Ltd in Muktainagar.

पायाभूत सुविधांची उभारणी वेळेत पूर्ण व्हावी याबद्दल मुख्यमंत्री आग्रही आहेत. करंजा आणि जयगड बंदर प्रकल्पांना चालना मिळाली तेव्हा प्रयत्न सार्थकी लागल्याचा आनंद त्यांना होतो आणि असाच आनंद होतो जेव्हा नवी मुंबई विमानतळ आणि रामझुल्याचा प्रश्न मार्गी लागतो.

Launched 1000cr project of World Class Multipurpose Karanja Port Terminal & Logistics Pvt Ltd (Raigad).

This infrastructure at Raigad will be built in 24 months & will boost port activity & redevelopment of this region.

GoM signed MoU with Jaigad Port Company Ltd and Konkan Railway to complete 34 km railway line, a Rs 775 crore project.

Good News-Navi Mumbai Airport gets a shot in arm. Aviation Ministry cleared the shared till proposal. Last hurdle in calling tender is removed.

## टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष सायरस मिस्त्री यांची भेट

Met Tata Group Chairman Mr Cyrus Mistry. We extend complete support for initiative of educating 1 crore children of State schemes.



Delighted to inaugurate the most awaited Ram Jhula fly over (Phase I) - Nagpur, with Hon Union Minister @nitin_gadkari ji

२६/११ च्या शहिदांच्या नातेवाइकांची भेट घेतली तेव्हा मुख्यमंत्री म्हणतात.

Met relatives of martyrs of 26/11.Govt forming a policy for privileges to kin of martyrs who are gallantry awardees.

स्वत:चे घर असावे हे प्रत्येकाचे स्वप्न म्हणून धारावी आणि एस आर ए प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री आग्रहाने पाठपुरावा करतात

It was decided to give priority to housing stock & speed up the projects under SRA for progress of slum dwellers(1/n). I've asked concerned officers to come out with a solution for redevelopment of Dharavi which will ensure growth of people & business both.

छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारायचे हे अवघ्या महाराष्ट्राचे स्वप्न. या प्रकल्पातील अडथळे दूर झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणतात...

MoEF - GoI has given clearance for Chhatrapati Shivaji Maharaj Memorial in the Arabian Sea at … Mumbai. Thank you @PrakashJavdekar ji.

❐ ❐


3-35 with cover_lok-1-29.qxd 1/6/2015 4:49 PM Page 61



3-35 with cover_lok-1-29.qxd 1/6/2015 4:49 PM Page 62

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 25th January 2015
Date of Publication : 10th of every Month

# प्रतिबिंब नव्या महाराष्ट्राचे




- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे

आज आणि उद्यासाठीही

# लोकराज्य

वार्षिक वर्गणी रु.१००

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **चंद्रशेखर ओक**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक